हिंदएजन्सी विविध-विषय-ग्रंथमाला

पुष्प सातवें

# यक्षाज्ञा

अथवा

# स्वराज्य आणि स्वदेशवात्सल्य.

(ऐतिहासिक कादंबरी)

लेखक,

श्री. लक्ष्मण नारायण जोशी.

प्रकाशक

हिंदएजन्सी बुकसेलर्स अँड पब्लिशर्स, मुंबई.

१९१७

(सर्व हक्क स्वाधीन)

किंमत बारा आणे

मुद्रक—अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस, कसबा पेठ, पुणें शहर.
प्रकाशक—नारायण नरसो केतकर, मालक हिंदएजन्सी, माधवबाग, मुंबई.

# प्रस्तावना.

हें पुस्तक सतरा प्रकरणात्मक असून, यांत-तात्विक विचारांनीं उत्तम तऱ्हेचें मनोरंजन कसें होतें व हरघडी संसारचक्रांत येणाऱ्या अनेक प्रसंगांशीं, शांत व धीमेपणानें तोंड देऊन-कजाग स्त्रिया, खरे मित्र व स्वार्थसाधु लोक यांचे स्वभाव, अंगीं पात्रता नसतां उच्च मान मिळविण्याची आकांक्षा धरणाऱ्यांची तात्विक विवेचनानें झालेली फजीती, मुग्ध परंतु अनुपमेय असा मधुर श्रृंगार, असत्याची उरफोड, सत्याचें सोदाहरण निरूपण, राजकर्त्या कुटिल अधिकाऱ्यांच्या कृष्णकृत्यांवर निर्भयतेनें केलेली प्रशंसनीय टीका, हालाहलप्राशनसमयीं मृत्यूसंबंधानें केलेलें स्पष्टीकरण, निंदेची स्तुतीनें झालेली कंबरमोड, भूमीवरील व स्वर्गातील मानवी व दैविक कायद्यांचें नातें, स्वराज्यांतील तरुण पिढीचा बापपणा, मनोरथयक्षाची वेळोवेळीं मिळालेली अलंघनीय आज्ञा व तदनुरूप वर्तनानें झालेली महती, धनाचा धिक्कार व दारिद्र्याचें उत्कट प्रेम, अपत्यावर द्रव्य मिळविण्याच्या लालसेची गर्दनछाट-वगैरे वगैरे गोष्टींचें तात्विक विचारांनीं विशदीकरण केलेलें आहे.

प्रस्तुत पुस्तकाचें जन्मचरित्र मोठें विलक्षण आहे. या रूपानें या पुस्तकाचें या जगांत जनन होण्याला अकरा वर्षें लागलीं आहेत. अशीं चरित्रें पुष्कळ असतील परंतु मला माहीत नाहींत. प्रकृत पुस्तक त्रिमूर्तिरूपानें अवतीर्ण व्हावें असा ईश्वरी संकेत होता असें दिसतें. ज्या साक्रेटीसाची भूमिका प्रकृत पुस्तकाला आधारभूत म्हणून मीं घेतली आहे, ती भूमिका माझे परममित्र कै. श्री. मा. ना. पाटणकर हे स्वतः रंगभूमीवर रंगविणार होते. त्यांनींच या चरित्राचें संगीत नाटक सन १९०६ मध्यें मजकडून तयार करविलें. पण तें तसेंच घरांत पडलें. पुढें १९०७ मध्यें आमचे

मित्र कै. बळवंतराव जोग—मालक शाहूनरवासी नाटक मंडळी—यांनीं त्याला गद्यरूपांत सजविण्यास मला सांगितलें; परंतु तेंही रूपांतर तसेंच पडून राहून पुढें सन १९१४ सालीं प्रस्तुतच्या रूपांत तें प्रकट करावें म्हणून मीं लिहिलें. पुढें दोन वर्षांपूर्वी एका मासिकांतून तें क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलें. पण पुढें तोहि योग अंतरला. शेवटीं यां बालकाला कसें तरी एकदां पूर्णावस्थेंत सूर्यकिरणांचें दर्शन देण्याचा योग आमचे मित्र रा. नारायणराव केतकर यांनीं आणला याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

जी वस्तु जगन्मान्य झालेली असते तिच्या अनेक गुणांसंबंधानें अनेक लेखक आपापल्या परीनें ती जशी समाजापुढें मांडीत असतात, तद्वतच मी ही—साक्रेटिस—या प्रसिद्ध व्यक्तीच्या चरित्राची कृति माझ्या अधिकार-योगाप्रमाणें जगापुढें मांडिली आहे. कशी काय उतरली आहे तिचें परीक्षण करायला ज्ञाते आहेतच.

पुस्तककर्ता.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

आगाऊ प्रसिद्ध केल्याप्रमाणें प्रकृत पुस्तक–पुष्कळ उशीरां कां होईना–श्रीकृष्णपरमात्म्याच्या जन्मदिवशीं म्हणजे गोकुळ अष्टमीस आम्ही आमच्या वाचकांच्या हातीं देत आहोंत. हें पुस्तक महाराष्ट्रांत पूर्वीं गाजलेल्या एका लेखकाच्या लेखणींतून उतरलेलें असल्यामुळें त्या लेखकाची लेखनशैली सांगण्याचें कारणच नाहीं. प्रसिद्ध ग्रिश्शन तत्त्ववेत्ता साक्रेटिस याच्या चरित्रावर ही कादंबरी रचलेली आहे, ही गोष्ट वाचकांना ताबडतोब कळून येईलच. ही तात्विक संभाषणांनीं ओतप्रोत भरलेली कादंबरी आमच्या बंधु-भगिनीवर्गांचीं मनें संतुष्ट करून त्यांना कांहीं तरी नवीन बोध दिल्याशिवाय राहणार नाहीं अशी पूर्ण आशा आहे.

याच मालेचें आठवें पुष्प–**दख्खनचे वाघ**–ही ऐतिहासिक कादंबरी, भाग १ ला–दसऱ्याच्या सुमुहूर्तानें वाचकांकडे येऊन आपल्या परिमलानें वाचकांचे आत्मे शांत करील.

| | |
|---|---|
| गोकुळाष्टमी,<br>शके १८३९<br>मुंबई. | आपला नम्र,<br>व्यवस्थापक<br>हिंद-एजन्सी विविधविषय–ग्रंथमाला |

ही कृति—

प्रस्तुतच्या मानवी देहांत आणून ज्यांनीं मला या

मृत्युलोकांतील सूर्यकिरणांचें प्रथम दर्शन

घडविलें त्यांच्या पदकमलीं

समर्पित असो.

ल. ना. जोशी.

# यक्षाज्ञा.

## प्रकरण पहिलें.

## मोद-पर्वणी.

आमची ही गोष्ट इसवी सनापूर्वी सुमारें पांचचारशें वर्षांच्या पूर्वी-पूर्व भूगोलार्धांतील पश्चिमेकडील, त्या कालमानाप्रमाणें अगदीं सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या अशा एका राष्ट्रांत घडलेली आहे. या पुस्तकांत आम्हीं त्या देशाला-राष्ट्राला-गोशृंग असें म्हटलें आहे. त्या वेळीं गोशृंग देश, अनेक लहान मोठीं संस्थानें मिळून एक राष्ट्र बनलेला होता. त्यांतील कांहीं संस्थानें प्रजासत्ताक व कांहीं राजसत्ताक अशीं जरी होतीं-त्यांचे कायदे प्रत्येकीं जरी स्वतंत्र होते, तरी राज्यचालनाचीं सूत्रें एकाच तत्त्वावर चाळविलीं जात असत. तीं संस्थानें ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आपसांतील कलह विसरून परकीय शत्रूबरोबर टक्कर देण्यास एकजुटीनें रणांगणावर ठाकत असत; व आपल्या उत्कर्षांत कमीपणा न येऊं देण्याबद्दल पूर्ण खबरदारी घेत. असो. आज आतां आपल्याला गोशृंगाच्या पुष्पपुर राजधानींतील एका विशिष्ट गोष्टीसंबंधानें काय चाललें आहे तें बघायचें आहे.

आजचा मोदपर्वणीचा दिवस असल्याकारणानें त्या संस्थानांतील कांहीं विशिष्ट, धार्मिक व प्रणयी अशा जनांनीं प्रातःकाळींच समुद्रस्नानाकरितां -समुद्रकिनारा प्रफुल्लित होऊन गेलेला दिसतो आहे. या वेळीं क्षितिजावरून आपलें सुवर्णवलयांकित स्वरूप पृथ्वीच्या अर्धगोलावरील जीवांनां दाखवून त्यांनां आनंदी करण्याकारितां सूर्यनारायणमहाराजांची स्वारी मोठ्या थाटानें

समुद्रांतून वर येत आहे असें स्पष्ट दिसत होतें. या वेळीं तो प्रात:कालचा रमणीय देखावा बघणाऱ्या प्रत्येकाच्या तोंडून—

[ फरमावो शरमावो० ]

**किति शांत सुखकर बालरवी हा उदयाचलिं आला ।**
**जलपृष्ठोदर फोडी पुष्कर बाल्या कीं बाला ॥**
**प्रतिमेला । प्रतिभेला । जगताला । रवि झाला ॥**
**खरि मोदपर्वणि हीच असे कीं कविच्या काव्याला ॥ ध्रु० ॥**
**जनदृष्टीच्या लहरी देती दोले बालला ॥**
**सागरऊर्मी तत्सम करिती बालरवीकमला ॥**
**स्पर्शित तें । नच होतें । वर येतें । सुख देतें ॥**
**रंगललितासंगम ऐसा रमवी जगताला ॥ ध्रु० ॥**

असेच काव्यमय उद्गार निघाले असते.

तो गोशृंग देश त्या काळीं पूर्णपणें सौर म्हणजे सूर्योपासक असल्यामुळें आर्यधर्मांतील गायत्रीप्रमाणें त्यांचेंही एक सूर्योपासनेवर त्याच्या त्यावेळच्या भाषेंत महान्पंडितांनीं एकवाक्यतेनें एक स्तोत्र केलेलें होतें. तें स्तोत्र तेथील प्रजाजन मोठ्या भक्तिभावानें रोज त्रिकाळ जरी नाहीं, तरी निदान सांजसकाळ तरी म्हणत असत. त्या स्तोत्राचा भावार्थ पुढीलप्रमाणें होता.

[ नमामि महिषासुर० ]

**आम्हां हा दिनकर शुभकर होवो ॥ ध्रु० ॥**
**सुरनुतकृत अमित दीधिति ।**
**प्रिय अती । त्रिजगतीं । नयवती । सन्मती । धीमती ॥**
**सतत प्रगती मात करूं हा दिनकर शुभकर होवो ॥ ध्रु० ॥**
**सुप्रभा व्यापित नभा तव ती शुभा ॥**
**ज्ञानीं । कवनीं । स्तवुनी । गायनीं । प्रेरुनी ॥**
**वेदरचनीं श्रेष्ठ सुर जाणुनी । स्थापिलें तुजासि ऋषिनीं ।**
**मान्य तें मत मानुनी । प्राकृतार्थकृतबोधिनी ।**
**स्तुतीला पात्र हा दिनकर सुखकर होवो ॥ ध्रु० ॥**

याप्रमाणें समुद्रकांठीं मोदपर्वणीनिमित्त प्रातःकालींच जमून सूर्यस्तोत्र गाणाऱ्या त्या पुष्पपुरच्या नरनारींचा अद्भुत देखावा काय वर्णावा! फारच बहारीचा! समुद्रस्नानाच्या वेळीं संकल्प सांगून दक्षणा मिळविण्याच्या धांदलींत असलेल्या भिक्षुकांच्या तारंबळीचें वर्णन करणें म्हणजे त्यांच्या पोपटपंची ज्ञानाचें व भोळेपणाचें एक प्रदर्शनच करणें असल्यामुळें, तसल्या त्या प्रदर्शनाच्या नादीं न लागतां स्नानपूजादानानंतर आपापल्या घरीं जाण्याकरितां तेथून परतणाऱ्या भोळ्याभाविकादि जनांची स्थिति काय आहे तेवढीच पाहूं म्हणजे झालें.

जत्रा म्हणा किंवा यात्रा म्हणा—सर्वच लोक तेथें जरी एकाच मुख्य मुद्याकरितां जमलेले असतात, तरी त्यांतल्या त्यांत मुख्य मुद्यापेक्षां अनेकांचे अनेक स्वतंत्र असे मुद्दे असतात, हे येथें नव्यानें सांगणें नको. त्याच अनेक मुद्यांपैकीं सध्यां आपल्याला आतां एथें एका प्रणयी जोडीकडे बघून त्यांचीं परस्पर भाषणें काय चाललीं आहेत याच मुद्याचें अवलोकन करायचें असल्यामुळें, तेवढ्याच पुरता आपण आतां विचार करूं.

तो पहा—तो एक प्रणयोत्सुक तरुण आपल्या घरीं—इतर नरनारींप्रमाणें—स्नानमार्जनोत्तर लगबगीनें न जातां—त्याच्याचप्रमाणें त्या समुद्रतीरीं रेंगाळत असलेल्या एका तरुणीप्रमाणें आत्मगत विचार करीत चालला आहे.

"अहाहा हेंच तें रत्न! काय? इतर स्त्रियांप्रमाणें हीही सूर्याला अर्घ्य देऊन आपल्या घराकडे निघाली कीं काय? छे, पण असं कसं होईल? ठरल्याप्रमाणें ती या जागीं—सर्वांची नजर चुकवून—यायला कशी विसरेल? अहाहा! आलीच. आतां मात्र वाट बघण्याचें सार्थक झालें खास."

याप्रमाणें किराताचे आत्मगत विचार चालले असतां, प्रणयोत्सुक मालती मोठ्या लगबगीनें त्याच्या सन्निध येऊन "आतां लवकरच घरीं गेलें पाहिजे. नाहींतर बाबा म्हणतील कीं, शेजारपाजारच्या बायका आपापल्या घरोघर केव्हांच आल्यान्, तूं इतका वेळ समुद्रावर काय करीत होतीस?"

" मालती, या सूर्यनारायणाचीच शपथ घेऊन सांगतों कीं, काल आपलं ठरल्याप्रमाणें या सर्वसाक्षी जगन्मित्राला साक्षी ठेवून मी हा तुझा हात माझ्या हातांत धरतों. सर्वोत्तम असा हा आपला गांधर्वविवाह आतां कोणाच्यानं मोडवणार आहे ? " मोठ्या आतुरतेनें आणि विपयी जनाला अनुसरून असें नेत्रमीलन करून किरात म्हणाला, " ये, ह्या समुद्रकांठच्या बागेंतल्या शिलासनावर बसून थोडा वेळ सद्यःकालाला योग्य असं थोडंसं भाषण करूं."

असें म्हणून त्यानें तिचा हात धरला व तीं दोघें नंतर एका शीतल अशा दाट छायेच्या वृक्षाखालील शिलासनावर जाऊन बसलीं.

" मालती, आपण आज सूर्यनारायणाला साक्षी ठेवून येथें गांधर्वविवाह केला खरा, पण तुझ्या बापानें जो कन्याविक्रयाचा निश्चय केला आहे त्याचं कसं काय ? "

" हें पहा कनी, जी गोष्ट आपणां उभयतांच्या संमतीनं आणि या सर्वसाक्षी जगच्चक्षूच्या साक्षीनं आतां इथें घडली, तिच्यांत बदल म्हणून आतां यापुढें कधींसुद्धां व्हायचा नाहीं, हें पक्कं ध्यानांत ठेवावं."

"इतका तुझा पक्का निश्चय असल्यावर मग मला अधिक तें काय पाहिजे ? खरोखरच मी भाग्यवान्! पण मालती, हा आपला आज परस्परांत जडलेला संबंध राजरोसपणें आपल्याला कसा जगाच्या निदर्शनाला आणतां येईल बरं ? "

" सगळ्या गोष्टी धीरानंच घ्याव्या लागतात."

" हो, खरं आहे." इतकें बोलून तो निमिषमात्र विचारमग्न झाला. " या कामीं माझा मित्र वालखिल्य खरोखरच मला फार उपयोगीं पडणार आहे. तुझ्या बापाच्याही तो चांगलाच ओळखीचा असल्याकारणानं त्याला त्याचा मुळींच संशय येणार नाहीं ! "

" माझे बाबा म्हणजे पक्के द्रव्यलोभी ! कालच सोमदत्ताला थाप मारून, त्याच्यापासून दोन हजार मोहरा त्यांनीं उपटून आणल्या. पण त्या मोहरांचा उपयोग कुणाला तें लक्ष्यांत आलं का ? जमिनीला."

" म्हणजे ? तुझा बाप आपलं द्रव्य जमीनींत पुरून ठेवितो वाटतं ? "

" यांत संशय तो कसला ? त्यांना जसा त्यांच्या विद्येचा उपयोग नाहीं तसाच द्रव्याचाही नाहीं."

" मग, तुझा तरी कां असावा ?"

" फक्त द्रव्याकरितां !"

" बरं, पण असं तें द्रव्य आहे तरी किती ?"

" त्यांनां जसा त्यांचा स्वतःचाच भरंवसा नाहीं, तसा माझाही नाहीं; आणि ज्या जमीनींत तें पुरून ठेवलं आहे त्या जमीनीचाही पण नाहीं. ती जमीन कदाचित् तें त्यांचं द्रव्य गिळून टाकील कीं काय या भीतीनं ते रोज एकदां मध्यान्हरात्रीं उकरून बघतात."

" तें असूं दे; पण तें द्रव्य असं असेल तरी किती ? "

" सांगितलं ना ! त्यांचा माझ्यावर त्या जमीनीप्रमाणेंच भरंवसा नाहीं म्हणून. मी निजलें म्हणजे मला पुरी झोंप लागली असल्याची आपली खात्री करून घेऊन, ते उठतात; बाहेरून कडी लावून घेतात; परसांत जातात नि घटके दीड घटकेनं परत येतातन् निजतात."

" ते दुसऱ्या कांहीं कामाकरतां जात नसतील कशावरून ? "

" छे, मुळींच नाहीं ! ते परत येतांना आपल्याशींच ' आहे, ठीक आहे; सुरक्षित आहे.' असं बडबडत येतांनां मी किती तरी वेळां ऐकलं आहे ? "

याप्रमाणें त्या प्रणयी जोडप्याचें प्रणयाला सोडून निराळ्याच तऱ्हेचें भाषण त्या वेळीं चाललेलें वाचून वाचकांना मोठा अचंबा वाटेल; पण यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. प्रणयी जनांचा प्रणय हा नेहमींचाच आहे—त्याला मज्जाव करणें जरी मोठ्या धोक्याचें असतें, तरी वरील जोडप्याची नाजुक परिस्थिति लक्षांत आणली असतां त्यांनां सांप्रत प्रणयांत गुंग होऊन आपला पुढील रस्ता बिकट करून घेण्यापेक्षां, त्या रस्त्यावरील एक मोठी धोंड वलांडून जायची होती व त्याचमुळें त्यांचें आपसांत वरील-

प्रमाणें भाषण चाललें होतें, हें पुढील घडलेला प्रकार वाचला म्हणजे वाचकांच्या सहज लक्षांत येईल. त्यांचें परस्परांत इतकें बोलणें होतें आहे तोंच दुरून कोणी दोघे पुरुष आपसांत कांहीं भाषण करीत येत आहेत, असें किराताच्या दृष्टीस पडलें.

"तें बघितलंस का तिकडे? ते इकडे दोघेजण कोण येत आहेत ते ओळखलेस का?"

"अगबाई, ते तर माझे बाबा! बरोबर सोमदत्तही आहेत."

"आणि म्हणूनच आपण आतां त्यांच्या दृष्टीला पडतां उपयोगीं नाहीं. पण आतां पुन्हां भेट केव्हां? नेहमीं एकत्र रहाण्याचा योग जुळून येईल तोच सुदीन!"

"तो सुदीन, आजची ही मोदपर्वणी हाच आहे, असं नाहीं कां कांहीं करतां यायचं?"

"अगदीं खरं! इथेंच–आतांच–तसं कां होऊं नये?"

इतकें बोलून त्यानें प्रणयप्रकोपानें तिच्या खांद्यांवर आपला डावा हात टाकला व उजव्या हातानें मुखकमल मोठ्या नाजुकपणानें धरलें आणि एखाद्या अधाशी भ्रमराप्रमाणें मुखारविंदपान करण्यास सुरुवात केली. इतकें झालें खरें; परंतु मालतीचा बाप आणि सोमदत्त यांच्या दृष्टीस न पडण्याची जी भीति त्याला बागुलबोवा दाखवीत होती तिच्या डिवचण्यानें तो अतृप्त अशा अधरपानापासून पराङ्मुख होऊन–

"लाडके, हें तुझं असं अधरपान करून माझ्याऐवजीं मी आपला प्रत्यक्ष जीवच–या तुझ्या देहनलिनीच्या अरविंदाचा अक्षय सहवास घडण्याकरितां रक्षक म्हणून–या उत्तुंग स्तनशैलांवर गडकरी या नात्यानं–आजची आपली हीच मोदपर्वणी म्हणून ठेवून देतों."

"पहिल्याच भेटीला मीं आपलं मन आपल्या चरणसेवेकरितां आपल्यापाशीं गुलाम म्हणून ठेवलं आहे, तें आपण जतन करून ठेवलं आहेना?"

" अहाग वेडे ! अगदीं हृदयांत जतन करून ठेवलं आहे, म्हणून तर मी इथें आहें."

याप्रमाणें त्या दोघांच्या हृदयांच्या मानसिक अदलाबदलीचें प्रेमपूर्ण भाषण चालू असतां—मालतीचा बाप अर्थपति व सोमदत्त हे दोघे त्या त्यांच्या वृक्षच्छायाच्छादित शिलातलासन्निध येऊन ठेपल्याचें त्या जोडप्याच्या दृक्-पथांत आल्याबरोबर त्यांची मोठी तारंबळ उडाली. त्यांनीं तेथून निसटून जाण्याची मोठी लगबग केली; त्यांनां त्यांत जय आला; परंतु तो सर्व प्रकार दूरदृष्टि अशा फक्त एका सोमदत्ताच्या नजरेला चुकवूं शकला नाहीं. मालती झपाट्यासरशी त्या बागेंतून दृष्टीआड झाली; परंतु किराताला अवसर न मिळाल्यामुळें त्याला तेथेंच एका कुंजांत लपून बसावें लागलें. किरात लता-कुंजांच्या जों आड होतो आहे तोंच ते दोघे तेथें बोलत येत असलेले किरातानें स्पष्ट बधितले व ते आपसांत काय बोलतात तें आडून ऐकत रहाण्याचा किरातानें मनाशीं निश्चय केला.

---

## प्रकरण दुसरें.

# क्रोध व लोभ यांचा पाडाव.

" छेः, अगदीं खोटं! बिलकुल भरंवसा बसत नाहीं. सोमदत्ता, या सर्व गोश्रृंग देशांत तुझ्यासारखा दुसरा कोणीच ज्ञाता नाहीं असा सूर्य-नारायणानं कौल दिला असेल; पण काय रे, तुझ्यासारखे असे कुरूप—खर-बुजी चेहऱ्याचे ज्ञाते आजपर्यंत कधींच उत्पन्न झाले नाहींत, असं जर मीं म्हटलं, तर त्यांत वावगं काय होईल? असे कुरूप चेहऱ्याचे ज्ञाते आज-पर्यंत उत्पन्न झाल्याचं तूं तरी कधीं ऐकलं आहेस का!"

" हो हो ! हें आतांच ऐकलं. आजपर्यंत कुरूप मुखश्रीचे ज्ञाते झाले नाहींत, पण सोमदत्तच काय तो एक झाला आहे, असा मीं आपल्या बोलण्याचा भावार्थ काढला आहे. पण त्यांत काय आहे ? हा आपणांसारख्या ज्ञात्यांच्या गूढ भाषणांतला गर्भितार्थ आहे. हें भाषासौंदर्य आहे. हें कूट आहे. त्याबद्दल कोणी रागावायचं कांहींच कारण नाहीं."

" अरे चोरा ! तोंडांत मारायची, चुकलों म्हणायचं आणि क्षमा मागायला पुढें व्हायचं ! वा, खूप न्याय आहे. अरे, तुम्हां मुर्दाडांना अजून कसं कळत नाहीं कीं, मनुष्य आहे, चुकतंच आहे. अरे, या चुका म्हणजे शुष्क शब्दवादापैकींच आहेत, असं प्रत्यक्ष गोध्वल ऋषींनीं स्वतःच्या एका चुकीबद्दल साधार असं आपल्या शिष्याला एक वचन सांगितलं आहे तें ऐक.

**द्रव्यरूपेण या पच्ची सा पच्ची सात्विकी मता ॥**
**शुष्कः शब्दमयो वादः पच्ची सा न मता बुधैः ॥ १ ॥ "**

" असं जर आहे तर आपण आपल्या सुंदरशा मुखश्रीला न शोभणाऱ्या घाणेरड्या लक्तराऱ्या आंगावर घालून हिंडतां ही आपली द्रव्याभावाची सात्विक पच्ची असून, आपण शुष्क वादापैकींच एक ज्ञाते आहांत म्हणायचं ? "

" अहाहा ! काय पण अक्कल ! अन् म्हणे ज्ञातेपणाचा सूर्यनारायणानं कौल दिला ! पण तेंही बरोबरच आहे. तुझ्याकडे तरी त्याचा काय अपराध ? कारण,

**सुश्राव्यकाव्यं किमशुष्कमंदोः**
**गुडस्य चाव्यं न तु रासभस्य ॥ २ ॥"**

" अगदीं बरोबर. खरे ज्ञाते असाच आपल्या ज्ञानाचा गर्व वाहतात. नाहींतर मी ! आतां आपण केलंत अशाच तऱ्हेचं पांडित्य आपल्याच तोंडानं करणारे जे पंडित असतात त्यांच्या आंगावरच्या लक्तऱ्यांतून त्यांचा गर्व सदोदित बाहेर वहात असतो. तो त्यांचं एक अमूल्य भूषणच आहे."

सोमदत्ताचें हें व्याजोक्तीचें भाषण सहन न झाल्याकारणानें अर्थपतीनें आपल्या रागाच्या लहरींत खाडकन् सोमदत्ताच्या मुस्कुटांत मारली व म्हणाला, "मूर्खा, निर्लज्जा, माझी निंदा करतोस होय? गांठ कोणाशीं आहे हें समजलं का आतां?" सोमदत्त क्रोधाला वश न होतां मोठ्या शांतपणानें म्हणाला, "शिरस्त्राण केव्हां घालावं हें माहीत नसणं हें मोठं दुर्दैवाचं लक्षण आहे. पण जाऊं दे, त्यांत काय आहे? अर्थपते, काल ज्या मीं तुम्हांला—घर गहाण ठेवून दोन हजार मोहोरा दिल्या आहेत कीं नाहीं, त्या गुरुदक्षिणा म्हणून समजून, आतां केव्हांही परत करण्याचं मनांत आणूं नका. कारण, क्रोधाला कसं जिंकावं याचा तुम्हीं मला आज फारच अमोल असा धडा देऊन, तो शिकवलातही. हा धडा मी आतां मरेपर्यंत कधींच विसरणार नाहीं."

हा सर्व प्रकार लताकुंजांतून किरात मोठ्या बारकाईनें बघत व ऐकत होता. सोमदत्ताच्या तोंडांत मारल्याचा प्रकार पाहून किराताला यापुढें फार वेळ दडून बसवेना. तो क्रोधानें लाल होऊन आपल्या जागेंतून एकदम पुढें आला व अर्थपतीचा धिक्कार करून त्याला म्हणाला, "वा! फार नामी गोष्ट केलीत! आतां तुम्हीं सोमदत्तांच्या तोंडांत मारलीत व ती त्यांनीं निमूटपणें सहन करून घेतली, हें सर्व झालं खरं; परंतु याचा परिणाम असा होणार आहे कीं, हा किरात, तुम्हांला पुढें कांहीं कालानं स्वतःच्या हातांनींच स्वतःचं मुस्कट रंगवून घ्यायला लावल्याशिवाय कधींच राह्यचा नाहीं, हें मात्र पक्कं लक्षांत ठेवा. क्षुल्लक गोष्टींत इतका राग बरा नव्हे! एवढ्याशा गोष्टीकरितां आज तुम्हीं सोमदत्तांच्या थोबाडांत लगावलीत, मग उद्यां काय तुमचा हट्ट खोडून काढण्याकरितां जर मालतीनं कोणाशीं प्रीतिविवाह केला तर तुम्ही आपल्या रागाच्या सपाट्यांत खून करून फांशींच जाल म्हणायचें?"

"किराता, अरे, त्यांनीं वावगं तें काय केलं? त्यांनीं माझ्या शांतपणाची परीक्षा बघितली. बरं, तें असूं दे. तुझी तिरंदाजी कशी काय चालली आहे? पण तुला एक सांगतों कीं, तूं आतां पुन्हां संसाराच्या भानगडींत

पडूं नयेस हेंच बरं! तुझ्यासारख्या तारुण्यानं मुसमुसलेल्या पुरुषांना स्त्रीसंगतीची आवड असावी यांत कांहीं विशेषसं नवल नाहीं; पण बायको दुसरी आणि फजिती तिसरी, अशी जो एक आपल्यांत म्हण आहे, तिचा अनुभव, शेंकडा नव्वदांना तरी जन्माचा पश्चात्ताप होतो, हा एक सिद्धांतच समज."

"सोमदत्त, हें जर तुमचं म्हणणं खरं मानावं तर हाच तुमचा सिद्धांत, तुमच्या बाबतींत उलट साक्ष देणार नाहीं काय?"

"बाबारे, माझी गोष्ट कशाला हवी? माझं सगळंच निराळं! खुद्द स्वस्त्रीनं केलेला अपमान जर आपल्याच्यानं सहन होणार नाहीं तर द्वाड माणसाबरोबर ( अर्थपतीकडे बघत ) आपल्याला कसं वागतां येईल?"

सोमदत्ताची दृष्टि व भाषणांतील टोमणा यांवर अर्थपतीचें जरी पूर्ण लक्ष्य होतें, तरी या प्रसंगीं मध्यें बोलण्याचें धारिष्ट त्याला न होऊन म्हणा, किंवा किराताच्या तापट स्वभावाला भिऊन म्हणा, तो नुसता स्वतःशींच "अरे घुबडतोंड्या! हा टोमणा माझ्याकडे तिरकस बघून मला देतोस काय? बघून घेईन." इतकेंच पुटपुटला. तेव्हां सोमदत्त तें त्याचें पुटपुटणें ऐकून म्हणाला "किराता, समज कीं, कोणीं विनाकारण आपल्या तोंडांत भडकावली तर आपल्याच्यानं स्वस्थ कसं बसवणार? म्हणूनच मीं जाणून बुजून कजाग अशा दोन बायकांशीं लग्नं लावलीं आहेत. ज्यांची प्रकृति माझ्यासारखी धिमी नाहीं त्यांनीं लग्नच करूं नये हें फार बरं!"

ह्या शेवटच्या वाक्यानें अर्थपति स्वतःची स्तुति झाली असें समजून मोठ्या दिमाखानें म्हणाला "मग तर मग—मीं दुसरं लग्न केलं नाहीं हें बरं झालं कीं नाहीं, सांगा पाहूं?"

यावर किरातानें मोठ्या तिरस्कारानें "अहो बरं कसचं? लग्न न करण्यांत तुमचे मुख्य जे दोन मुद्दे ते जगाला दिसत नाहींत होय? जग कांहीं अंधळं नाहीं! बायको करायचा खर्च आणि तिची पुढची पोटपाणी,

वस्त्रालंकार वगैरे खर्चाची बाबत हा पहिला मुद्दा, आणि दुसरा द्रव्यासारख्या अमर वस्तूची मैत्री कायम राखणं! या दोन मुद्द्यांना घट्ट उराशीं कवटाळून तुम्हीं लग्न केलं नाहींतन् दुसरं काय?" असें उत्तर दिलें. तेव्हां त्यावर मोठ्या प्रौढीनें अर्थपती म्हणाला—"मी जो माझ्या मुलीचा—मालतीचा—जबर हुंडा घेणार आहें त्यांतली तरी मख्खी हीच आहे. शिवाय दुसरं असं कीं, आयत्या मिळालेल्या—वरदक्षिणा म्हणून थोतांड करून उपटलेल्या वस्तूपेक्षां प्रत्यक्ष कनवठीचे छन् छन् मोजून विकत घेतलेली वस्तु फारच प्रेमानं—कौतुकानं—इतकेंच नव्हे तर काळजीनं वापरली जाते हें काय नव्यानं सांगायला हवं? फारच काळजीनं वापरली जाते!"

"अथवा, गुलाम म्हणून राबवली जाते!"

'अं: ! मजेनं विकत घेतलेली वस्तु हौसेनंच वापरतात असा सर्वत्र अनुभव आहे. लहानपणापासून लालनपालनांत मुबलक द्रव्य खर्च करून पुढें लग्नाच्या वेळीं वरदक्षिणा म्हणून हुंडा द्यायचा याचा अर्थ काय? असल्या तऱ्हेनं आम्ही आपली थैली सैल करायला जसे बिलकुल तयार नाहीं, तद्वतच आमची थैलीही मुक्तकंठ व्हायला कबूल नाहीं."

"एकंदरींत, तुम्ही कन्याविक्रय करणार म्हणायचे?"

"छे, यांत कन्याविक्रय मुळींच होत नाहीं. कसा तो पहा—यः स्वकन्यार्थे वरात् द्रव्यप्रतिग्रहं करोति तं पतिसंग्रहणं वदन्ति। अशी भौमाशरांनीं स्वच्छ व्याख्या केलेली आहे. आलं ध्यानांत?"

"आपलं म्हणणें अगदीं यथार्थ आहे. कन्याविक्रय म्हणून ज्याला म्हणतात ती चूक आहे. त्याची दुरुस्ती आपण 'पतिसंग्रहणम्' या शब्दानं केली तीही रास्तच आहे; कारण, मोठ्या कुशलतेनं तयार केलेली भावली कारागीर कधीं तरी दान करतो का? ती विकरीकरितां तो बाजारांतच मांडतो."

"सोमदत्ता, अगदीं खरं बोललास! दुसरं असं आहे कीं, जसा माल तसं मोल."

"म्हणूनच मालतीची किंमत दहा हजार मोहोरा लावली आहे वाटतं?"

"किराता, अरे दहाच्च काय पण तिची किंमत वीस हजारांपेक्षांही अधिक आहे; कारण, ती तशीच मोहक आहे. बस्स! आजपासून तिची किंमत वीस हजार!"

"बरोबर आहे! कारागिराला योग्य मोबदला मिळालाच पाहिजे."

"सोमदत्ता, आतां कसं बरं गोडसं बोललास!"

"एकंदरींत, आपल्या मागणीइतकी रक्कम द्यायला जर कोणी तयार झाला नाहीं, तर आपण त्या सुकुमार आणि सतेज पुष्पाकडे स्वस्थ टकमक बघत राहून त्याला जागच्या जागींच अखेर कोमेजूं देणार म्हणायचे?"

"बस्स, बस्स! जास्त बोलायचं कारण नाहीं. तुझ्यासारख्या नामधारी निष्ठुर तिरंदाजाला त्यांतलं माधुर्य काय समजणार? माझी मालती म्हणजे पृथ्वीवर दुर्मिळ आणि नुसता स्पर्श झाला असतांही दुखवलं जाणारं असं तें भगवान् श्रीकृष्णांनींच प्रत्यक्ष इंद्राशीं युद्ध करून या भूतलावर आणिलेलं पारिजात पुष्प आहे, हें पक्कं ध्यानांत ठेव! पण इतकं कशाला? तिचं मी वाटेल तें करायला मुखत्यारच आहें समजलास!"

"एकंदरींत आपण मुखत्यारच आहांत म्हणायचे?"

"हो हो, अलबत! आहेंच आहें. तूं कोण विचारणार?"

"हें पहा—या गोष्टीचा आपण सरळपणानें विचार करूं. अर्थपतीचं म्हणणं अगदीं खरं आहे असं सध्यां धरून चालूं या. पण आधीं त्या शिलातलावर जरा बसून विश्रांति घेऊं आणि मग अर्थपतींच्या म्हणण्याचा नीट विचार करूं!"

सोमदत्ताची ही सूचना पसंत पडून अर्थपतीसह ते तिघे विश्रांति घेण्याकरितां शिलातलावर जाऊन बसतात तोंच पोटांत खवखवत असलेल्या किरातानें पुन्हां "मग एकंदरींत काय कीं, तुम्ही मालतीचे मुखत्यारच आहांत म्हणायचे?" असा व्याजोक्तीचा प्रश्न केल्याबरोबर अर्थपति रागानें

अगदीं खवळून जाऊन "मूर्खा, म्हणायचं कशाला? मी खराच मुखत्यार आहें. पुन्हां तेंच तेंच विचारायला लाज नाहीं वाटत?"

"लाज कशाला वाटेल? आपण पक्के निर्लज्जच आहोंत!" हें वाक्य, अर्थपतीच्या भाषणाला उत्तर म्हणून आकाशवाणीप्रमाणें एकदम त्याच्या कानांत घुसलें व तो विस्मयचकित होऊन, दोन हातांत तोंड झाकून एकाद्या भित्र्या भागूबाईप्रमाणें आंग थरथर कांपत स्वस्थ बसला. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला व तो "क्षमा करा! मी अपराधी आहें." असें वरील आकाशवाणीतुल्य विजेच्या कडकडाटाला भेदरून मोठ्या घाबऱ्या स्वरानें म्हणाला. वास्तविक पाहिलें असतां ती आकाशवाणी नव्हती, विजेचा कडकडाट नव्हता किंवा मेघांचा गडगडाटही नव्हता. एखाद्या नागिणीप्रमाणें संतप्त होऊन फूत्कार करीत त्या स्थळीं एकदम अवतीर्ण झालेल्या मंदिरेसह विजयेच्या तोंडचे ते शब्द मानवीच होते. असें जर होतें तर, अर्थपतीनें ज्या स्त्रियांच्या नवऱ्याच्या तोंडांत यःकश्चित् गोष्टीबद्दल भडकावून आपला शीघ्रकोप व्यक्त केला व गुरुदक्षिणा म्हणून दोन हजार मोहोरा पचविल्या, त्याच सोमदत्ताच्या स्त्रियांपुढें 'क्षम्यताम्, त्वमेव शरणं मम' म्हणून बिल्ली बनावें हें आश्चर्य नव्हे काय? परंतु यांत आश्चर्य असें मुळींच कांहीं नाहीं; कारण, ज्या महान् पतिव्रता व ज्यांनां खोटें म्हणून तिळमात्र खपत नसे अशा त्या दोघी कजाग व भांडखोर जरी होत्या, तरी त्या दोघींच्या पुढें जेथले सर्व नागरिक, त्यांच्या सच्छीलामुळें थरथर कांपत असत, तेथें भोंदु, आपमतलबी, चिक्कू वगैरे दुर्गुणांचा मूर्तिमंत पुतळा जो अर्थपति त्यानें भेदरून जाऊन क्षमा मागावी यांत नवल तें कोणचें? असो.

"क्षमा मागायला आपल्या बाच्या पदरचं काय जातं! दुसऱ्याच्या दोन हजार मोहरा गिळंकृत करायची कांहीं तरी शरम असायला हवी होती!"

"मेल्याच्या अंगावरच्या लकतऱ्या पहा! जसा कांहीं 'उदे उदे' करणारा भुत्याच दुसरा!"

" काय रे, कुठें आहेत आमच्या दोन हजार मोहरा ? "

" मेला म्हणतो माझ्या घरावर जप्ती आली, अन् आमचे हे भोळे सांब आपलं घर गहाण टाकून त्याच्यावरची जप्ती उठवतात ! काय पण न्याय ?"

" मेल्या, आपल्या पोरीचे दागिने गहाण टाकले असतेस तर काय झालं असतं ? मेल्या ढोंग्याला जशी अगदीं भीक लागली आहे ? होतं नव्हतं तेवढं घातलं एकदां या मेल्याच्या उरावर ? म्हटलं आतां खायचं काय ?"

" त्याचा विचार बघतां येईल; पण हें पहा, असं कडू भाषण बोलूं नये. दुसऱ्याचं मन दुखावतं. काय सांगावं ? आजपर्यंत या माझ्या देशाकरितां मी अनेक लढायांमधून शत्रूशीं लढून विजयी होऊन आलों आहें. या देहावर त्या लढायांतले शत्रूचे अनेक वार अद्यापि दृग्गोचर होत आहेत. तसल्या त्या प्रसंगीं, तुम्हां दोघींनीं आपापल्या उत्तम भाषणांनीं गुंफलेलीं चिलखतं—शिरस्त्राणं-जर माझ्या जवळ असतीं तर काय मोठी बहार झाली असती ! म्हणून म्हणतों कीं, अझून तरी तसलीं तीं चिलखतं माझ्या आंगावर न चढवतां उगीच दुसऱ्याला देऊन मला विन्मुख करूं नका."

" कां, जीभ फारशी चुरचुरायला लागली आहे ? "

" चोर तर चोरन् शिरजोर ! "

" ह्या विजयेचा तडाका विसरलांत वाटतं ? "

" कोण मी ? छे, असं कसं होईल ? ज्याला विजयेच्या तडाका माहीत नाहीं तो दुर्दैवीच समजला पाहिजे. मदिरेचाही प्रभाव कांहीं कमी नाहीं. दोघी अगदीं सख्ख्या सावत्र बहिणी. एका कवीनं ह्या दोघींची कीर्ति मोठ्या गोड शब्दांत गाइली आहे. तो म्हणतो—

[ शंकराभरण—त्रिताल ]

**विजया मदिरा बहिणी असती लौकिक त्यांचा ऐकोनी**
**शैव सेविती विजया तैसी मदिरा वामी ढंगांनीं ॥ ध्रु० ॥**
**संगति त्यांची करिती त्यांसी गुंगविती ह्या रंगांनीं ॥**

**लक्ष्मीवरतो अक्काबाई विजय मिळविते झुंजोनी ॥ १ ॥**
**अगम्य दारुण महिमा यांचा वदतो ब्रह्मा डोलोनी ॥**
**वाचस्पतिही वर्णु शकेना काय वदावें मर्त्यांनीं ॥ २ ॥**
**नांदति ज्याच्या सदनीं दोघी सुदैव त्याचें या कवनीं ॥**
**वर्णु शकेना कवि परि घाली नमस्कार त्यांलागोनी ॥ ३ ॥**

"बस्स, पुरे झालं ! असली व्याजोक्ति न समजण्याइतकी कांहीं मी मूर्ख नाहीं, समजलं? पण जें तोंड दुसऱ्यांच्या देखत आपल्या लग्नाच्या बायकांची निंदा करतं, तें तोंड ही रस्त्यावरची धूळ फाकीत जर स्वस्थ बसलं तर फार चांगलं असं मला वाटतं."

"बहुतेक सर्व माणसं लहानपणीं जरी धूळ खातात, तरी त्यांत मोठंसं असं कांहींच नाहीं; कारण, मनुष्याचा देह हा धुळीपासूनच उत्पन्न झालेला असून अखेर मेल्यावरही त्याची धूळच व्हायची असते!"

"हें पहा, बऱ्या बोलानं आतां तें आपलं एरंडाचं गुऱ्हाळ बंद करा; नाहीं तर ही मंदिरा चांगलाच खाऊ देईल हें लक्षांत ठेवा!"

"परवांपासूनच मी तुम्हां दोघींच्या खाऊकरतां कसा अगदीं हपापून गेलों आहें. द्या तर मग तो लवकर पाहूं?"

"अस्सं काय? मंदिरे, बघतेस काय? घे तीं पलीकडे पडलेलीं उसाचीं कांडीं पाहूं! परवांसारखा यांना दोघीजणीं एकदमच खाऊ देऊं."

अहाहा! काय तो त्या वेळचा देखावा! नवरे बायकांना मारतांना पुष्कळांनीं बघितलें असेल; परंतु नवऱ्यांना बायकांनीं मारतांना बघण्याचा प्रसंग वाचकांना क्वचितच आला असेल. षड्विकारांपैकीं क्रोधाला आपल्या शांतपणाच्या दिव्य खड्गानें जिंकणारा आमचा नायक—स्त्रियांकडून मार खाणारा सोमदत्त—या वेळीं आपल्या अंगावर बसणारे उंसाच्या कांड्यांचे तडाखे म्हणजे प्रत्यक्ष पवित्र अशा अत्युच्च हिमशैल शिखरांवरून भूतलावर धाडधाड उड्या घेणाऱ्या गंगौघाचेच जोरदार तडाके समजत होता. मार

खाणें काय, किंवा अन्न खाणें काय या दोहोंतील अंतर जो विसरला, तो प्रत्यक्ष साधु नव्हे असें कोण म्हणेल! विजया आणि मदिरा यांनीं सोमदत्ताला उंसाच्या कांड्यांनीं यथेच्छ बडवला तरी झंजावाताला कधींही दाद न देणाऱ्या अचल मेरूप्रमाणेंच तो शांत, स्थिर व गंभीर असाच जागच्या जागीं बसलेला होता. किरात आणि अर्थपति मात्र भेदरून दूर जाऊन उभे राहिले होते. मारमारून उंसाचीं कांडीं मोडून पडलीं, व त्या दोघींचे हातही दुखायला लागले. तेव्हां त्या स्वस्थ उभ्या राहिलेल्या पाहून, आमच्या सोमदत्तानें उंसाचें एक मोडकें कांडें उचलून घेतलें, व तें दांतांनीं सोलून तो अखेरीस मोठ्या विनोदानें ऊंस खात खातच म्हणाला कीं, "स्त्रियांकडून मार खाणं ही पूर्वार्जित मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे हें आजवर मला ठाऊक नव्हतं; आज तें समजलं. मार खायला हरकत नाहीं. हवा तर प्रत्येक नवऱ्यानं आपल्या बायकोकडून रोज मार खावा; पण मी जसा मार खाल्ल्याचं पर्यवसान म्हणून—हा गोड मिठास असा या भूमंडलावरील अमृताप्रमाणें इक्षुरस आनंदानें चाखीत बसलों आहें, तद्वत् प्रत्येकाला चाखायला मिळण्याचं पुण्य जर त्याच्या पदरीं बांधलेलें असेल, तर तें प्रथम अजमावून पाहून, नंतर खुशाल खावा!"

इतकें बोलून तो स्वस्थ राहिला. कारण, त्याच वेळीं त्या ठिकाणाकडे एक परकीय गृहस्थ आपल्या एका नोकरासह तेथील तो अद्‌भुत प्रकार बघून मोठ्या विस्मयानें व आश्चर्यचकित अशा मुद्रेनें कांहीं स्वगत असा विचार करीत येत असलेला दृष्टीस पडला. तो परकीय गृहस्थ कोण असावा बरें? कोणी का असेना! समजेल आपोआप. पण प्रथम त्याचे स्वगत विचार काय चालले आहेत, ते तर ऐकूं या।

"हा काय चमत्कार बोवा! हा देश तरी कोण! एथला हा प्रकार कांहीं चमत्कारिकच दिसतो आहे! त्या दोघी स्त्रिया त्या पुरुषाला यथेच्छ मारीत आहेत आणि तो तें मोडकं उसाचं कांडं आनंदी मुद्रेनं स्वस्थपणं खात

असून ते दोघे पलीकडे भित्र्यासारखे उभे आहेत! मी वाट चालतां चालतां पृथ्वीवरून एखाद्या भलत्याच ग्रहावर तर आलों नाहींना! छे, पण असं कसं होईल? आपल्या या भ्रांतीचा निकाल त्या माणसांना—पण तीं माणसंच आहेत ना! चला तर खरे पुढें! त्यांनां विचारून आपल्या भ्रांतीचा निकाल करून घेऊं या!" याप्रमाणें आत्मगत विचार करीत करीत तो गृहस्थ सोमदत्ताच्या नजीक येऊन ठेपल्यावर म्हणतो "सभ्यजनहो, गोश्रृंगदेशांतील पुष्पपुरी राजधानीला आपल्या बुद्धिमत्तेनं शोभविणारे सोमदत्त ह्या वेळीं कुठें असतील हें आपणांला माहीत आहे काय?"

हें वाक्य कानीं पडतांच किरात तेथें आला, व त्यानें "आपण कोठून आलांत? आपलं त्यांच्याशीं काय काम आहे?" असा त्या गृहस्थाला प्रश्न केला तेव्हां "मी मायापूर नगरीच्या महाराजांचा वकील असून, त्यांच्याकडून त्यांनां देण्याकारितां एक निमंत्रणपत्रिका आणिली आहे. मायापूरच्या मुख्य प्रधानकीचीं वस्त्रं सोमदत्तांनीं स्वीकारावींत अशी आमच्या महाराजांची इच्छा आहे!" हें ऐकतांच "तुम्ही ज्याचा शोध करीत आहांत तो सोमदत्त हा पहा मी इथें आहें" असें सोमदत्तानें स्वतांच सांगितलें; तेव्हां तो वकील म्हणाला "माझी थट्टा करूं नका. जो पुरुष मोठा ज्ञाता मानला जातो आणि ज्याच्याकारितां आमच्या महाराजांनीं मोठा अमूल्य नजराणा धाडला आहे तो का तुमच्यासारखा—कुरूप, वेडगळ आणि स्त्रियांकडून मार खाणारा असेल!"

मदिरा एकदम उसळून म्हणते "कां बरं! आम्ही दोघी यांच्या लग्नाच्या बायका आहोंत! यांनां आम्ही मारूं नाहीं तर यांची पूजा करूं! तुम्ही हो कोण त्यावर टीका करणार?"

"बाई, मीं तुमच्यावर नाहीं टीका केली."

"मग कोणावर केलीत? आमच्या घरधन्यांवर केलीत होय? ऐकलंत का? शिका—शिका—यांच्याकडून तरी थोडी अक्कल शिका! अंगांत

बंडी सुद्धां धड नाहीं. अर्धवट बंद तुटलेलीन् फाटकी. घ्या टाकून ती. असल्या या बावळटाला मोठा ज्ञाता समजून, राजेरजवाडे नजराणे धाडतात अन् मुख्य प्रधानकी पत्करा म्हणतात।"

हें संभाषण चाललें असतां दूर जाऊन उभा राहिलेला अर्थपति तेथें आला व पुढें होऊन म्हणाला "अहो, ते सत्यज्ञानस्थलं न जानंति, अक्कलस्तत्र दुर्लभः ? अस्य कारणं इत्कंच कीं ज्ञानशून्यं जनावस्था ! महाराजाः क्काक्लं ? एतस्मात् भवति नक्कलं !"

अशा तऱ्हेचें हें अनपेक्षित भाषण ऐकून सोमदत्ताशिवाय तेथील सर्व मंडळी विस्मयचकित झाली खरी, परंतु विजया आणि मदिरा यांना तो त्याचा पाचरेसारखा मध्येंच घुसून अगांतुकीनें केलेला भाषणचत्कार सहन न होऊन त्या वाघिणीसारख्या खवळून त्याच्या अंगावर धावल्या व त्या तिघांत पुढीलप्रमाणें भाषणचमत्कार झाला.

"ए, ती तुझी संस्कृताची दिवटी साफ विजवून टाक ! आम्हीं बोललों म्हणून तुला इथें बोलण्याच्या अधिकार नाहीं समजलास !"
असें मदिरा बोलल्यावर—

"आमच्या घरधन्यांना लोकांनीं ज्ञाता म्हटलं म्हणून मेल्या, तुझ्या अंगाला कां एवढी आग लागली ? मेला खापरतोंड्या कसा आतां गप्प उभा आहे पहा !" असें विजया म्हणाली. तेव्हां मध्येंच किरात म्हणतो, 'अहो, हे अर्थपति म्हणजे निव्वळ निरर्थक अशा खोट्या शब्दप्रयोगांची निव्वळ गोधडी आहेत, हें नाहींका माहीत ? नसेल तर ऐका आतां त्यांचं ज्ञान !"

"भाषातूलिकाप्रच्छेदः वा गीर्वाणभाषायां गोधडी भवति! टीका कर्तव्य कारणं क्वास्ति ? पंडितोऽहं यस्मिन् शंका नास्ति." हें अर्थपतीचें भाषण ऐकतांच मदिरा क्रोधानें खवळून म्हणते, "एकदां सांगितलं—पुन्हां सांगतें—तें तुझें तोंड बंद कर ! नाहींतर कणिक मऊ होईल—संभाळ !"

"गोधूमपिष्ट मृदुकर्तव्य कारणं नास्ति. क्षमस्व मुखमावृतामि." इतकें बोलून, जनावराला मुसकें घालतात त्याप्रमाणें अर्थपतीनें आपल्या दोन्ही तळहातांनीं आपलें तोंड दाबून धरल्यावर विजया म्हणते—

"मेल्याला वाटतं कीं, आपण असं संस्कृताचं फाटकं तरट छतासारखं पसरलं म्हणजे आपल्यालाच सोमदत्त समजून, राजे महाराजे नजराणे देतील!"

"ज्या थोर ज्ञात्याच्या बुद्धिप्रभावावर लुब्ध होऊन, आमच्या महाराजांनीं ही निमंत्रणपत्रिका व हा शिपायाच्या हातांतील ताटांतला नजराणा धाडला आहे ते जर आपणच असाल तर, आमचे महाराज निव्वळ फसले असं म्हणायला कांहींएक हरकत नाहीं."

हें वकिलाचें भाषण ऐकून मदिरा म्हणते, "तें हो कसं? सारी नवखंड पृथ्वी जरी हिंडलांत तरी हेच ते सोमदत्त असंच तुम्हांला सगळे सांगतील हो!"

सोमदत्त म्हणतो "वकीलसाहेब, मदनाला लाजवणारी मुखश्री, उंची वस्त्रं आणि नाना तऱ्हेचे अलंकार हीं का तुम्ही ज्ञानाभरणं समजतां? ज्ञात्याचे हे खरे अलंकार नव्हेत. नेमस्तपणा, शहाणपणा, साधुत्व, प्रामाणिकपणा, सहनशीलता आणि सत्यत्व या अलंकारांनीं जो सजलेला असतो तोच खरा पंडित!"

"वकील, ऐकलंतच आतां! घ्या तर तें नजराण्याचें ताट. ह्या अर्थपतीनं आमचं घर इकडून गहाण टाकवून दोन हजार मोहोरा गिळंकृत केल्या आहेत. हा नजराणा विकून घर तरी सोडवतां येईल!" विजयेचें हें भाषण ऐकून अर्थपति मोठ्या सभ्यपणानें म्हणतो—

"परमेश्वर, अहं मोहरां न गिळंकृतं कुर्यामि. असत्यं न वदतां. तानि मोहरानि सोमदत्तेन गुरुदक्षिण म्हणतव्येन अस्माकं दादितव्यं."

"हो, क्रोध कसा जिंकावा हें त्यांनीं मला शिकवलं म्हणून मी त्यांना

त्या मोहोरा गुरुदक्षिणा म्हणून दिल्या आहेत."

"श्रूयतां मम छात्रवचनं."

"कां, झालं का पुन्हां तें तुझं एरंडाचं गुऱ्हाळ सुरू? तूं लोकांपासून गुरुदक्षिणा घेतोस तशी मलाही दे. मी होतें तुझी गुरुजीण." असें म्हणून मदिरा त्याला बडवूं लागली व "घे, द्रव्यलोभ सोडण्याचा धडा घे! टाक गुरुदक्षिणा!" असें बोलत असतां अर्थपति "शिकलों, शिकलों" असें म्हणून, वकिलाच्या शिपायाच्या हातांतील नजराण्याचं ताट एकदम हिसकावून घेऊन मदिरेला दिल्यावर "वहिनी, ही घ्या गुरुदक्षिणा! आयती चालून आलेली लक्ष्मी परत कोण दवडणार!" असें बोलला. तेव्हां मदिरा "मेल्या, हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण करतोस का?" असें म्हणून त्याला मारायला धावली. तेव्हां तो पळून गेल्यावर वकील म्हणाला "हा काय चोरांचा बाजार आहे कीं काय?"

हा सर्व प्रकार घडत असतां विजया सोमदत्ताजवळ जाऊन त्याला म्हणाली "घेणार ना हा नजराणा? चालून आलेल्या लक्ष्मीकडे पाठ कोण करील?" हे शब्द ऐकतांच त्या नजराण्याकडे आपली पाठ करून सोमदत्त म्हणाला "ही पहा ह्या सोमदत्तानं केली. अनायासानं चालून आलेली लक्ष्मी मोठी खोटी असते. ती केव्हां खड्ड्यांत टाकील त्याचा नेम नाहीं." हें ऐकून निराश झालेली मदिरा म्हणते "तुम्हांला नको असेल तर तुम्ही नका घेऊं. तुम्ही निमंत्रणपत्रिका घ्या नि आम्ही नजराणा घेतों! असंच ना?" मदिरेचें बोलणें एथें जों संपतें तोंच "ही निमंत्रणपत्रिका घ्यावी" असें म्हणून वकिलानें ती सोमदत्ताच्या हातीं दिली. तेव्हां विजया म्हणाली, "द्या आतां तो नजराणा इकडे." त्यावर वकील "बाई जरा दम धरा." असें म्हणाला तोंच इतक्यांत सोमदत्त पत्रिका वाचून म्हणतो—

"स्वतंत्र माणसानं दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें न वागणं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे; पण माझं म्हणणं असं आहे कीं, धनाचा धिक्कार

आणि दारिद्याची प्रीति अंगीं असणं हेंच बरं. कारण, त्यापासून लोभ-शत्रूला निरिच्छतेच्या शस्त्रानं आपण जिंकूं शकतों. अंगीं निरिच्छता असणं हा एक ईश्वरी गुण आहे. हा गुण जसजसा वाढतो तसतसं मनुष्य प्राण्याच्या ठिकाणीं ईश्वरी सादृश्य येत जातं. याचं कारण,

**अभंग.**

**सर्वसत्ताधारी ईश जगकारी ॥ पूर्णत्वानें भारी भरलासे ॥ १ ॥**
**अपेक्षेत ऐसा मुळीं नाहीं खासा ॥ ईश्वर परीसा तुम्ही जनहो २**

लग्नादि समारंभांत अथवा सणासुदींच्या दिवसांत सोन्यारुप्यांचे रत्नजडित अलंकार घालून मिरवतांनां आणि ऐषआरामी करून थोरवी दाखवितांनां हें जग दृष्टीस पडलं म्हणजे मला मोठा आनंद होतो. मी फार सुखी आहें असं मला वाटतं. कारण, जे जे पदार्थ मी डोळ्यांनीं बघतों ते ते पदार्थ मिळविण्याकरितां अनंत खटपटी कराव्या लागतात. त्यांचं जतन करण्याकरितां जीव धोक्यांत घालावा लागतो. तेव्हां जो जीव परमेश्वरभजनांत गुंतवायचा तो या नाशवंत वस्तूंच्या रक्षणाकरितां गुंतवणं मला आवडत नाहीं, म्हणून त्या वस्तूही मला नकोत! अहो, फार कशाला! माझ्यापाशीं पैका असता तर मी ह्या तुटक्या बंदांच्या बंडीवर घालायला एक धडसा आंगरखा शिववला असता; पण पैशाचा विटाळ न व्हावा हीच खरी इच्छा असल्यामुळें धडसा अंगरखाही करण्याची वासना होत नाहीं." सोमदत्ताचा हा उपदेश ऐकून तो वकील म्हणतो "आपलं बोलणं सयुक्तिक आहे. हा नजराणा मी परत घेऊन जातों. पण विनंतीपत्राप्रमाणें आपण माझ्याबरोबर आमच्या महाराजांकडे येणार ना?"

हें बोलणें ऐकून निराशेनें अगदींच व्याप्त झालेली मदिरा म्हणते "म्हणजे? नजराणा परत घेऊन जाणार ते जाणारच, आणखी वरती ह्यांनाही घेऊन जाणार कीं काय?" विजया रागानें म्हणते, "जा, चालते व्हा आपला नजराणा घेऊन! ह्यानां आम्ही आमच्यापासून कधींसुद्धां दूर होऊं देणार नाहीं."

आपल्या दोन्ही स्त्रियांचें म्हणणें स्वस्थचित्तानें ऐकून घेऊन सोमदत्त त्या पत्र घेऊन येणाऱ्या वकीलाला म्हणाला—"वकीलसाहेब, तुमच्या महाराजांना माझा एक निरोप कळवायची मेहेरबानी करा. त्यांना म्हणावं-मलभलत्याच गोष्टींत थोरवी आणि प्रतिष्ठा आहे असं मानून जे राजेलोक खूष होतात त्यांची ती भ्रांति घालवणं, संपत्तीचे जे कांहीं विशिष्ट उपयोग आहेत त्याकरितांच ती पाहिजे--एरव्हीं ती तुच्छ आहे असं शिकविणं आणि राज्य हा एक मोठा संसार असल्याकारणानं त्याचा कारभार मोठ्या दक्षतेनं करून अपरंपार कीर्ति मिळविण्याबद्दल बोध करणं—सारांश काय कीं, ह्या जगांत आपण वागावं कसं आणि आपण कोणत्यारीतीनं चाललं असतां आपला शेवट गोड होईल- ह्या गोष्टींचा राजे लोकांना उपदेश करणं—वगैरे गोष्टी मला सांगतां येणार नाहींत, किंवा प्रत्युपकार करण्याची मला इच्छा नाहीं म्हणून मी आपल्याकडे येत नाहीं असं नाहीं; तर, ह्या आमच्या प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां माझा स्वतंत्रतेनं वागण्याचा प्रकार इथल्या लोकांना सोसत नाहीं, तेव्हां आपल्यासारख्या राजसत्ताक राज्यांत माझा निस्पृहीपणा कसा सोसणार ? अशा निस्पृही स्वभावाला स्वेच्छेनं दुसऱ्याची ताबेदारी पतकरणं योग्य नाहीं; म्हणून मी आपल्या दरबारीं येत नाहीं याबद्दल मला क्षमा असावी."

हें बोलणें ऐकून निरुपायानें तो वकील बरोबरच्या शिपायांसह नजराणा घेऊन परत जायला निघाला. तेव्हां जातांना म्हणाला "आपण सांगितलेला निरोप मी आमच्या महाराजांनां सांगतों." इतकें बोलून तो निघून गेला व माराच्या भीतीनें पळून जाऊन लपून बसलेला अर्थपति मोठ्या दिमाखानें पुढें येऊन म्हणाला "झालं, घालवलंस अखेर हातचं ? कमनशीबीच तूं, त्याला कोण काय करणार ?"

"हें पहा, एखादी वस्तु हस्तगत होईपर्यंतच तिच्या उत्तमपणाबद्दलच्या विचारांत आपलं मन गर्क झालेलं असतं; पण एकदां का ती प्राप्त

झाली म्हणजे अगदीं क्षुद्रवत् वाटते. तेव्हां असं पहा कीं, जी वस्तु प्रथम उत्तम वाटली ती अखेरपर्यंत तशीच वाटत रहावी हें बरं नाहीं का?" हें ऐकून विजया संतापानें वेडावून म्हणते "ताटांत जेव म्हटलं तर म्हणे करटीच बरी अशांतलंच हें बोलणं!" ह्यावर—

"कसं अगदीं खरं बोललांत वहिनी!" अशा तऱ्हेचें हांजीहांजी-खोरपणाचें अर्थपतीचें वाक्य ऐकून मदिरा रागानें म्हणते "खरं म्हणजे? खरंच खरं! दैव देतं नि कर्म नेतं न् दुसरं काय?"

"चल ग मदिरे, घरीं जाऊं. बघतें आतां यांचा तमाशा!" इतकें बोलून विजया सोमदत्ताकडे मोठ्या तीक्ष्ण नजरेनें पाहून पुन्हां "ऐकलंत का? पालथ्या घड्यावर पाणी म्हणा! पण आपलं बोलतें! लाज तर कशी अगदीं वाटून प्यायले आहेत; पण सांगतें. घरीं जेवायला यायच्या अगोदर धान्य पुढें धाडून देण्याची व्यवस्था करा नि मग उंबऱ्यांत पाय टाका. साऱ्याच मेल्या चेष्टा! माणसानं उगीच तरी किती बसावं!" असें म्हणाली. व तोऱ्यातोऱ्यानें मदिरेसह तेथून निघून गेली, त्यामुळें अर्थपतीला बरेंचसें मोकळें वाटून तो सोमदत्ताला म्हणाला "मित्रा, फार वाईट वाटतं?" "कशाबद्दल?" "तुझ्या दुःखद स्थितीबद्दल. या वेळीं तुझ्या उपयोगीं मला पडतां येऊं नये हें मोठं दुर्दैव आहे."

हें अशा तऱ्हेचें दांभिक भाषण ऐकून सोमदत्ताला जरी त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं, तरी किराताला ते त्याचे शब्द ऐकून विस्मय वाटण्याच्या ऐवजीं संताप आला व तो त्या संतापाच्या भरांत एकदम "दुर्दैवाचें सुदैव करणं तुमच्यासारख्याला फारच सोपं आहे. वीस हजारांच्या ऐवजीं दोन हजार घ्या, मालती द्या आणि ऋणमुक्त व्हा" असें जेव्हां बोलला, तेव्हां अर्थपति विषाद पावून "बाप पाव्हणा आला म्हणून रेडा दुभता होतो कीं काय? माझ्या मालतीची इतकी हलकी किंमत करायला मी अजून इतका हलकट झालों नाहीं, खरें कीं नाहीं सोमदत्ता?"

" कोण म्हणतो ?"

" तर मग सोमदत्तांना आपल्या घरीं जेवायला घेऊन जा."

" माझी कुठें ना आहे ! पण यांचीं व्रतं फारच अवघड आहेत. यानं परान्न सोडलं आहे ना ! त्याला मी काय करूं ? बरं, मित्रांनो मी जातों आतां घरीं. बराच वेळ झाला. मालती विचारी वाट पहात बसली असेल." इतकें बोलून त्या दोघांचा निरोप मिळण्याची वाट न बघतांच अर्थपतीनें आपल्या घराचा रस्ता धरला; कारण अधिक वादविवादानें अंगावर बाजू येऊन सोमदत्ताच्या जेवण्याचें लचांड आपल्या गळ्यांत पडल्यास विनाकारण खर्चाचा बोजा संभाळावा लागण्याची त्याला भीति पडली होती. अर्थपति गेल्यावर सोमदत्त व किरात यांमध्येंपुढीलप्रमाणें संवाद झाला.

" किराता, इतका वेळ घडलेला सर्व प्रकार तूं बघितलासच. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून मला मारलं त्या सर्वांचा प्रतिकार मला खात्रीनंच करतां आला असता; नसता असं नाहीं. पण क्रोधाला वश होण्यापेक्षां तो जिंकणं जसं चांगलं, तद्वतच लोभाचा पाडाव निरिच्छेतेनंच करणं उत्तम असं आज मीं सिद्ध करून दाखिवलं. बाबारे, परमेश्वराचे मुख्य जे दोन गुण न्यायीपणा आणि दयालुता, त्यांच्यावर आपण पूर्ण श्रद्धा ठेवावी, म्हणजे आपणांला षड्-विकारांपासून हां हां म्हणतां दूर होतां येतं, हें पक्कं लक्ष्यांत ठेव."

पण हे दोन गुण प्रपंचांत योग्य तऱ्हेनं वहिवाटत असलेले दिसत नाहींत. दुष्टांचा छल आणि साधूंचं कल्याण व्हावं हें योग्य असतां चहूंकडे पहावं तों साधूंचा छल होऊन, दुष्ट ऐषआरामांत गुंग असलेले दृष्टीस पडतात. कितीएक तर पापांचीं केवळ घरं असतां, त्यांना मोठाल्या पदव्या मिळतात. त्यांच्या घरीं लक्ष्मी पाणी भरीत असते. तेव्हां हें कसं ?"

" असं जर आहे तर याची कधीं तरी उलटापालट व्हायला हवी कीं नको ?"

" तशी जर न होईल तर परमेश्वराच्या न्यायीपणाला आणि दयालु-

त्याला बाध येईल. "

" बरं, ही गोष्ट ते लोक जिवंत असतांना जर घडत नाहीं तर मग ती केव्हां घडेल !

" ह्याला मार्ग एकच दिसतो. तो हा कीं, मनुष्य मरण पावल्यावर त्याला एक विशेष अवस्था प्राप्त झाली पाहिजे !"

" ह्यावरून तुझी खात्री होत नाहीं काय कीं, मरणानंतर मनुष्याला परलोकीं आपल्या पापाचा झाडा द्यावा लागतो ?"

" तशी कल्पना केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. ह्याचकरितां परलोकचं अस्तित्व मानणं योग्य आहे."

" हें जर खरं आहे, तर या जगांत आपण किती विचारानं वागलं पाहिजे हें का सांगायला हवं ? आपण परमेश्वरावर सर्व भार टाकून, त्याचे जे मुख्य दोन गुण ते सर्वांच्या आटोक्यांत आणून द्यायचा प्रयत्न केला पाहिजे. प्रापंचिक व्यवहारांत–विचारीपणा, प्रामाणिकपणा आणि सदाचरण या नीतिशास्त्रांतल्या तिन्ही गोष्टींची, आपण समाजांत आवड उत्पन्न केली पाहिजे. माझी आई जशी बायकांचा सुईणपणा करीत होती तद्वतच आपण लोकांच्या मनाचा सुईणपणा केला पाहिजे. बरं, पण कायरे, अलीकडे तूं जो एक प्रकारचा सुईणपणा करून जय मिळविला आहेस त्याबद्दल मला कांहींच बोलला नाहींस हें कसं "

" मर्यादा आणि भीति यांना वश झाल्यामुळेंच मी त्याबद्दल कांहींच बोललों नाहीं. शिवाय, ती गोष्ट अद्यापि पुरी सिद्धीसही गेलेली नाहीं. अर्थपतीची मोठी धोंड वलांडायची आहे. या कामांत मी आपल्या वालखिल्याच्या मदतीनं यशस्वी होईन असं म्हणतों."

" एकंदरींत तूं पुन्हां संसारी होणार म्हणायचा ! हो बापडा !"

" प्रयत्न तर खराच. पहावी प्रभुसत्ता ! बरं, आतां घरीं जायचं ना ? वहिनींनीं जातांना बजावलेलं सर्व माझ्या लक्षांत आहे. ताबडतोब आत्तांच

ती सर्व व्यवस्था होईल. पण हें वर बघितलंत का? वैभवसिंहासनाच्या मध्यावर आलेल्या ह्या सूर्याला पाहून आतांपर्यंत आपल्या पुढें पुढें करणाऱ्या आपल्याच नव्हेत तर सर्व पदार्थांच्या सावल्या पादतलांत अदृश्य होऊन गेल्या आहेत."

"कवित्वाच्या दृष्टीनें जसं तुझं म्हणणें बरोबर आहे, तद्वतच दरएक पदार्थाला किरण आणि छाया प्राप्त करून देणारा व आपल्याबरोबर घेऊन जाणारा हा सूर्यच आहे."

अशा तऱ्हेचें भाषण करीत ते दोघे चालत चालत बरेचसे दूर गेल्यावर बाजारपेठेंत किरातानें एका दुकानदाराला, सोमदत्ताच्या घरीं दोनचार महिने पुरेल इतकें धान्य वगैरे संसारिक सामुग्री धाडून देण्याबद्दल सांगून ते आपापल्या घरीं जात असतां, त्यांनां रस्त्यांतच दुरून वालखिल्य येत असलेला जरी दिसला, तरी ते त्याच्याशीं बोलत उभे राहून, स्वतांची पुढील कामें करण्याचा, अगर तो ज्या कामाकारितां जात असेल त्या त्याच्या कामाचा वेळ व्यर्थ दवडूं नये म्हणून निघून गेले.

---

## प्रकरण तिसरें

# यक्षदर्शन.

---

वेळ माध्यान्हीचा झाला होता. हांजीहांजीखोरांप्रमाणें नेहमीं पुढें पुढें करणाऱ्या सर्व वस्तूंच्या सावल्या तत्तलगत होऊन, वैभव जाऊं लागल्यानंतर, हांजीहांजीखोर नोकरचाकर जसे यजमानापासून पोबारा करण्याच्या विचारांत मग्न झालेले असतात, तद्वतच पादगत छाया पृष्ठभागाकडे पळून जाण्याची संधी शोधीत होत्या. या सर्वांचें कारण या वेळीं ऐन माध्यान्हीं

खस्वास्तिकांतील आपल्या वैभवसिंहासनावर बसून–प्रखर अशा किरणांनीं अज्ञजनांवर तापदायक वाटणारा व हलेले हलके आपला तो प्रखरपणा सोडून पराजित राजाप्रमाणें अंगीं मार्दव स्वीकारणारा सूर्यराजच होय. ऐन माध्यान्हीचा प्रखर सूर्य जसा भूतलावरील अखिल वस्तूंना तापदायक भासतो, तद्वतच स्वप्रजाजनांना गांजून आनंद मानणारा भूपतिही वाटतो, ही गोष्ट कवित्वाच्या दृष्टीनें खरीशी वाटते; परंतु ती तात्पुरती लाक्षणिक असते. खरें पाहिलें असतां एका परमेश्वरानेंच प्रखर सूर्य व क्रूर राजा ह्या दोहोंची उत्पत्ति केलेली असून, त्या दोघांकडून भिन्न मार्गांच्या अशा कामगिऱ्याही तोच करवून घेतो. प्रखर रवीचा ताप आणि क्रूर राजाचा छल या दोन्ही गोष्टी बाह्यात्कारीं जरी समसमानच आहेत अशा भासतात, तरी त्या दोहोंत महदंतर आहे. क्रूर राजा स्वप्रजेला छळून आनंदमग्न होतो व पृथ्वीच्या शापांनीं अखेरीस रौरवनरकाचें साधन करतो. सूर्यकिरण तापदायकसे वाटतात खरे, परंतु तेच पुढें धनधान्याची समद्धि करून पृथ्वीला सुखोपभोगी करण्यास कारणीभूत होतात; म्हणून–क्रूर राजाप्रमाणें–सूर्याला पृथ्वीचे शाप न मिळतां सुगंधित अशा जलयुक्त फलपुष्पांच्या अर्घ्यप्रदानानें तो रोज आम्हांकडून पूजिला जाऊन प्रार्थित होतो.

असो. अशा या ऐन मध्यान्हीच्या वेळीं, वालखिल्य त्याच्या मुद्रेवरून, तो कांहींतरी गूढ विचारांत मग्न असून, आपल्याशींच पुटपुटत चालला होता असें स्पष्ट दिसत होतें. काय बरें असें त्याचें मोठें गूढ कार्य असावें कीं, जो स्वगत विचारांत इतका गुंग झाल्यामुळें त्याला त्याच्या समोरून त्याचे दोघे मित्र–दिवसा ढवळ्या निघून गेले तरी दिसूं नयेत ! चला, वाचकहो ! त्याच्याच मागोमाग आतां आपण जाऊन, त्याचे आत्मगत विचार काय आहेत ते आपण ऐकूं, म्हणजे त्याचें तें कार्य कोणतें आहे तें आपणांला सहज समजेल. पण–थांबा ! तुम्हांला मागोमाग जाऊन पाऊल न वाजवितां गुप्तपणांत दुसऱ्यांचे मनोगत विचार ऐकण्याचा संवय नस-

त्यामुळें तुम्ही दृगोचर व्हाल आणि सगळाच डाव फसेल; म्हणून तुम्ही तन्मय होण्याची संवय करीपर्यंतचे तुमचे श्रम वांचवून प्रस्तुत पुस्तकाचा लेखकच तन्मय होऊन त्याचे विचार तुम्हांला स्पष्टपणें सांगण्यास तयार झाला आहे, तर ते आतां सावधान चित्तानें ऐका. वालखिल्याचें आत्मगत भाषण पुढील आशयाचें होतें.

"छे बुवा! असलं काम कोणी करावं! पण करणार काय? कोणाचंही बरं होत असेल तर तें करीत असावें अशी जी म्हण आहे तिला हरताळ कसा लावावा! कारण ती म्हण अनुभवानें अगदीं सिद्धांतरूपच होऊन बसलेली आहे. आमचा किरात म्हणजे परममित्र, त्याच्याकरितां त्याच्या कल्याणाचें—सुखाचें काम केलेंच पाहिजे. एकंदरींत मदनाचा तडाखा मोठा विलक्षण खराच. किराताच्या बाणांनीं मालती अन् मालतीच्या, बाणांनीं किरात, परस्पर कशीं अगदीं जर्जर होऊन गेलीं आहेत. माझीही एकदां अशीच स्थिति झाली होती म्हणा; पण त्याचा उपयोग मात्र कांहीं झाला नाहीं. आमच्या विरुद्ध बाजूकडून आमच्यावर मातही होईना आणि आमची प्यादेमात तिच्यावर विजयी होईना! एकंदरींत काय कीं, आम्ही प्यादीं सरकावायला चुकलों आणि त्यामुळें अखेरीस चकलों. आतां, किराताच्या बाबतींत तरी तसं न होऊं देण्याची पूर्ण खबरदारी घेतलीच पाहिजे. संवयीनं आणि अभ्यासानं नेमका डाव घेणारे फासे, खात्रीनेंच टाकतां येतात. पण हें इतकें हवें कशाला? आमच्यासारखी फसगत होण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं; कारण, तीं दोघें—मालती आणि किरात—हीं परस्परांवर अनुरक्त आहेत याची साक्ष मालतीनें किराताला देण्याकरितां दिलेलें केतकीचें पत्रच देतें आहे. बाकी जगांत कांहीं जो अनुभव आपण आजपर्यंत घेतला त्यावरून असें स्पष्ट सांगूं शकूं कीं, पुरुषानें स्त्रीवर किती जरी प्रेम केलें तरी स्त्रीकडून तें पुरुषावर उलट झाल्याशिवाय ती प्रेमग्रंथि कधींच घट्ट बसत नाहीं. असो. हें सर्व झालें खरें! त्यांचें परस्परांवर प्रेम

अगदीं निष्कपट आहे यांतही शंका नाहीं! पण, मालती किराताला मिळावी कशी! तिचा बाप अर्थपति, अर्थाशिवाय वळणार कसा? बरें पण, अर्थपतीच्या अर्थासहच मालती जर किराताला मिळवून देण्याची एखादी शक्कल काढली तर काय होईल? होणार काय? वाः फारच मोठी बहार होईल! त्या युक्तीनें अर्थपतीचें हृदय फुटून तो या जगांतलें आपलें चंबुगवाळें आटपील! हो. बरोबर आहे! तीच युक्ति! ठरली! कारण, त्या युक्तींत दोन फायदे आहेत. त्या नराधमानें मालतीची जी कसायाप्रमाणें विक्री मांडली आहे त्यांतून ती सुटेल आणि नंतर आपल्या बापाच्या द्रव्यासह किरातासारख्या योग्य पुरुषाच्या हस्तगत होईल. आतां, यांत एक सरळ हत्या होते आहे हें खरें; पण इलाज नाहीं. आडवें आलें कीं तोडलेंच पाहिजे हा धृतराष्ट्राला कणिक ब्राह्मणानें सांगितलेला नीतीचा नियम या ठिकाणीं अगदीं बरोबर लागू पडतो. त्या ताज्या—नव्या उमललेल्या मालती-सुमनानें फक्त अर्थपतीच्या लोभाकरतां आपली शालीनता, आपलें सौंदर्य, आपला सौगंध यांसह अखेरच्या दिवसापर्यंत मुग्ध राहून शेवटीं पंचभूतांत विलीन होऊन जावें, हें पातक घडूं देण्यापेक्षां यांत अर्थपतीच्या हत्येचें पाप, मित्रकार्याकरितां, माझ्या माथीं लागलें तरी बेहत्तर आहे. चला, किराताकडे आतां—सरळ जाउन त्याला आपला झालेला ठाम बेत कळवावा आणि पुढील कार्याला लागावें." एणेंप्रमाणें, त्याचे आत्मगत विचार चालले असतां, किराताच्या घराचा दरवाजा त्याच्या एकदम दृष्टीस पडल्यावर तो स्वगत म्हणाला. "अरे, पण हें काय? मी विचारमग्न असा चालत चालत किराताच्या अगदीं दारापुढेंच येऊन ठेपलों हें लक्ष्यांत सुद्धां आलें नाहीं. अरे, पण हा तर सोमदत्तच किराताच्या दारांतून बाहेर पडतो आहे. या अशा वेळीं आपण त्याच्या दृष्टीस पडणें योग्य नाहीं; कारण, त्याला जो एक मनोरथ नांवाचा यक्ष साह्य झाला आहे त्याच्या कृपेनें त्याला दुसऱ्यांचीं सर्व इंगितें अचुक कळतात. मीं सध्यां पत्करलेलें काम जरी कमी

दरजाचें आहे तरी, तें मित्रकार्य असल्यामुळें मी त्याचा दर्जा वाढवतों. चला तर त्या बाजूच्या गल्लींत जरा आड उभें राहून, सोमदत्त निघून गेल्यावर आपण किराताच्या घरीं जावें आणि नंतर किरातालां बरोबर घेऊन त्याच्या त्या मदनोद्यानांत सायंकाळची हवा खायला त्याला घेऊन जाऊन तिथेंच त्याच्याशीं मालतीविद्दल भाषण करावें.''

अशा तऱ्हेचे आत्मगत विचार करीत करीत वालखिल्य आडगल्लींत जरी जाऊन लपून उभा राहिला होता, तरी तो सोमदत्ताच्या दृक्पथांतून सुटला होता असें मुळींच नाहीं. सोमदत्तानें त्याला हाक मारली असती; परंतु तो कोणच्या कामांत गुंतला आहे याची त्याला पूर्ण अटकळ असल्यामुळें आणि दुसऱ्यांच्या कामांत विनाकारण ढवळाढवळ न करण्याचा त्याला पुरा तिटकारा होता म्हणून रोजच्या नियमाप्रमाणें एकांताचें सौख्य घेण्याकरितां सोमदत्त, गांवाबाहेरील दाट अरण्यांत जाण्याकरितां किराताच्या घरून एकटाच बाहेर पडला. त्याला बराचसा दूरवर गेलेला पाहून, वालखिल्य किराताच्या घरांत शिरला.

वर सांगितल्याप्रमाणें सोमदत्त आपल्या रोजच्या नियमाप्रमाणें आजही सायंकाळीं गांवाबाहेरील घनदाट अशा अरण्यांत जाउन एका प्रस्तरावर—'सोमदत्त ज्ञाता आहे'—असा जो सूर्यनारायणानें कौल दिला म्हणून सूर्याचे पुजारी म्हणतात—त्याचा अर्थ काय असावा याबद्दल विचार करीत बसला. त्यानें स्वतःशीं बराच वादविवाद केला, तरी त्याला अद्यापि—पुष्कळ विचारांतींही त्या सूर्यनारायणाच्या कौलाचा आणि पुजाऱ्यांच्या म्हणण्याचा अर्थ उकलेना. म्हणून तो अखेरीस ईश्वराला आज शरण जाऊन म्हणाला "हे दयाघना—परमेश्वरा,

(धाडुनि दिधलें दासीसह मीं०)

**देवाचि ज्ञाता जगतीं असतां ज्ञानि मला म्हणताती ॥**
**अर्थ न याचा उकले मजसी ज्ञानि कसा मग मी अंतीं ॥ध्रु०॥**

**देव दयाघन, पतितपावना, येउं तुला मम करुणा ॥**
**शिकवुनि ज्ञाना, हरि अज्ञाना, स्तवित तुला दो हातीं ॥ २ ॥**

याप्रमाणें तो सर्वसाक्षी परमेश्वराची एकांतांत एकचितानें प्रार्थना करीत बसला असतां त्याच्या कानांवर अंतरिक्षांतून एकदम पुढील शब्द येऊन आदळले.

" सोमदत्ता, तूं खराच ज्ञाता आहेस !" हे शब्द ऐकल्याबरोबर तो फारच विस्मयचकित होऊन स्वतांशीं म्हणाला " काय, या अरण्यांत मी एकटाच ज्ञातेपणाबद्दल स्वगत विचार करीत बसलों असतां कुंठित होऊन परमेश्वराची प्रार्थना करूं लागलों, अशा प्रसंगीं 'तूं खराच ज्ञाता आहेस' असं मला बजावून सांगणारं हें दुसऱ्याचे अंतस्थ हेतु जाणणारं एखादं पिशाच तर नसेल ना ? दुटप्पी बोलणाऱ्या पिशाच्यावर कोणीं भरंवसा ठेवावा ? कारण, त्यामुळें मनाची साक्ष पटत नाहीं. अरण्यांत--वनदेवता, यक्षकिन्नर, गंधर्व--संचार करीत असतात--त्यांपैकीं तर कोणाचं हें भाषण नसेल ना ? काय समजावं ?

याप्रमाणें तो आत्मगत विचार करीत असतां त्याला अगदीं भांबावल्यासारखें होऊन तो कांहीं वेळ स्तब्ध बसला आणि पुन्हां पूर्ण विचार करून, कांहीं वेळानें, त्यानें आपली दृष्टी नीलनभोमंडलाकडे फेकली व पुढीलप्रमाणें उद्गार काढले.

" पिशाच्यांव्यतिरिक्त--यक्षगंधर्वकिन्नरनवदेवतादिकांपैकीं जर कोणी 'तूंच खरा ज्ञाता आहेस' असं बजावून सांगणारं असेल तर त्यानं आपला आडपडदा सोडून समक्ष पुढें यावं आणि आपले शब्द खरे करून दाखवावेत, म्हणजेच माझ्या मनाची खात्री होईल. नाहींतर हें सर्व झूट, थोतांड, फसवेगिरी आहे असंच मी समजेन !"

सोमदत्ताचे हे करारी शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडत आहेत नाहींत तोंच आकाशांत एकदम मेघमंडलाची गर्दी होउन विजांचा कडकडाट सुरू

झाला व त्या तशा भीतिप्रद देखाव्यांतून एक तेजस्वी पुरुष त्याच्याकडे येत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो तेजस्वी पुरुष मोठ्या वेगानें अंतरिक्षांतून भूमंडलावर येऊन सोमदत्ताच्या पुढें उभा राहिला व त्याबरोबर आकाश पुन्हां पूर्ववत् स्वच्छ झालें. सोमदत्तापुढें येऊन उभा राहिलेला तो दिव्य पुरुष सोमदत्ताला म्हणाला–

"हा पहा, मी तुला नेहमीं अंतर्ज्ञानानं मदत करणारा तुझा मित्र मनोरथ नांवाचा यक्ष आज तुला प्रत्यक्ष दर्शन देण्याकरितां इथें आलों आहें. 'सोमदत्ता, तूंच खरा ज्ञाता आहेस.' हे शब्द मींच मघाशीं उच्चारले होते. आणि आतां ते शब्द खरे कीं खोटे याची साक्ष तुझ्याकडूनच तुला पटवून देतों. मी आतां तुला एकंदर सहा प्रश्न विचारतों त्यांचीं उत्तरें बरोबर दे, म्हणजे माझ्या म्हणण्याची तुला सत्यता पटेल."

"हे सदसद्विचारांच्या शक्तिनायका, मीं तुला ओळखलं. तूं मनोरथ या नांवाला खरोखरच शोभतोस! तुझे कोणचे सहा प्रश्न अहोत ते मला विचार!"

"पुढें काय होईल याचें स्पष्ट ज्ञान कोणाला असतं?"

"फक्त एका परमेश्वराला?"

"त्याबद्दल मनुष्यप्राणी काय करतो?"

"अटकळ किंवा अनुमान."

"अटकळ किंवा अनुमान म्हणजे काय?"

"कांहीं गोष्टीमागून कांहीं गोष्ट घडतांना बहुत वेळां पाहून, पहाणाराला प्रथम पाहिलेली गोष्ट, दुसऱ्या गोष्टीला ती कारण आहे असं वाटूं लागतं. मग जी गोष्ट कारणरूप असते तिच्यासारखी दुसरी पाहिली असतां, तिच्यामागून कार्यरूप गोष्ट होईलच असं जें वाटतं त्यालाच अनुमान किंवा आटकळ असं म्हणात."

"बाबारे, यांतच ज्ञातेपणा भरलेला आहे. पुढें घडून येणाऱ्या

गोष्टीला साधकबाधक अशीं जीं निरनिराळीं कारणं असतात,—त्यांमध्यें कोणतीं बलवत्तर असतात हें अभ्यासानं समजतं व त्याचमुळें अमुक एका कामाचा परिणाम काय होईल तो नेमका कळतो. ही शक्ति, माझ्या साह्यानं तुझ्या अंगीं वास करीत असल्यामुळेंच ' तूं सर्व गोष्टींगांत एकटाच ज्ञाता आहेस ' हा जो सूर्यनारायणानं पुजाऱ्यांना कौल दिला तो अगदीं खरा आहे."

" अशा बोलण्यानं माझ्या मनाची कधींही शांति होणार नाहीं; कारण, मी पूर्ण अज्ञानी आहें अशी माझी अटकळच नव्हे तर खात्री आहे."

" तर मग देवता खोटं बोलते काय ? "

" तसंही म्हणवत नाहीं."

" बरं, पण अशा ह्या चमत्कारिक स्थितींतून पार पडण्याचे तूं कांहीं उपाय केलेस का ? "

" पुष्कळ केले. मोठमोठ्या विद्वान मुत्सद्यांशीं वाद केले. त्यांच्या संभाषणापासून कांहींच निष्पन्न झालं नाहीं. मीं त्यांना शेवटीं व्यंगोक्तींनीं बऱ्याच सूचना केल्या; पण त्याचा फायदा काय झाला, तर त्यांचं शत्रुत्व मात्र संपादून घेतलं. पुढें कवि, शास्त्री, पंडित वगैरेंशींही वाद केले ! पण त्यांच्या अंगीं विद्या आणि ज्ञातेपणाचा लेशही नसून—अहंमन्यता, पोकळ प्रौढी, मदोन्मत्तता—यांनींच ते व्यापलेले दिसले."

" मग, पुढें काय केलंस ? "

" पुढें—कारागीर लोकांत कोणी ज्ञाता सांपडला तर बघावा म्हणून शोध केला; पण तिथेंही शून्यच दिसलं. एखादा कारागीर, एखाद्या कामांत वाकबगार असला म्हणजे तेवढ्याच कारागिरीवर तो आपल्याला इतर सगळीं कामं येतात असं समजतो, असंच सर्वत्र दिसलं. एकंदरींत काय कीं, जिथें तिथें बढाईची चंगळ व खूपशा डौलाचं प्रदर्शन हींच बघायला सांपडलीं."

" सोमदत्ता, धन्य आहेस तूं. ऐक तर आतां—ज्या गोष्टी वस्तुतः लोकांना समजत नाहींत, त्या तुलाही समजत नाहींत. पण तूं आपलं अज्ञान

प्रांजलपणें कबूल करतोस आणि ते करीत नाहींत–हाच तुझ्यांत आणि इतर लोकांत भेद आहे. यावरून असा सिद्धांत ठरतो कीं,–सर्वव्यापक आणि सर्वाधार–असा जो एक विश्वंभर, तोच एक ज्ञाता आहे. सूर्यनारायणानं तुझ्या ज्ञातेपणाचा जो कौल दिला त्याचा अर्थ हाच आहे."

"तो कसा काय?"

"त्याचा अर्थ असा कीं, मनुष्यांत वास्तविक ज्ञाता तर कोणीच नाहीं; पण जो तुझ्याप्रमाणें आपलं अज्ञान समजतो तोच खरा ज्ञाता!"

अशा तऱ्हेचें त्या दोघांचें संभाषण झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशानें त्या मनोरथयक्षापुढें सोमदत्तानें आपले गुडघे टेंकून व हात जोडून शरणागताप्रमाणें पुढील शब्दांत त्याची स्तुति केली.

(भूप–मत्त ताल)

**हे नयकर सत्वमंदिर सुखद सागर नमन स्वीकर यक्षिणीवर ॥ हे० ॥ मम मनोगत मनोद्भूत मुदित होत अमित मन्मन ॥ तोषित मना द्या अवना जोडुनी कर प्रार्थि किंकर ॥ हे० ॥**

अशा तऱ्हेनें विनम्र होऊन सोमदत्त स्तुति करीत असतां, त्याच्या मस्तकावर यक्षानें आशीर्वादयुक्त आपला सव्य हस्त ठेवून स्वस्थानीं गमन केलें आणि यक्षदर्शनापासून–खऱ्या ज्ञातेपणाची व्याख्या समजल्यामुळें सोमदत्त शांतचित्त होऊन आपल्या घरीं जाण्यास तेथून निघाला.

---

## प्रकरण चवथें

# केवड्याचें पान.

"वालखिल्या, तूं काय वाटेल तें म्हण, ह्या मनावर तुझ्या तत्वज्ञानाचा कांहींच परिणाम होत नाहीं. काय सांगूं? ती प्रत्यक्ष मरकत मण्या-

चीच मूर्ति आहे. तिनं—मालतीनं मोदपर्वणीच्या दिवशीं—समुद्रकांठीं माझ्यावर जें आपलं प्रेम दाखवलं, त्यानं मला अगदीं वेडा करून सोडला आहे.

" किरात, एखाद्या स्त्रीविजित पुरुषाप्रमाणें जगांत वावरणं बरं नव्हे."

" अरे हो! पण हें बघ, मला काल एक मोठं चमत्कारिक स्वप्न पडलं. स्वप्नच म्हणा तें—पण सांगतों, ऐक. मी आपल्या पलंगावर निजलों असतां, एका सुंदर अप्सरेनं मला कमलाच्या गार वाऱ्यानं जागं केलं. तिचा अंतर्भाव जाणून मीं तिचा पदर धरला व तिला पलंगावर बसवूं लागलों; पण इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, ती माझ्या हाताला झटका मारून तिथून पळून गेली —"

" अन् तूं जागा झालास--असंच ना? मग त्यांत कांहींच नाहीं. मलाही असंच एक चमत्कारिक स्वप्न पडलं."

" तूं रे काय पाहिलंस त्यांत?"

" मी गंगानदीच्या फेसाच्या कमळांत स्वस्थ घोरत पडलों असतां, माझ्या अंगावरून एक मोठी लाट गेली. तिनं माझा देह जलरूप बनवला. पुढें मेघांनीं मला प्राशन केलं. ते मेघ चित्रानक्षत्रांत जेव्हां वर्षूं लागले, तेव्हां त्यांनीं चौसष्ट शिंपांत माझ्या जलरूप देहाचे चौसष्ट थेंब टाकले. झालं, आम्ही चौसष्ट मोतीं बनलों."

" वाः! फारच मजेचं स्वप्न!"

" पुढें ते शिंपले समुद्रांतून बाहेर काढले गेले. ते फोडल्यावर आम्हांला वेजें पाडलीं आणि नंतर आमचा त्या चौसष्ट मोत्यांचा—एकावळि—नांवाचा एक हार तयार करवण्यांत आला. त्याची किंमत एक कोट मोहोरा झाली."

" इतका मौल्यवान् हार एखाद्या राजाशिवाय कोण घेणार विकत!"

" तो हार—मकरध्वज राजानं विकत घेऊन आपल्या राणीच्या गळ्यांत घातला."

" अहाहा ! त्या वेळीं ती राणी त्या मदनरज्जूनं बद्ध झालेलीच दिसत असली पाहिजे असं म्हणा, किंवा उत्तुंग अशा स्तनशैलदुर्गांना शोभा देणारं तें तोरणच या जगांत अवतरलं असंच म्हटलें पाहिजे."

" हा तुझा शृंगारशब्दावलीचा अलंकार ठीक झाला; पण इकडे माझ्या जिवावरचा प्रसंग आला !"

" तो रे कसा काय बुवा ?"

" एके दिवशीं मौज काय झाली पहा ! आकाशांत पूर्ण चंद्रोदय झाला होता. ती माळ त्या राणीनं गळ्यांत घातली होती. अशा प्रसंगीं ती एकटीच चांदण्यांत मदनविद्ध अशी-आपल्या गच्चीवर बसली असतां तिथें एकदम राजा आला आणि त्या परस्परांचा जो प्रेमालिंगनाचा प्रकार झाला त्यामध्यें तीं मोतीं गेलीं चिरडून आणि मी अशाचा असाच अंथरुणावर जागा झालों !"

" अरे लबाडा ! माझे मनोरथ पोकळ आहेत असं दाखवण्याकरतांच हें स्वप्न तूं मला सांगितलंस होय ?"

" अरे, तर-पदच्युत झालेला राजा, भुकेलेला ब्राह्मण, जिचं मन स्वाधीन नाहीं अशी बालविधवा आणि स्त्रीविरही पुरुष-इतके प्राणी मनोरथाच्या पक्वान्नांनीं आपल्या मनाची चंगळ करून घेत असतात हें तुला नाहीं का माहीत ? बरं पण, तुला दुसरी एक गोष्ट विचारतों. तुझं मन जें एवढं तल्लीन होऊन गेलं आहे, हा रे कशाचा प्रकार ?"

" निव्वळ प्रेमाचा !"

" अशा त्या प्रेमाची व्याख्या तरी काय आहे ?"

" स्त्रीपुरुषांचा सहवास होऊन-मदनपाशानं-परस्परांविषयीं त्यांचं जें निष्कपट प्रेम जमतं-तेंच खरं प्रेम !"

" त्याचं रूप कसं असतं ?'

" जेथें कुकल्पना आणि वंचना नसून, सरळ भावानें शृंगाराची वाढ

होते, तेंच त्याचं रूप."

"बरं, त्याचा स्वभाव कसा काय असतो?"

"दृष्टि लोभयुक्त असून ती सर्व जनांना आनंददायक झालेली असते. तिच्यांत लटकेपणा मुळींच नसतो. त्यांत लबाडी आहे असं जगाला वाटतं, पण त्या खोट्या कल्पनेनं जग पुढें पस्तावतं!"

"असं जर आहे, तर जी सरळ वृत्ति हृदयांत रहाते तिलाच मदनभूषण मानली जाऊन, जी लटकी बाह्यात्कारी डौल करते तिला मदनेंद्रजाल म्हणतात; तेव्हां हृदयांत रहाणारं प्रेमच जर अनुराग उत्पन्न करतं, तर बाह्यात्कारी डामडौलाचा नखरा हवा कशाला?"

"तुझं म्हणणं वास्तविक आहे. सोन्याचांदींत मढवलेले पंचरत्नांचे दागिने अंगावर घातले, उंची रेशमी जरतारीचे कपडे पेहरले, फक्कड नट्टापट्टा करून सुंदर अंबाड्यावर मधुर वासाच्या फुलांची वेणी चढवली—म्हणजे हपापलेल्या तरुणांच्या मनांत अनुराग उत्पन्न होतो खरा; पण तो क्षणैक असतो. ज्याच्या योगानं स्त्रिया सुरेख दिसतात तें कांहीं निराळंच आहे."

"पूर्ण यौवन, चंचल नेत्र, सरळ नासिका, पूर्णेंदुमुख, खोल नाभि, प्रशस्त नितंब, उत्तुंग स्तन, मुष्टिग्राह्य कटि आणि हंसगति—यांनीं का स्त्रिया सुंदर दिसतात?"

"बाबारे, तुला मघांशीं प्रेमाचं रूप आणि स्वभाव यांच्या ज्या व्याख्या सांगितल्या, त्यांवर तर त्या सौंदर्याची इमारत रचलेली असते. अहाहा! काय सांगूं! मोदपर्वणीच्या दिवशींची तिची व माझी भेट फारच बहारीची? खरोखर, मालती म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गीय स्त्री आहे."

"एवढंच का अशा त्या स्वर्गीय स्त्रीचं वर्णन?"

"तूं तिला बघितली आहेसच; तेव्हां तूंच तिचं थोडंसं वर्णन कर, म्हणजे हे कान अमृताचे घोट प्यायल्यासारखे आनंदी होतील."

"ठीक आहे; पण एक अट आहे; ती तूं कबूल केली पाहिजेस."

"कोणची ती बोल."

"पहा बरं, लक्षांत ठेव ! मी वर्णनात्मक एक वाक्य बोलल्याबरोबर तूं त्यावर टीकात्मक वर्णन तावडतोब केलें पाहिजे ?"

"कबूल ?"

"ती स्त्री उत्तमशा केशराच्या पाण्यानें न्हाली तरमग कशी दिसेल ?"

"अं: ! अरे, ती मग उजळा दिलेली कांचनमय पुतळी दिसेल हें सांगणं अवघड कां आहे ?"

'बरं, तिनं पाचुजडित नूपुरें पायांत घातलीन्, तर रे मग कशी दिसेल ?"

"हात् तिच्या !—इतकंच ना ? अरे, भ्रमरयुत अशीं तीं तिचीं उलटीं पदपद्में शोभूं लागतील !"

"पोपटरंगी पैठणी नेसल्यावर ?"

"अहाहा ! वाऱ्यानं अंगाभोंवतीं वळलेल्या पानांची ती तशी नाजुक कदली बघणं म्हणजे थोर नशीबच पाहिजे !"

"पद्मराग मण्याची कांची आम्ही तिच्या कमरेला घातली समजा ! मग ?"

"अरे मग काय ? कनकशिलेला मोराच्या नाचाचाच तो लाभ झाला असं दिसेल !"

'बरं, तिनं जर आपल्या हातांत रत्नजडित वलयं घातलीं तर तेथें तूं कोणच्या अलंकाराची स्थापना करशील ?"

"यांत रे काय आहे ? त्यांना कामदेवाचे उलटे तूणीर म्हणायला कोणाला तरी शंका येईल काय ?"

"तिनं आतां मौक्तिकहारावलि घातलीन्—बोल ?"

"मुखेंदूची सेवा करणाऱ्या त्या तारकाच कोणालाही भासतील."

"कानांत रत्नजडित कुंडलं घातलीं तर ?"

"तर काय? तिच्या मुखापासून त्या मन्मथचक्रांचा झाला असं म्हणायला कांहींच हरकत नाहीं."

"डोळ्यांत सोग्याचं काजळ घातलं तर?"

"स्मरशर सज्ज होऊन त्यांना पापण्यांचे पंख लागलेले दिसतील."

"मस्तकावरचे कुटिल केश गुंफल्यावर?"

"ते मुखेंदूवरचे कृष्ण सारंगच शोभतील."

"बरं, त्यांत फुलं गुंफलीं.–आतां?"

"अरे, मग तर काय? प्रत्यक्ष वसंतश्रीनंच आपल्या हातांनीं विलासाकरतां जगांत तें एक क्रीडामंदिरच निर्माण केल्याचें कौतुक उत्पन्न होईल!"

"धन्य आहे तुझी! तूं खराच टीकाकार किरात आहेस. सोमदत्ताचाच मित्र तूं, तेव्हां तुझी बुद्धिमत्ता काय वर्णावी?"

"आणि तूं माझा मित्र, तेव्हां तुझ्या बुद्धिवैभवाची तरी थोरवी किती गावी? अरे पण, इथें मघांपासून केवड्याचा कुठें वास येतो आहे?"

"तूं इतका वेळ जें मन्मथमहाराजांच्या राणीचं मनापासून वर्णन केलंस त्यामुळें त्यांनीं प्रसन्न होऊन मानसपूजेकरतांच तो सुगंध धाडून दिला नसेल कशावरून!"

"म्हणजे, तुझ्याजवळ आहे वाटतं?"

"बाबारे, इतका वेळ तुझं कौतुक याचकरितां ऐकलं; तुझ्या प्रियेचं इतका वेळ तूं वर्णन केलंस तें योग्यच झालं; पण तिची दशा किती वाईट झाली आहे हें तुला काय ठाऊक? अरे, ती अशक्ततेनं इतकी क्षीण आणि नाजुक झाली आहे कीं, तिला चंद्रकिरणांचा ताप सहन होत नाहीं. म्हणून ती आपल्या मस्तकावर दोन्ही तळहातांच्या संमेलनाची छत्री धरते."

"तें असो. पण तो केवडा कोठें आहे तो दे पाहूं आधीं इकडे."

"हें घे तें केवड्याचं पान! याच्यावर तिनं कस्तुरीच्या शाईनं किरातमहाराजांच्याकडे एक विनंतीअर्ज लिहून धाडला आहे."

" अहाहा ? काय हें प्रेम ! याचं प्रथम चुंबन घेतलं नाहीं तर अपमान होईल. बरं, यावर काय बरं लिहिलं आहे ? "

श्रीमत् सकलगुणालंकृत मत्प्राणेश्वर किरातराज

यांचे चरणसेवेसी विज्ञप्ति—

[ भूपती खरें तें वैभव० ]

**मानसीं खिन्नशी रोज घरीं मी बसतें ॥ परि मुळीं मजसि तव इंदुवदन नच दिसतें ॥ ध्रु०॥ कासारिं ग्रासितो नक्र गजश्रीपद तें ॥ आगारिं ती कृती मार दावितो मातें ॥ चाल ॥ प्रार्थनेस गोविंदाच्या तो करी ॥ आळवी करुणवाणीनें तो करी ॥ धावला भक्तकैवारी मग हरी ॥ चाल ॥ वाचूनि पत्र मज भेट द्यावि रात्रींतें ॥ शांत वेळ ती आनंद देइ पदिं कथितें ॥ ध्रु० ॥**

" किराता, आज रात्रीं तिच्या बापाला राजवाड्यांत मेजवानीला जायचं आहे—"

" मग त्या संधींत मीही तिच्या घरीं अधरपानाला जाऊं म्हणतों. ठीक आहे !"

" ही भेटीची संधि फारच उत्तम."

" बरं पण आतां दिवस किती राहिला असेल ?"

" अरे, ही पश्चिम दिशा बघ ! कमलांसह नेत्रांना झोंप देणारा, मानिनी स्त्रियांप्रमाणें आपल्या तीव्र किरणांचा त्याग करणारा व तो अस्तशैल ज्याची हातांत धरण्याची काठी बनला आहे असा तो जीर्ण बिंबाचा वृद्ध मार्तंड अस्ताला चालला आहे."

" चल तर मग आतां आपणही घरीं जाऊं ! "

इतकें बोलून ते दोघे घरीं गेले खरे; पण वाचकहो, आतांपर्यंत जें त्या दोघांमध्यें भाषण झालें तें कोठें झालें तें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. नसल्यास सांगतों, ऐका ! मागील प्रकरणांत किराताच्या घरून सोमदत्त बाहेर पडून जंगलांत निघून गेल्यावर, वालखिल्य किराताच्या घरांत शिरल

व त्यानें त्याला त्याच्या मदनोद्यानांत घेऊन जाण्याचा बेत केला होता हें तुम्हांला स्मरत असेलच ! त्यालाच अनुसरून ते दोघे सायंकाळचा वेळ उघड्या हवेंत आनंदांत घालविण्याकरितां मदनोद्यानांत आले होते आणि तेथें त्यांचें वरील प्रकारचें भाषण झालें, हें आतां तुमच्या लक्ष्यांत आलेंच असेल. असो. आपण आतां त्यांना त्यांचा पुढील कार्यक्रम करण्यास स्वैर सोडून, पुष्पपूर नगराच्या एका रस्त्यांतून दोघे गृहस्थ आपसांत काय बोलत चालले आहेत तें ऐकण्याकरितां त्यांच्या पाठोपाठ जाऊं !

## प्रकरण पांचवें.

# मत्सरबीजांकुर.

पक्षी म्हणजे ज्याला पंख आहेत तो, उडणारा प्राणी, असा जरी त्याचा आपण सरळ व्यवहारांत अर्थ धरून चाललों तरी प्रत्येक गोष्टीला पक्ष किंवा बाजू असतात, म्हणून त्याही सर्व गोष्टी पक्षीच असें मात्र तर्कशास्त्रज्ञांशिवाय भाषाकोविद कधींहि कबूल करूं शकणार नाहींत. एका पंखानें जसा पक्षी उडणार नाहीं, तद्वतच स्वदेशसेवेला वाहून घेऊन स्वराज्यशत्रूची रग जिरवण्याकरितां ऐन वेळीं परस्परांतील मतभेद विसरून जाऊन ऐक्यानें देशहिताचें काम करणारे असे सत्यासत्यतेचें खरें स्वरूप दाखविणारे दोन पक्ष असणें अत्यावश्यक आहे. राजसत्ताक काय किंवा प्रजासत्ताक काय, कोणच्याही प्रकारच्या राज्यरचनेंत जर राज्यशकटाला असलीं चाकें नसतील तर राज्यशकट बिनधोक चालायला मोठी अडचण पडते, असें महान् महान् मुत्सद्यांनीं आपलें ठाम मत अनेक वर्षांच्या अनुभवसिद्धतेनें ठरवून ठेवलेलें आहे, व तें हरघडी प्रत्येकाच्या अनुभवालाही येत आहे. आमचा गोशृंग देश व त्याची राजधानी जी पुष्पपुर ती तरी या वरील सिद्धांताला अपवादक अशी कशी

टरेल ? पुष्पपूरच्या प्रजासत्ताक राज्यकारभारांत जरी वरील ठराविक सूत्राप्रमाणें दोन पक्ष होते, तरी ते परचक्राशीं आपसांतील कलह विसरून एकजुटीनें नेहमीं टक्कर देऊन विजयी होत असत. आपसांतील कलह–कलहच तो. कारण, कलह शब्द जात्याच मोठा वाईट आहे; मग तो आपसांतला असो अगर शत्रुपक्षासंबंधाचा असो–केव्हांही हानि केल्याशिवाय स्वस्थ व्हायचा नाहीं. पुष्पपूरची स्थिति तरी सध्यां अशीच आपसांतील कलहानें–परोत्कर्षासहिष्णुतेच्या द्वेषाग्नीनें, अथवा जुनें तेवढेंच काय तें उत्तम व नवें तितकें सर्व वाईट–खोटें–असें अविचाराचें ठाम मत करून घेतल्यानें–झाली होती. आणि त्यामुळेंच जुन्या पक्षाचे अभिमानी–अपूर्वसेन, वृषसेन वगैरे असून नव्या पक्षाचे अभिमानी–सोमदत्त, किरात वगैरे झाले होते. त्यामुळें त्यांची आपसांत दुही माजून मत्सरबीजांकुराला वाढत रहायला कसा अवसर मिळाला तें पुढील गोष्टीवरून वाचकांस सहज समजणार आहे.

नवीन तरुणपिढीला योग्य असें खरें शिक्षण देऊन अंधरूढींचा नायनाट करण्याचें व्रत सोमदत्तानें उचललें असल्यामुळें व अंधरूढींना झुगारून न देतां हृदयाशीं कवटाळून धरण्याचें वृषसेनादिकांच्या पक्षानें कंकण बांधलें असल्याकारणानें–वृषसेन आणि अपूर्वसेन या दोघांचें मत अर्थात् सोमदत्ताच्या विरुद्ध झालेलें असून, ते त्याला कसे पाण्यांत पहात होते व त्यांचा सोमदत्ताकडून वेळोवेळीं अन्योक्तींनीं उपहास होत गेल्यामुळें त्याला चिरडून टाकण्याचा चिकाटीचा प्रयत्न ते कसे करीत होते हें पुढील कथानकावरून लक्षांत येणार आहे.

वृषसेन व अपूर्वसेन कांहीं स्वतांच्या कामाकरितां एके दिवशीं पुष्पपूरच्या एका रस्त्यांतून चालले असतां त्यांचें आपसांत पुढीलप्रमाणें संभाषण चाललें होतें.

"मित्रा अपूर्वसेना, छे ! हें नाहीं आपल्याला बिलकुल पसंत ! राजसत्ताक राज्याची गोष्ट निराळी. हें राज्य लोकसत्ताक आहे. इथें असल्या

पाजीपणाच्या गोष्टी बिलकुल खपायच्या नाहींत."

"अलबत्!--जो मनुष्य अंगीं सामर्थ्य असतां, उपद्रव मना करीत नाहीं तो आणि उपद्रव करणारा--असे दोघेही गुन्हेगार ठरलेच पाहिजेत."

"म्हणूनच म्हणतों कीं, आपल्या अंगांत उपद्रव मना करण्याची जी शक्ति आहे, तिचा जर या वेळीं उपयोग केला नाहीं तर आपणही गुन्हेगार ठरूं."

"अशा या अनर्थांचा प्रतिकार केलाच पाहिजे."

"काय त्या हलकट ढोंग्याचा मूर्खपणा हा! या सृष्टींतल्या कित्येक गोष्टी मनुष्यप्राण्यानं जाणूं नयेत अशी प्रत्यक्ष परमेश्वराची इच्छा असतां, त्या गोष्टी जाणण्याचा हा प्रयत्न करतो. इतकेंच नव्हे तर गधड्यासारखा शहरच्या मुलांना त्याबद्दल उपदेश करतो. अशा तऱ्हेचे हे पापाचे डोंगर आमच्या राज्यांत बिलकुल वाढतां उपयोगाचे नाहींत."

"अहो, त्याच्या त्या उपदेशामुळें माझा थोरला कारटा मला काल म्हणूं लागला कीं, जुन्या धार्मिक समजुती, मुख्य मुद्द्याला सोडून थोतांडासारख्या सध्यां प्रचारांत आलेल्या आहेत, म्हणून त्या साफ खोट्या आहेत!"

"अहो, हा मूर्खशिरोमणि पापदायक जिज्ञासा मनांत धरून, स्वर्गांत आणि पाताळांत काय चाललं आहे त्याचा शोध करतो. स्वर्ग पृथ्वीच्या वर म्हणजे भूपृष्ठावर आणि पाताळ पृथ्वीच्या खालीं म्हणजेही भूगोलाच्याच एका अर्ध भागावर आहे असे अर्थ करतो, केवढं हें दुश्चिन्ह!"

"'या सर्व भूमंडलावर त्याच्यासारखा ज्ञाता कोणी नाहीं'--असा म्हणे--सूर्यनारायणानं त्याला कौल दिला! केवढं हें थोतांड! त्याला जर तसा कौल मिळतो तर आमच्यासारख्या राज्यशकटाची धुरी वाहणाऱ्यांना कां मिळूं नये?"

"तें तर राहूंच द्या! पण त्यानं आतांशीं--आपल्याला एक यक्ष प्रसन्न असल्याचं नवंच ढोंग माजवलं आहे."

" बस्स ! या सगळ्याचा अर्थ सोमदत्त नास्तिक आहे असाच ठरतो."

" असल्या गोष्टी तो तरुण मुलांच्या मनांत ठसवून–शिवाय–संस्थानचे कायदे फार अनर्थकारक आहेत असंही तो त्यांना शिकवतो."

" चिठ्ठया टाकून न्यायाधीश नेमण्याची आमच्या संस्थानाची चाल मूर्खपणाची आहे असं तो बेधडक हमरस्त्यावर आपल्या व्याख्यानांत सांगत असतो."

" तो ज्या सभांत जात नाहीं त्यांची निंदा करतो आणि दुर्बल पक्ष सबल करण्याच्या युक्त्या पोरांना शिकवतो."

" अहो, त्यानं शहरचीं पोरं म्हणजे काय अगदीं आपले बंदे गुलाम करून ठेवलीं आहेत. आपल्या वृद्ध मातापित्यांची अवज्ञा करा, त्यांना मारा, ठोका, त्याबद्दल तुम्हांला मुळींच पाप लागणार नाहीं–अशा दुष्ट प्रेरणा तो मुलांच्या मनांत करून त्यांना सोळभोक बनवतो आहे."

" अहो, बनवतो आहे कसला ? बनवलीं आहेत म्हणा. असल्या ह्या नव्या तयार होणाऱ्या उनाड पिढीपासून संस्थानाला मोठा अपाय होण्याचा संभव आहे."

" दुसरं असं कीं, संस्थानांतली अव्यवस्था काढून टाकून, तें ताळ्यावर आणण्याचा आणि तेथल्या सर्व लोकांच्या दोषांचें आविष्करण करण्याचा नसता अधिकार त्यानं आपल्या शिरावर घेतला आहे. तो सगळ्या अधिकाऱ्यांना मूर्ख म्हणतो. कांहींएक भीडभाड न धरतां आमच्या पूर्वापार चालींना आणि आचरणाला बेलाशक दोष लावतो."

" ह्या सर्व मुद्यांवर जर आपण सोमदत्तावर फिर्याद आणली, तर ही नष्ट ब्याद जगांतून एकदांची नाहींशी नाहींका करतां यायची ?"

" माझाही तोच विचार. मी आतां सांगणारच होतों, इतक्यांत तुम्हीच बोललांत. संस्थानाचे कैवारी म्हणून सोमदत्तावर फिर्याद मांडायला कायद्याची पुरी संमति आहे. अरे पण, तो पाहिलात कां ? तेच ढोंगी साधु-

महाराज इकडेच सुलोचनासह येत आहेत. जराशी उडवूं या."

सोमदत्त आणि सुलोचन त्याच रस्त्यानें जात असतां वरील दोघांशीं त्यांची गांठ पडून त्यांच्यांत पुढील मोठा गमतीचा संवाद कसा झाला तो ऐका. अपूर्वसेन म्हणतो " कां? ज्ञातेराव, कुठें निघाली स्वारी ?"

" असाच बोलत बोलत घराकडे चाललों आहें!"

"आतांशा शहरच्या मुलांना उपदेश करण्याचं काम कसं काय चाललं आहे ?"

"मुलाच्या उत्कर्षाविषयीं आणि हिताबद्दल बापाचं जसं प्रेम असतं तशाच प्रेमानं चाललं आहे."

"तर एकंदरींत, आपण, तरुणपिढीचा बापपणा पत्करला आहेत असंच म्हणायचं ?"

"बाप हा शब्द मोठा अर्थगांभीर्याचा आहे. हा शब्द वप् धातू-पासून निघालेला आहे. वप् धातूचा अर्थ नांगरणें असा आहे. त्यापासून वप्तृ शब्द नांगरणें या अर्थी होऊन बालव्याकरणाच्या नियमाप्रमाणें व-चा ब होऊन बप्तृपासून विकल्पानें बाप हा शब्द तयार झालेला आहे. तेव्हां बाप म्हणजे नांगरणारा; मग तो जमीन नांगरणारा असो, अथवा मन नांग-रणारा असो. बापच तो."

"मुलांचीं मनं नांगरून नांगऱ्याची पदवी मिळवण्यांत कांहीं विशेष आहे वाटतं ?"

"हो हो! यांत काय संशय! तरुण मुलें म्हणजे स्वराज्याचे आधार-स्तंभ. प्रौढांचे मेंदू पूर्ण वाढून ते लयाच्या मार्गाकडे वळलेले असतात आणि तरुणांचे ताजे असून वृद्धिंगत होण्याच्या रस्त्याला लागलेले असतात. दुसरें असें कीं, ज्या भ्रांति लहानपणापासून मनुष्याच्या मनांत शिरून त्याचे काळ्याचे पांढरे केस होईपर्यंत त्याच्या ठिकाणीं राहिल्या—त्या त्याच्यापासून सोडवण्याची खटपट करणं जितकं कठिण वाटलं, तितकंच तें तरुण मुलांच्या

बाबतींत सोपं असं प्रत्ययाला आलं.'

"उदाहरणानें सिद्ध करा पाहूं!"

"ऐका:— (अभंग)

**दाट रान ज्यांत पेशा वावरांत ॥ मुळेंपाळें मस्त होताती हो ॥ १ ॥ गेलीं खोल मूळें उंच झाले वृक्ष ॥ वावराची साक्ष प्रौढ देती ॥ २ ॥ वृक्ष उन्मूलित करूनि वावर ॥ उपवना योग्य करावें तें ॥ ३ ॥ श्रम हे निरर्थ आम्हांसी नकोत ॥ म्हणुनि तरुणां उपदेशूं ॥ ४ ॥ बागवाना देती त्रास प्रौढ वृक्ष ॥ तैशीं बाळें साक्ष नाहीं देत ॥ ५ ॥ म्हणुनि कोंवळया मनीं उपदेश ॥ करूनी उल्हास मानिताहें ॥ ६ ॥"**

"पण हा तुमचा निव्वळ गाढवपणा आहे!"

"हें पहा, मंगलाचार्य एकदां सुंदर या नांवाच्या एका गाढवाला भेटले आणि म्हणाले, बाबारे तूं मोठा नशीबवान आहेस. आजपर्यंत पुष्कळ गाढवांशीं माझ्या गांठीं पडल्या, पण तुझ्यासारखा अपूर्व गाढव मीं कधींच बघितला नाहीं."

"बोलण्यांत आणि कृतींत हे प्रत्यक्ष कोल्होबाच दिसतात."

"तशीच गोष्ट ध्रुवाचार्यांची आहे. एकदां त्यांची आणि एका कोल्ह्याची गांठ पडली; तेव्हां ते त्याला म्हणाले, 'कोल्होबा, तुम्ही धूर्त तर खरेच; पण ती तुमची धूर्तता स्वार्थाकरितां उपयोगांत न आणतां वृषासारखे जर जगद्धिताकरितां झटाल तर तुमचा मोठा लौकिक होईल!'"

"अशा तऱ्हेच्या व्यंगोक्तींनीं दुसऱ्यांचा उपहास करणं योग्य नाहीं."

"या हलकटानं--अपूर्वसेन आणि वृषसेन--या आमच्या नांवांवर अन्योक्तिपर जी आतां टीका केलीन्, ती या कानांत तापलेल्या तेलासारखी आग करते आहे. ह्याचा सरकारमार्फतच योग्य समाचार घेतला पाहिजे. चला अपूर्वसेन!"

इतकें बोलून वृषसेन--तिरस्कार आणि द्वेष यांच्या मिश्रणाची क्रुद्ध दृष्टि अर्थपतीवर फेकीत फेकीत अपूर्वसेनासह तेथून मोठ्या झणकाऱ्यानें निघून गेल्यावर सुलोचन सोमदत्ताला म्हणतो—

"हें कांहीं बरं नाहीं झालं. त्या दुष्ट वृषसेनानं जातांना मोठ्या त्वेषानं काय शब्द उच्चारले ते ऐकलेत ना? हा मत्सरबीजांकुरच स्पष्ट दिसतो आहे."

"सुलोचनराव, जगाकडून होणाऱ्या धिक्काराचा प्रतिकार तीन प्रकारांनीं करतां येतो. त्यांपैकीं--जशास तसं--याच प्रकाराचं सर्वत्र अवलंबन झालेलं दिसतं. दुसरं असं कीं, या जगतितलावर--सत्यमूर्तींचा उदय झाला हें ओळखण्याचं हेंच चिन्ह आहे कीं, त्या मूर्तींच्या विरुद्ध मनुष्यद्वेष्ट्यांचीं बंड उत्पन्न होतात. तें असो म्हणा! पण काय हो, तुम्ही आतांसे राज-मंडळाकडून कांहीं पदवी मिळवण्याच्या भानगडींत आहांत असं ऐकतों तें खरं आहे का?

"माझी वतनी जमीन कांहीं लहानसहान नाहीं. शिवाय मी राज्य-प्रकरणांत वाटेल ती कामगिरी करायला तयार असून, कांहीं कांहीं सरकारी कामें, मीं वेतनाची आशा न धरतां, आजपर्यंत फुकट केलीं आहेत. मग मला एखादी तरी राजमान्यतेची पदवी कां नसावी?

"हो, बरी आठवण झाली! हा मी पृथ्वीचा नकाशा घरीं मुलांच्या-करितां घेऊन जात होतों, त्याचा उपयोग आपल्याला इथें झाला तर पाहूं? हा पहा नकाशा मीं उघडला. यांत आपल्या राजधानीचं पुष्पपुर शहर कुठेंसं आहे तें दाखवा पाहूं?

"हें पहा--हें इथें आहे!

"बरं--आतां त्यांत तुमची वतनी जमीन कुठें आहे दाखवा पाहूं?"

"ती वतनी जमीन या नकाशांत वेगळी करून तुम्हांला कशी दाखवतां येईल?"

"असं जर आहे तर, जो जमीनीचा तुकडा पुरता डोळ्यांनीं दिसत नाहीं, त्या तुकड्याला तुम्ही मोठा कसा मानतां ? तुमची वतनी जमीन आपल्या गोश्रृंग देशाशीं लावून पाहिली असतां काय आहे ? आपला गोश्रृंग देश सर्व पृथ्वीच्या एका खंडापुढें आणि एक खंड सर्व पृथ्वीपुढें काय आहे ? इतकच नव्हे, तर या अफाट आकाशमंडपांतल्या इतर ग्रहांपुढें आपली ही पृथ्वी काय पदार्थ आहे ? याच न्यायानं पृथ्वीवरचा थोर पराक्रमी राजा क्षुद्र कीटकच नव्हे काय ? म्हणून म्हणतो, अहंपणा सोडा."

"आपलं म्हणणं माझ्या लक्षांत आलं."

"अहो, तर– आज काल आमच्या चहाड्या करून पदव्या मिळविलेले लोक थोडे का आहेत ! त्यांत आणखी तुमची भरती कशाला करून घेतां ? राजसत्ताक राज्यांत अन्याय फार होऊं लागला, म्हणून तें मोडून त्याचं प्रजासत्ताक केलं: पण तेथेंही बघावं तरी तोच प्रकार ! राज्यचालक प्रधानमंडळांतले दोष बाहेर काढून, त्यांवर जर एखाद्या विद्वानानं योग्य टीका केली तर त्यानं खऱ्या श्रमानं–मोबदला म्हणून मिळविलेली त्याची पदवी काढून घेण्यांत येते आणि त्याला तुरुंगवास भोगावा लागतो–पण चहाडखोर-अपात्र असे मूर्खशिरोमणि मोठाल्या पदव्या उपटून, त्या मोठेपणाच्या जोरावर वाटेल तसा धिंगाणा घालीत असल्याचं दृष्टीस पडतं. खरोखर चहाड्या सांगून पदव्या मिळवणारे लोक–स्वजनघातकी–मांग--मारेकरीच होत. ज्या देशाला असला हा चहाडखोरीचा रोग जडतो तिथें दडपशाहीचं साम्राज्य होऊन अखेर सर्व प्रजा गुलामगिरींत चिरडून नामशेष होते !"

"ज्याला आपण चहाडी म्हणतों ती गोष्ट चहाडीची आहे असं ती सांगणाऱ्याच्या ध्यानींही नसतं ! याचं कसं काय ?"

"असे लोक एकंदरींत फारच विरळा सांपडतील ! ती गोष्ट ते लोक जाणून बुजून स्वार्थाकरितां करितात. आपल्या देशाचा जो स्वार्थ तोच

आपला ही उदात्त कल्पना त्यांच्या मनाला साफ सोडून गेलेली असते; कारण त्यांनीं त्याच कामावर उदरंभरणाच्या व्यवसायाची इमारत उभारलेली असते. पण कायहो, ह्या आपल्या लोकसत्ताक राज्याचा कारभार आपण चालवावा अशी तुमची इच्छा आहे असं जें मीं ऐकलं तें खरं का?"

"खरं आहे तें!"

"वाहवा! हा तुमचा हेतु तर फारच उच्चतम आहे. आतां ह्यापेक्षां श्रेष्ठ असा तो कोणचा हेतु राहिला! ह्यांत एकदां तुम्हांला सफलता आल्यावर मग काय? तुमचं कुळ फारच मोठ्या प्रतिष्ठेला चढून, तुमच्या मनांत तुमच्या मित्रांचं बरं करण्याची इच्छा उत्पन्न होईल! तुमच्या देशाची सरहद्द वाढविण्याची तुम्ही महत्वाकांक्षा धराल; लढाया कराल! एकंदरींत काय कीं, अशा तऱ्हेच्या स्वगुणोत्कर्षानं तुमची कीर्ति या भूमंडळावर—उदबत्तीच्या मधुर वासाप्रमाणें दरवळून राहील. बरं पण, अशा तऱ्हेची प्रतिष्ठा व थोरपणा—हीं मिळवावीं अशी ज्या अर्थी तुमची इच्छा आहे, त्या अर्थी आपण लोकांच्या उपयोगीं पडावं, असा निःसंशय तुमचा उद्देश असेलच?"

"यांत काय संशय! तो तर मुख्य उद्देश आहे!"

"बरं, मग एवढं कृपा करून सांगा कीं, लोकांच्या उपयोगीं पडण्याकरितां तुम्ही पहिली गोष्ट काय करणार!"

"मी होय? मी—ना! मी—प्रथम—पहिल्यांदा—"

"असे घुटमळूं नका! प्रथम या संस्थानाच्या जमाबंदीचं उत्पन्न वाढवून, हें गबर करावं, अशीच तुमची इच्छा आहे ना?"

"अगदीं अशीच!"

"तर मग जमाबंदीच्या कामांत तुम्ही मोठे तरबेज असाल?"

"हो—हो! मी तें चांगलं शिकलों आहें."

"इतक्यावरून, ह्या संस्थानच्या एकंदर जमाबंदीचा आकार तुम्हांला माहीत असलाच पाहिजे! पण हें पहा! पूर्वी कळून न आलेल्या एखाद्या

कारणानं एखाद्या खात्यांतला पैसा वसूल व्हायचा फसल्यामुळें पडलेली खांच-दुसऱ्या कांहीं उपायानं पैसा उभारून आपल्याला भरतां यावी म्हणून—आतां सांगितलेल्या गोष्टीचा अभ्यास करायला तुम्ही चुकलां नसालच ? ”

“ छे ! ही गोष्ट आजपर्यंत माझ्या स्वप्नांत सुद्धां आलेली नाहीं. ”

“ बरं, ह्या संस्थानचा एकंदर खर्च तरी निदानपक्ष तुम्हांला माहीत असेलच ? ”

“ नाहीं—मुळींच नाहीं. ”

“ बरं, जे खर्च केल्यावांचून अडचण पडणार नाहीं ते कोणते, आणि ते तोडल्यापासून कोणता फायदा होईल हें राज्यकारभार करणाराला अगर करूं इच्छिणाराला कळणं अवश्य आहे ना ? ”

“ ह्या गोष्टींतही मी आपलं अज्ञान कबूल करतों. ”

“ तर मग, हें संस्थान गबर करण्याचा तुमचा बेत तुम्हांला कांहीं दिवस, मनांतल्या मनांत, तहकूबच ठेवला पाहिजे ! प्रथम जमाखर्चांचं अध्ययन करा आणि नंतर या भानगडींत पडा. ”

“ संस्थान श्रीमंत करायला, जमाखर्च न शिकतांही एक उपाय आहे. शत्रूच्या नाशानं तें गबर करतां येईल. ”

“ होय ! तुमचं म्हणणं वास्तविक आहे; पण तुमचं आणि तुमच्या शत्रूचं बळ तुम्हीं अजमावलं आहे का ? जमीन आणि समुद्र यांवरील परस्परांचीं सैन्यं किती आणि कशा तयारींत आहेत—याबद्दलचा कांहीं लेख तुमच्याजवळ आहे का ? ”

“ छेः मुळींच नाहीं. ”

“ तर मग असं पहा कीं, तुम्हांला राज्य तर पाहिजे तुमच्या हातांत, पण आत्तां मीं तुम्हांला विचारलेल्या गोष्टींपैकीं एकाही गोष्टीचं नाहीं तुम्हांला ज्ञान. म्हणून म्हणतों कीं, ह्या सर्व गोष्टी प्रथम हस्तगत करून घ्या, आणि मग राज्यकारभारांत घुसण्याचा प्रयत्न करा. जोंपर्यंत तुमच्या-

जवळ कांहींच तयारी नाहीं, तोंपर्यंत तुमच्या हातून बडबडीपेक्षां अधिक तें काय होणार ?"

"पदवी-प्राप्तीच्या लालसेप्रमाणें हाही बेत मीं सोडला. बडबड न करतां क्रिया करून दाखवण्याचंच व्रत मी आजपासून धरणार—नव्हे धरलं !"

"अहो, तर—अंगांत कांहींच धमक आणि तयारी नसतां, आपली प्रतिष्ठा असावी, आपल्याला मोठाल्या जागा मिळाव्या, आपण उच्चतर पदवीला चढावं—ह्याबद्दल विचार न करतां—फक्त—चोमडेपणा बगलेला मारून, जे राजमार्गांत कुत्र्यासारखे शेपटी हालवीत थै थै नाचतात आणि पदव्या—उच्च जागा—पटकावतात, ते जन्मभूमातेचे वैरीच नव्हेत काय ? सुलोचनराव, हा देशसेवेंतला विषारी रोग जोंपर्यंत कायम असतो, तोंपर्यंत पारतंत्र्यानं दाबून धरलेला गळा सुटणं मुष्किलीचं असतं. तुमच्यावर माझी मोठी ममता आहे; म्हणून म्हणतों कीं, जपा बरं ! नाहीं तर कीर्ति आणि प्रतिष्ठा यांच्या भरीं पडून, देशहिताला दुखवाल आणि शेवटीं फसाल ! कारण, कोती बुद्धि ही प्रतिष्ठेचे तुकडे तुकडे करणारी प्रखरतर अशी साक्षात् तरवारच आहे."

झालें. संपलें. एथेंच या गोष्टीचा पूर्णविराम झाला; कारण, आमच्या सोमदत्ताच्या शांतीचें अढळपण शाबूत आहे किंवा नाहीं याचें पुन्हां प्रत्यंतर जगाच्या निदर्शनास आणून देण्याचा परमेश्वरानें येथेंच योग आणला. विजया आणि मंदिरा नागिणींप्रमाणें फूत्कार करीत व आपसांत भांडत त्या ठिकाणीं अचानक बेफामपणानें एकदम आल्या. आणि एकमेकींच्या झिंज्या धरून 'ही सारी तुझीच फूस ! तुझ्याच फुसीनं रांडा घरांत यायला लागल्या. लाथेनं तुडवीन तेव्हां समजेल !' असें जेव्हां विजया बोलली, तेव्हां मंदिरा म्हणते "ऐक—पुन्हां सांगतें ! मुकाट्यानं तोंड बंद कर, नाहीं तर या सुरीनं जीभच कापून टाकीन." विजयेला हें सहन न होऊन ती म्हणाली "काय म्हटलंस ? जीभ कापशील होय ? कोणाची ग तूं जीभ कापणार ?

माझी होय ? मी कोण आहें तें विसरलीस वाटतं ? पुन्हां सांगतें—ऐक ! मी तुझी थोरली सवत—म्हणजे घराची खरी मालकीण आहें हें पक्कं लक्षांत ठेव. पुन्हां जर वाकडं तिकडं बोललीस तर, तंगडी धरून घराबाहेर ओढून टाकीन, समजलीस ?"

हा चाललेला प्रकार पाहून सोमदत्त शांतपणानें म्हणतो "भांडणाचा मुद्दा काय आहे तो मला सांगा ! भांडणाला इतका ऊत येण्याचं कारण काय ! पावसाळ्यांत नद्यांना माज येऊन त्या जशा बेफाम—फुगलेल्या दिसतात, तशा तुम्ही कां दिसतां ?"

"आम्ही माजलेल्या उताणखाट, अन् तुम्ही कसे ? मी लग्नाची थोरली बरोबरीची बायको नकोशी झालें म्हणून ही दुसरी केलीत, अन् आतां तर काय घरांत रांडा यायला लागल्या ! आतां हा माज आम्हांला आला आहे कां तुम्हांला ? "

"मला घरांत आणल्यापासून ह्या बयाचं सारखं सवतीमत्सराचं भांडण सुरू आहे. तें मेलं राहो म्हटलं; पण इकडे बघावं तर घरांत आपल्या बुरखे घेऊन रांडा खुशाल येऊं लागल्या. ही बया तर म्हणते कीं, मीच रांडांना तुमच्याकरितां घरांत आणतें." इतकें बोलून मंदिरा हुंदके देऊन रडूं लागल्यावर पुन्हां म्हणते "असलीं बालंटं पुढें माझ्यावर येणार आहेत असं मला कळलं असतं तर मीं माझ्या बाबांना मला विहिरींत ढकलून द्या म्हणूनच सांगितलं असतं ! माझ्या संसाराचं सर्वस्वीं मातेरं झालं."

"अन् तुला करून आणली तेव्हांच तर माझं झालं आहे."

सोमदत्ताला—त्याच्या बायका जरी काय बोलत आहेत याचा पुरता उलगडा--झाला नाहीं तरी तो अनुमानानें काय प्रकार झाला असेल तो ताडून शांत चित्तानें म्हणतो—

"दोघी उत्तम बायका—आणि त्या दोघींना संसारयात्रेतून मोक्षाला नेऊन पोंचविणारे दोन मुलगे—इतकं उत्तम कुटुंब असतां, त्यांचा नवरा,

प्रौढ वयांत रांडबाज निघेल असं म्हणणं संभवतं तरी का?"

विजया मोठ्या तोऱ्यानें म्हणते "छे ग बाई! तुम्हांला रांडबाज कोण म्हणेल! पायाखालीं मुंगी चिरडेल इतक्या तऱ्हेनं पापाला भिऊन चालतां!"

"मग ती घरांत बुरखेवाली कोण बसली आहे येऊन? इतक्या दिवस तरुण मुलांना शिकवण्याचं ढोंग माजवलं होतं. अन् आतां तरुण मुलींना शिकवण्याचं माजवायचं असेल. घरीं येऊन बसलेली ती बुरखेवाली तुमची एखादी शिष्यीणच असेलना?" इतकें बोलून संतापाच्या आवेशांत मदिरा सोमदत्ताची बचळी धरून पुन्हां म्हणते "शिष्यीणच का ती? का सुंदर मुखड्यावर भाळून एखादी अप्सरा आली आहे मागं लागून? कोण आहे ती?"

"तुम्ही दोघी काय बोलतां, त्याचा अर्थच नाहीं बुवा आपल्याला कळत!" सोमदत्तानें असें उत्तर केल्यावर मदिरा—

"नाहींच कळायचा. आतां भोंदूपणाचं सोंग पांघरलंच पाहिजे. शर्थ झाली बाई या निलाजरेपणाची!" असें बोलली, तेव्हां--

"सांगून ठेवतें, असला हा बाहेरख्यालीपणा मला नाहीं हो कधीं आवडावयाचा!" विजयेनें असें बजावल्यावर, पुन्हां—

"कर्दनकाळ अशा दोन बायका उरावर असतां, तिसरी रांड ती कशाला आणखी हवी! एवढा कुठला ऊत आला आहे!" मदिरा असें बोलली. यावर सोमदत्तानें—

"अजून तुमच्या म्हणण्याचा अर्थ मला कळला नाहीं" असें उत्तर दिलें. तेव्हां विजया म्हणते—

"नाहींच कळायचा म्हणा! पण मी म्हणतें कीं, यातलं जर तुम्हांला कांहींच माहीत नाहीं, तर ती तुमचं नांव कसं घेते?"

"कसं म्हणजे, मी काय सांगूं--साधं घेते कां उखाण्यांत घेते तें?"

"लाज नाहीं वाटत चहाटळपणा करायला! चांगले दांत पडतील तेव्हां कळेल!"

"तें कल्पनेनंही जाणतां येईल."

या उत्तरानें विजया फारच खवळली. तिनें सोमदत्ताचा कान धरला व ती म्हणाली 'कां, जाणलंत का आतां कल्पनेनं?"

"पुरं जाणलं. पण कान मात्र फार ओढूं नकोस. तुझाच नवरा लंबकर्ण होईल म्हणून म्हणतों." सोमदत्त असें बोलला, तेव्हां मदिरेनें त्याचा दुसरा कान जोरानें धरला व ती म्हणाली "आहांतच लंबकर्ण! आतां नवे ते काय व्हायचे आहांत?"

"हा सर्व तुमच्या मनोहर महिम्याचा परिणाम आहे." इतकें सोमदत्त बोलला मात्र, तोंच दोघींनीं त्याचे दोन्ही कान मोठ्या रागानें जोरानें उपटून त्या म्हणाल्या "कळला का आतां आमचा मनोहर महिमा?"

"तो पुष्कळ दिवस समजलेला आहे! डुकराच्या शिकारीकारितां पारधी लोक अशाच कान धरणाऱ्या कुत्र्या शिकवून तयार करीत असतात."

हें ऐकून तर त्या दोघी फारच चिडल्या आणि म्हणाल्या "अरे डुकरा! आम्ही कुत्र्या काय! दाखवतोंच तर मग आतां आमचा कुत्रेपणा!" इतकें बोलून त्या दोघीजणी संतापानें तेथून निघून गेल्यावर, सुमति, जो तो प्रकार बघून अगदीं घाबरून गेला होता तो म्हणतो, "छे! हा प्रसंग फारच कठिण!" हें ऐकून सोमदत्त म्हणतो--

"असल्या क्षुल्लक गोष्टीला जर तुम्ही--फारच कठिण प्रसंग--असं म्हणूं लागलांत, तर प्रत्यक्ष अंगावर डोंगर कोसळल्यावर तुमची काय स्थिति होईल?"

हें त्यांचें संभाषण चाललें आहे तोंच रागाचे फूत्कार सोडीत बेफामपणानें गेलेल्या व नवऱ्यानें व्यंगोक्तींनीं केलेल्या भाषणानें अत्यंत चिडलेल्या--विजया आणि मदिरा घाणेऱ्या पाण्याच्या दोघी दोन घागरी घेऊन तेथें आल्या आणि त्यांनीं त्या सोमदत्ताच्या डोक्यावर ओतल्या. तो प्रकार पाहून सुलोचन स्वगत म्हणतो कीं, 'आता मात्र धडगत नाहीं. येथून निस-

ट्न जावं हेंच बरं." इतका विचार करून तो तेथून पळून गेल्यावर त्या दोघींनीं सोमदत्ताला "आतां कळला का आमचा कुत्रेपणा ?" असें विचारलें. तेव्हां सोमदत्त हंसत हंसतच म्हणाला—

"गडगडाट आणि कडकडाट झाल्यावर पाऊस पाहिजेच होता!"

आतां हें ऐकून तर त्या दोघींचा राग त्यांच्या पोटांत मावेनासाच झाला. दोघींनीं सोमदत्ताचे दोन्ही हात दोहोंकडे जोरानें ओढून धरून त्याला घरीं फरफर ओढीत नेण्याचा निश्चय केला व तो अखेरीस पार पाडला. सोमदत्ताचे दोन्ही हात जेव्हां त्या दोघींनीं ओढून धरले तेव्हां तो विनोदानें म्हणाला "अहाहा! आतां मात्र मजा झाली खरी! ह्या दोघीजणीं माझ्या देहाची ही अशी तराजु करून माझ्या अकलेचं वजन करीत आहेत असंच वाटतं. खरोखर–यांची भांडणावर जितकी प्रीति आहे तितकीच जर स्वर्गीय नीतिवर असती तर काय बहार झाली असती! पण दैवापेक्षां कर्म बलवत्तर असतं त्याला इलाज नाहीं."

## प्रकरण सहावें

# अजब चोराला पकडलें.

राजवाड्यांत मेजवानीला जाण्याची अर्थपतीची वेळ अगदीं भरत आली होती. रोजच्या नियमाप्रमाणें आज मध्यान्हरात्रीं आपलें द्रव्य सुख-रूप बघायला सांपडायचें नाहीं म्हणून अर्थपति तिन्हीसांजांच तें काम उर-कून स्वस्थांतःकरण झाल्यावर स्वतांशींच म्हणतो—

"अहाहा! हें मन आतां किती तरी आनंदी झालं आहे! ह्या माझ्या अंगावरच्या लकतऱ्यांप्रमाणें इतका वेळ तें काळजीच्या कल्पनांनीं पार फाटून गेलं होतं. जिथल्या तिथें सर्व सुखरूप आहे. आज हवेंत इतका

गारठा पडला आहे पण मला त्याचं काय? मनांत द्रव्यासारखी जबरदस्त ऊब असतां लोकरीच्या कपड्यांची ती बाह्यात्कारी ऊब हवी कशाला? भडकीचा पोशाक करणं म्हणजे अज्ञानाचं प्रदर्शन करणंच होय. हे असे माझ्यासारखे मळके–फाटके–कपडे–अंगावर घालणं हेंच ज्ञात्याचं खरं लक्षण! द्रव्य म्हणजे काय प्रति ईश्वर! देव जसा भक्तीनं आणि नवसानं पावतो तसंच हें न्यायानं आणि अन्यायानं प्राप्त होतं. खरं पाहिलं असतां न्यायोपार्जित द्रव्यांत जसा तुटपुंजेपणा असतो तसा अन्यायोपार्जितांत मुबलकपणा असतो. तें अस्थिर, तर हें स्थिर. याचं स्पष्ट उदाहरण म्हणजे रंक आणि राजा! अन्यायोपार्जित द्रव्या! बाबा, खरोखर धन्य आहेस तूं! अरे पण हो–चला, झालीच वेळ; राजवाड्यांत मंडळी जमली असेल. मालती, बाळे मालती, इकडे ये!"

अर्थपतीची हाक ऐकून मालती घरांतून त्याचे जवळ आल्यावर म्हणते "काय बाबा? झाली का वेळ? निघालां का तुम्ही?"

"हो निघालों; पण दाराला नीट आंतून कडी लावून घे. लक्षांत ठेव! घरावरून जाणाऱ्या येणाऱ्यांना घरांत माणसं जागीं आहेत असंच वाटलं पाहिजे, म्हणून तूं निजूं नकोस! मी परत येईपर्यंत झोंपाळ्यावर मोठ्यानं गाणीं म्हणत बैस. म्हणजे चोरबीर घरांत शिरणार नाहीं. चल तर झोंपाळ्याकडे. माझ्या देखत झोंपाळ्यावर बैस!"

"पण पुढच्या दाराला आंतून कडी लावून घ्यावयाची आहे ना?"

"हो, तेंही खरंच! जाऊं मी आतां? नीट कडी लाव."

"तुम्ही परत येईपर्यंत मी झोंपाळ्यावर मोठ्यानं गाणीं म्हणत बसतें."

"आहेसच तूं तशी शहाणी म्हणा!"

इतकें बोलून अर्थपति घराच्या बाहेर पडला व मालतीनें दाराला आंतून कडी लावून घेतली. वास्तविक पुढील ठरलेल्या कार्याकरितां कडी आतांच लावायचें कारण नव्हतें; परंतु अर्थपतीचा संशयी स्वभाव माल-

तीला पूर्ण माहीत होता, त्यामुळें तिनें कडी लावली. अर्ध्या वाटेवर जाऊनही पुन्हां कदाचित्–संशयग्रस्ततेनें–अर्थपति–दाराला मालतीनं कडी लावली आहे कां नाहीं तें बघायला येण्याची भीति होती व त्याप्रमाणें खरेंही झालें! अर्थपतीचा स्वभाव नेहमींचाच संशयग्रस्त असल्यामुळें तो बराच रस्ता चालून गेला असतांही पुन्हां माघारा–मालतीनें कडी लावली आहे कीं नाहीं तें बघण्याकरितां एकवार येऊन परत गेलाच. कडी लावल्याबद्दलची अर्थपतीनें आपली खात्री करून घेऊन तो परत गेलेला मालतीच्या निदर्शनास आल्याबरोबर तिनें हलकेंच कडी काढून ठेवून, ती झोंपाळयावर बसून गाणीं म्हणूं लागली. इतक्या अवसरांत किरात झोंपाळ्याच्या आडबाजूला येऊन केव्हां उभा राहिला होता, हें तिला समजलें नव्हतें; कारण, ती आपलें गाणें म्हणण्याच्या व स्वगत विचार करण्याच्या मनोविकारांत अगदीं गढून गेलेली होती. ती स्वगत म्हणते—

"ठरल्याप्रमाणें तिकडची यायची वेळ टळून गेली, तरी अजून कां बरं येणं होत नाहीं? अहाहा! ती आम्हां परस्परांची–या चांदण्यांत–भेट किती तरी मजेची होईल! इथें सध्यां मला–या ओटीवर पडलेल्या चंद्रकिरणांशिवाय--स्वारी येईपर्यंत जरी कोणी सोबत नाहीं तरी हें चांदणंच माझी सोबत करील! खरंच हे चंद्रकिरण—

(अहो, श्रीराम हा भेटे०)

**क्षितीवरती गळे साचा ॥ अहा रस हा मलयजाचा ॥ मदनकंदार्क हा गळतो ॥ महीवरती कसा नभिचा ॥ चाल ॥ शशिकिरणसंघ हा भासे ॥ हासे सुखानें ॥ चाल ॥ परी वियुतांस हा छळितो ॥ जसा भाला शिकारीचा ॥ ध्रु० ॥"**

हें गाणें चाललें असतां आड उभा राहिलेला किरात स्वतांशीं म्हणतो "काय ही अवर्णनीय शोभा? हा झोंपाळा म्हणजे एक सुरांगनेचं विमानच मागें पुढें पळतं आहे असं वाटतं. समोरून वाहणारा वारा तरी

काय बहार उडवतो आहे पहा! तो कौतुकानं अंगावरील पदर उडवीत असल्यामुळें, पूर्ण रेखलेले असे ते उरोज स्पष्ट दिसत आहेत." अशा तऱ्हेचे किराताचे आत्मगत विचार चालले असतां मालतीचें लक्ष एकदम त्याच्यावर जाऊन ती झोंपाळ्यावरून पट्कन् खालीं उतरली व किंचित् विनोद करावा म्हणून "परवानगीवांचून दुसऱ्याच्या घरांत शिरणाराला चोर म्हणतात" असें बोलली; तेव्हां किरात म्हणतो—

"ही चोर या शब्दाची व्याख्या बरोबर आहे; पण मी चोर नसून चोराची चवकशी करणारा फौजदार असल्यामुळें मला परवानगीची जरूर नाहीं." यानंतर पुढीलप्रमाणें त्या दोघांत भाषण झालें.

"काय, चोरी झाली आहे? कसली चोरी?"

"विश्रामधल्या एका अनुपमेय वस्तूची!"

"अशी ती अपूप वस्तु आहे तरी काय?"

"हे शुक्ल पक्षाचे अखेरचे दिवस असून

**दिंडी.**

**शिरोभूषण शोभतो दिग्वधूंचा ॥**
**अंबरींचा तो राजहंस साचा ॥**
**सुरतरसिंचा जो मूळकंद आहे ॥**
**चंद्रमा तो सदनिं या पातलाहे ॥ १ ॥"**

"वा! मोठ्या गमतीचीच चोरी आहे ही! पण त्या चंद्राला या घरांत येण्याचं कारण काय?"

"कारण, हें घर तसंच अश्रुतपूर्व आहे. आजपर्यंत पयोधरांनीं अंबर झांकलेलं सर्व जग बघत आलं आहे. अंबरानं पयोधर झांकलेलं कौतुकमात्र आजपर्यंत कोणीं बघितलेलं नाहीं. तें कौतुक या घरांत आहे. तें बघण्याकरितांच तो चंद्र आकाश सोडून या घरांत आलेला आहे."

"तो कुठे आहे त्याला काढा पाहूं शोधून!"

"ह्या हातांत तो एकदां सांपडला तर मात्र पुन्हां सुटायचा नाहीं हें कबूल असेल तर आतां त्याला पकडतों."

"नाहीं सुटला तर नाहीं; पण तो सांपडलाच पाहिजे."

मालतीनें इतके वरील शब्द उच्चारल्याबरोबर किरातानें तिला एकदम प्रेमालिंगन दिलें आणि तिची हनुवटी उजव्या हातानें धरून तो म्हणाला—

"हा बघ—हा तो लुच्चा इथें येऊन बसला आहे! लाडके, या तुझ्या मुखशशीला पाहून, तो बघ—तो आकाशांतला चंद्र लाजला. ह्या इथें जर तूं गालबोट लावलंस तर, आपल्या अंकशोभेनं डौल मिरविणारा तो चंद्र लाजून संभ्रमानं वेडाच होईल."

"मी दाराला कडी लावून येतें; आपण तोंपर्यंत झोंपाळ्यावर बसावं."

"मी आंत आलों तेव्हांच कडी लावून आलों आहें."

"विनंतीपत्राला मान देऊन यायचं झालं हे उपकार मी कधीं विसरणार नाहीं."

"ह्यांत उपकार ते कसले! ही सृष्टिरचना स्वभावसिद्धच आहे. परस्परांत पंचशरांनीं युक्त अशा पंचशराचा उदय झाला म्हणजे हें असं व्हायचंच!"

अशा तऱ्हेचें त्यांचें भाषण चाललें असतां, बाहेरून "मालती, अग मालती, कडी काढ" असा शब्द त्यांच्या कानांवर पडला. त्याबरोबर "अगबाई, पहाट झाली का इतक्यांत? बाबा राजवाड्यांतून परत आले. आतां काय करावं?" असें मालती म्हणाली.

तेव्हां किरात म्हणतो "काय करावं तें सांग." यावर मालती म्हणते—

"मी कडी काढून बाबांना आंत घेतें. ते आंत आल्यावर कोणी आल्या गेल्याची चवकशी करून थेट मागिल दारीं जातील, तोंपर्यंत त्या पलीकडच्या अडगळीच्या अंधेऱ्या खोलींत बसावं म्हणजे झालं."

"आपण नाहीं बोवा त्या अंधेऱ्या घाणींत बसणार."

इतकें किरात बोलतो आहे, तोंच पुन्हां रस्त्याच्या दारांतून "मालती, आलीस कां नाहीं अजून? झोंप लागली कीं काय? कडी काढ लवकर." असे अर्थपतीचे शब्द त्यांना ऐकूं आले; तेव्हां मालतीनें आंतूनच "आलें हो बाबा!" असें उत्तर देऊन किरातालः "हं जायचं गडे आतां लवकर त्या खोलींत. या वेळीं अंधेरांत नाहीं बसायचं तर उजेडाचा महाल कसा चालेल लपायला?" असें बोलली. तेव्हां किरात म्हणतो "आपण तर बुवा, ह्या झोंपाळ्यावरून बिलकूल हालणार नाहीं. बाप येवो नाहीं तर काका येवो!"

"पहा बरं! फौजदाराचं चोर व्हावं लागेल!" मालतीनें हे शब्द उच्चारतांच "काय चोर! बसतों तर लपून!" असें किरात बोलला व ठर-लेल्या जागीं जाऊन दडून बसला. चोरटा प्रणय, प्रणयी जनांवर, असले अनेक तऱ्हांचे प्रसंग आणतो हें कांहीं सुज्ञ वाचकांस एथें नव्यानें सांगा-यला हवें असें नाहीं. असो. अजून कडी काढायला मालती येत नाहीं असें पाहून, अर्थपति पुन्हां मोठ्या जोरानें पुढीलप्रमाणें घाबऱ्या स्वरानें दारा-बाहेरून ओरडला.

"अग कार्टे, निजलीस कीं काय? कडी लवकर काढतेस कां फोडूं दार?"

मालतीनें दाराजवळ येऊन कडी काढल्यावर ती मोठ्या विनयानें म्हणाली "बाबा, रागावूं नका! झोंपाळ्याच्या कडींत पदराची कुरळी आड-कली होती ती सोडवीत होतें म्हणून यायला उशीर लागला!"

"असं कां? बरं असूं दे तें! कुणी आलं गेलं नाहीं ना?"

"छे! कुणी नाहीं."

"पहाटेचा डंका पडला. जा—आतां जाऊन नीज."

"रात्र आतां थोडीच उरली आहे. झोंपाळ्यावरच निजूं का मी?"

"बरं नीज! मीही आतां मागील दारापर्यंतच्या दारांच्या कड्या पाहून, जरासा आंग टाकतों अंथरुणावर."

इतकें दोघांचें बोलणें होऊन, अर्थपतीनें पुढच्या दाराची कडी लावलेली आहे कीं नाहीं ती पुन्हां एकदां बघितली व तो थेट मागील परसांत मधल्या दाराला आंतून कडी लावून घेऊन–आपल्या द्रव्यमित्राची गांठ घ्यायला गेला. मालती झोंपाळ्यावर जाऊन बसली व मोठ्यानें म्हणाली.

" फौजदार अशा भिन्या भागूबाई असतात, हें बाई मी आजच बघितलं. अजब चोराला पकडणारे हिंमतबहाद्दर असेच का अंधाराच्या खोलींत लपून बसतात ! " किरात पुढें येऊन म्हणतो—

" अलबत् ! अट्टल चोरांना पकडायचं म्हणजे असाच दबा धरून बसावं लागतं. "

" म्हणजे, एकूण माझ्या बाबांना आपण भ्यायलां नाहींतच म्हणायचे."

" मला भिऊन काय करायचं आहे ? तुझी फजिती होऊं नये म्हणून मी मुद्दाम लपून बसलों होतों. "

" असं का ? मारूं का बाबांना हाक ? "

" जाऊं दे. पुरे तो विनोद ! आतां मला इथून लवकर गेलं पाहिजे, हें तुलाही कबूल असलंच पाहिजे. "

" प्रिया, आपल्या या सहवासांत ही रात्र जशी संपली, तशा पुढच्या रात्री आनंदांत जाण्याकरतां आतां आपण लवकरच एखादी युक्ति काढावी अशी माझी विनंति आहे. "

" लाडके, मी तुला इथून लवकरच मोठया अजब युक्तीनं धडधडीत सर्वांसमक्ष घेऊन जाण्याचं ठरवलं आहे. जरा धीर धर. येतों मी आतां. माझ्या वचनावर पूर्ण विश्वास असूं दे ! "

इतकें बोलून व एक साखरेचा गोडसा पापा घेऊन तो मालतीच्या घराबाहेर पडला व मालती दाराला कडी लावून पहाटेच्या भूपाळ्या म्हणत विचारमग्न अशी झोंपाळ्यावर येऊन बसली.

———

## प्रकरण सातवें

# बायकांचे पुरुष होतात तरी कसे?

"तें पाहिलंत का त्या खोलीला कुलुप लावलं आहे तें! आतां तुमच्या देखत कुलुप उघडून त्या रांडेला बाहेर काढतें, समजलं का? इतकंच नव्हे तर तिला लाथांखालीं तुडवून आम्ही तिची धिंड काढूं धिंड! आलं का लक्षांत?"

पांचव्या प्रकरणाच्या शेवटीं सोमदत्ताला, त्याच्या दोघी बायका, त्याचे दोन हात धरून त्याला रस्त्यांतून फरफर ओढीत घेऊन गेल्या, असें जें सांगितलें आहे त्याच्याच पुढला हा भाग आहे हें वाचकांना वरील विजयेच्या भाषणावरून सहज समजणार आहे. त्या दोघींनीं त्याला जो ओढीत आणला तो तमाशा तर गांवच्या लोकांनीं बघितलाच; परंतु त्याला आपल्या घराच्या ओटीवर त्या दोघींनीं आणून उभा केल्यावर पुढें जी गंमत घडून आली ती मात्र फारच बहारीची झाली. वरील विजयेचें भाषण ऐकून सोमदत्त जेव्हां म्हणाला कीं, "अशी ती कोणची रांड आहे तिला आणाच एकदां माझ्यासमोर!" तेव्हां मंदिरेनें, खोलींत कोंडून ठेवलेल्या त्या बुरखा घेतलेल्या व्यक्तीला सोमदत्तापुढें झपाट्यासरसें आणून उभें केलें; आणि "ही पहा समोर उभी केली. बोला आतां! पडला का प्रकाश?" सोमदत्त म्हणतो "छे! ही वेश्या असेल अशी माझा मनोरथयक्ष तर माझ्या मनाशीं साक्ष पटवीत नाहीं." विजयेला यक्षाच्या साक्षीच्या हवाल्याचा राग येऊन तिनें त्या व्यक्तीच्या तोंडावरचा बुरखा काढीत काढीतच "पुरे करा आतां त्या तुमच्या मनोरथयक्षाची साक्ष. हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे? ही पहा कोण आहे ती!" असें म्हटलें.

झालें, सर्वच भांडण येथें संपलें. बुरखा काढल्यावर आंतून दृष्टीस

काय पडलें, तर चांगली उत्तम तऱ्हेची वरच्या ओंठावर झालर आलेली एक पुरुषमूर्ति. हा चमत्कार दृष्टीला पडतांच आपल्या अदूरदर्शीपणा-बद्दलची लाज वाटून त्या दोघी स्त्रिया जरी शरमिंद्या झाल्या, तरी उसनें अवसान आणून "ही भुताटकी कुठे शिकलांत? बायकांचे पुरुष बनवायचं एखादं चेटुक त्या मेल्या मनोरथयक्षानं शिकवलं आहे, असं यावरून स्वच्छ दिसतं! मेले या चेटकानं बायकांचे पुरुष होतात तरी कसे? मग पुरुषां-च्या बायका कां होऊं नयेत?" असें म्हणाल्या. तेव्हां सोमदत्त म्हणतो—

"होतात! सर्व कांहीं होतं. हें सर्व नाटक आहे. हा सगळा आ-भास आहे! बायकोचा वेष जरी दिसला तरी ती बायकोच प्रकृतीनं अ-सावी अगर पुरुषाचा वेष दिसला असतां तोही प्राणी पुरुषप्रकृतीचाच असला पाहिजे असं कांहीं परमेश्वरानं ठरवून ठेवलेलं नाहीं. या गोष्टी जशा मानवरचित नाट्यप्रयोगांत रंगभूमीवर हरघडी दृष्टीला पडतात, तद्वतच या पृथ्वीरूप रंगभूमीवर परमेश्वरविरचित जो नाट्यप्रयोग अहोरात्र चाललेला आहे, त्यांतही नाना तऱ्हेचे कल्पनातीत असे चमत्कृतींचे देखावे हरहम्मेश दृष्टीस पडतात. तेव्हां यांत विशेष तें काय आहे! हा सर्व विश्वाचा प-सारा नाटकीच आहे! आतां हा जो प्रकार एथें घडून आला तो तरी त्या नाटकांतलाच एक छोटासा प्रवेश आहे, असं म्हणायला आतां तुम्ही दोघी-जणी खास कचरणार नाहीं."

"आम्हांला नको असल्या ह्या तुमच्या चेटकी नाटकाच्या बाजा-राची उठाठेव! चल ग मदिरे घरांत जाऊं. बसूं दे त्यांना त्या नाटकांत रंगत!"

इतकें बोलून, त्या, आपली फजिती झाल्यामुळें पूर्ण ओशाळ्या होऊन कांहीं तरी निमित्त काढून तेथून घरांत निघून गेल्यावर--ओसरीवर सोमदत्त आणि वसुमति--बुरख्यांतला स्त्रीरूप पुरुष यांच्यामध्यें पुढील-प्रमाणें भाषण झालें. वसुमति सोमदत्ताच्या पायां पडून म्हणाला—

" क्षमा असावी ! या स्त्रीवेषाचं कारण आपल्या लक्षांत आलंच असेल ! "

" हो हो ! अलबत ! आमच्या संस्थानच्या सेनापतींनीं तुमच्या संस्थानचा जो नुकताच पराजय केला तोच या स्त्रीवेषाचं कारण असला पाहिजे ! 'तुमच्या संस्थानचा जर कोणी पुरुष आमच्या संस्थानांत आला तर त्याला देहांताची शिक्षा दिली जाईल' असा जो आमच्या संस्थानानं नुकताच कायदा केला आहे, त्या कायद्यावरची ही स्त्रीवेषाची तोड अपूर्व आहे; पण त्यांत कांहीं विशेष नाहीं. हें असं चालायचंच ! पण या स्त्री-वेषाबद्दलची माझी कल्पना खरी आहेना ? "

" आपली कल्पना कशी चुकेल ? "

" अशा गैरसोयीच्या वेळीं मीच तिकडे तुम्हांला शिक्षण द्यायला आलों असतों. स्त्रीवेषांत, शिक्षणाकरितां इकडे येण्याचा तुम्हीं विनाकारण त्रास घेतलांत ! शाळागृहांची स्थापना न करतां रस्त्यानं फिरतां फिरतांच शिक्षण देण्याची माझी संवय तुम्हांला माहित आहेच. मी स्वतः माझा शिष्यवर्ग बरोबर घेऊन तुमच्या संस्थानांत आलों असतों."

" त्या मार्गापेक्षां मला हाच मार्ग सुकर वाटला."

" कायदा आणि अमलदारांचा हुकूम—ह्या दोहोंना या वर्तनानं हरताळ लागत नाहीं काय ?"

" 'परमेश्वराकडे पूर्ण लक्ष असलं म्हणजे त्यांत सर्व धर्म आला,' असा जो आपला नेहमींचा उपदेश, त्यालाच अनुसरून मी नेहमीं वागत असतों. कायदा, हुकूम, अंमलदार वगैरे सर्वांचा अंतर्भाव मी, परमेश्वराकडे असलेल्या माझ्या ध्यानांत करतों."

हें जर खरं म्हणावं, तर ज्या गोष्टी आपल्या आटोक्यांत नाहींत, त्यांबद्दल देवाचा अभिप्राय घेण्याकरितां, सर्व कामं बाजूला ठेवून, त्याला प्रसन्न करून घेण्याची तुम्ही खटपट कराल काय ?"

"असलं हें कल्याणकारक काम मी सदैव करतों; तरी पण देवा-बद्दलची वस्तुस्थिति अद्याप मला कळत नाहीं!"

"बाबा रे, देव परतंत्र नसून स्वतंत्र आहे. आपण त्याच्यापाशीं मागितलेलं देणं त्याच्या मर्जीवर असतं. मूर्खपणाच्या आव्हानाला तो कधींच मान देत नाहीं. ही त्याची वस्तुस्थिति आहे. कांहीं लोकांना वाटतं कीं, देव कांहीं गोष्टींकडे दुर्लक्ष्य करतो व कांहींकडे लक्ष्य देतो. पण हें अजी-बात खोटं आहे. देव हा सर्व जगताचा पर्यालोचक आहे. आपल्या अति-तर अशा गुप्त कल्पनांचं त्याला पूर्ण ज्ञान असतं. तो नेहमीं आपल्या सन्निध असतो. आपल्या मनांत प्रेरणा करणारा तोच. एवढ्याचकरितां मी त्याची नेहमीं प्रार्थना करितों.

"हें सगळं खरं; पण देव इंद्रियांना प्रत्यक्ष होत नाहीं. याचं स्पष्टी-करण काय?"

"याचं स्पष्टीकरण इतकंच कीं, वाटेंत जें जें येईल त्याला मोडून टाकणारा जो वारा, त्याचीच साक्ष घ्या. तो दिसत नाहीं, पण अखिल जगताला व्यापून राहिला आहे. आपला आत्मा हा स्वांतरंग असतां, आ-पल्या इंद्रियांना जसा स्पष्ट होत नाहीं, तसाच देव आहे. जें आपणांला दिसत नाहीं तें खोटं, असं म्हणूं नये. जें चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं तें ज्ञान-चक्षूंनीं पहावं. ज्याचे सर्व भाग परस्पराशीं मिलाफ पावून, मनुष्याला सुख व्हावं अशा बेतानं केलेले आहेत असं जें हें विश्व, तें ज्या परमेश्वरानं रचलं आहे आणि त्याचा सांभाळही जो तोच करतो, त्याची पूजा करून त्याला सन्मान देणें हा आपणां जीवांचा धर्म होय."

"पूजा करणं ती कशी करावी?"

"पूजा करणं म्हणजे संतुष्ट करणं. संतुष्ट करणं म्हणजे त्याच्या आज्ञे-प्रमाणं वागणं."

"आजच्या ह्या धड्याचं मी नीट मनन करतों. आतां पहाट झाली,

सूर्योदयाच्या आंत पुन्हा स्त्रीवेषांतच परत गेलं पाहिजे."

"ठीक आहे!"

वसुमति स्त्रीवेष घेऊन सोमदत्ताच्या घराच्या बाहेर जों पडतो आहे, तोंच अर्थपति मोठ्या उल्हासानें सोमदत्त जेथें बसला होता तेथें ओटीवर येऊन तो सोमदत्ताला म्हणतो "सोमदत्ता, काय चाललं आहे?"

"आपली स्वारी आज इतक्या पहाटचीच इकडे कुणीकडे झुकली?"

"बाबा रे, तुझा गुणानुवाद गायला."

"अं हं:! तेवढी मात्र कृपा करा. तो आपला गाण्याचा समारंभ दुसऱ्या कोठें तरी जाऊन करा."

"मी तरी तेंच म्हणतों. तुझा हा कुरूप खर्बुजी चेहरा आणि ही शरीराची ओबडधोबड यष्टि पाहिली म्हणजे-तूं महामूर्ख आणि मतिमंद असावास, असं एखादा अज्ञानी सुद्धां म्हणूं शकेल. असं असतां 'सोमदत्तानं स्वर्गीचं नीतिशास्त्र ह्या भूमंडळावर आणलं' असं-राजेश्वर, उमाकांत, नागराज-वगैरे मंडळी म्हणते, तेव्हां इथं माझ्यासारख्या ज्ञात्यानं हसावं कीं रडावं?"

"हवं तर पहिल्यानदां रडावं आणि मागून हंसावं! तें असो म्हणा; पण मी म्हणतों, मूर्तिकार मोठी मेहनत घेऊन, अचेतन पाषाणाला मनुष्याचं सादृश्य आणतो, आणि माणसं ज्ञानादि गोष्टी प्राप्त करून घेऊनही पाषाणाचं सादृश्य घालवण्याबद्दल कांहींच मेहनत करीत नाहींत--याला काय म्हणावं?"

"अशा तऱ्हेच्या व्याजोक्ति म्हणजेच जर 'स्वर्गीचं नीतिशास्त्र' असेल तर असो बिचारं. पण जाऊं दे. या बाबतींत तुझ्यासारख्या पढतमूर्खाशीं अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. ही तुझी आमंत्रणपत्रिका घे पाहू!"

अर्थपतीनें दिलेली आमंत्रणपत्रिका घेऊन ती वाचून पाहिल्यावर सोमदत्त म्हणतो "अर्थपते, असलीं प्रहसनं बघायला जाण्याचा मला

मोठा तिरस्कार आहे. मी नाहीं तें बघायला येणार ! "

" अरे, हें प्रहसन तुझ्यावरच रचलं असल्यामुळें तूं नाटकगृहांत येणं अवश्य आहे. शिवाय, तूं तुझ्या कविमित्राच्या करुणरसप्रधान नाटकाची नेहमीं स्तुति करतोस, म्हणून त्याचा सूड उगवण्याकरतांच हें लिहिलेलं असल्यामुळें याचा प्रयोग बघायला तुला आलंच पाहिजे. "

" नाहीं--हें कारण ठीक दिसत नाहीं. जो मनुष्य एका तटाचा आवडता होतो त्याची थट्टा करून लोकांना हंसवणं--हा जो नवा सद्गुण सध्यां कांहीं नाटककारांत शिरला आहे, त्याचंच हें 'मेघमाला' प्रहसन द्योतक असलं पाहिजे. "

" कांहीं का असेना ! आज रात्रीं तुला नाटकगृहांत आलंच पाहिजे. त्या प्रहसनांतल्या तुझ्या थट्टेंत तुझी शांति जर कायम राहिली तरच तूं खरा शांतिब्रह्म असं आम्ही म्हणूं. "

" माझ्या शांतीबद्दल मला लोकांच्या दाखलापत्रकाची जरूरी काय ? परीक्षेला कोणी बसावं ? जो उत्तीर्ण झाला नसेल त्यानं ! तुमचा आग्रहच आहे तर येईन बापडा ! माझं काय जातं ? "

इतक्यांत घरांत मोठ्यानें कडाक्याचें भांडण चालू असल्याचें तेथें ऐकूं आलें. त्यामुळें अर्थपति मोठ्या चौकस मुद्रेनें माजघराकडे पाहूं लागला असतां विजया हातांत एक घागर घेऊन क्रोधवश झालेली अशी मोठ्या झपाट्यानें ओटीकडे येत अससां त्याच्या दृष्टीस पडली. त्यामुळें तो घाबरून " अरे बाप रे ! येतो आतां मी ! " असें म्हणून झटकन् तेथून निघून गेला, व विजया हातांतली घागर सोमदत्तापुढें आपटून म्हणाली " गेला का मेला काळतोंड्या पळून ! म्हटलं गप्पाष्टकं संपली कीं नाहींत अजून ! बाहेर उन्हं दिखील पडलीं ! ही पाहिलीत का घागर ? "

" चांगली आहे ! वर्णन करूं होय ? "

" वर्णन विचारायला नाहीं आलें. हिला मदिरेनं किती पोंचे पाडले

आहेत ते दाखवायला आलें आहें. ती नव्या नवलपरीची लाडकी दुसरी बायको आहे; म्हणून म्हणतें, ह्या घागरीवर जितके पोंचे आहेत तितके तिच्या अंगावर उठवले पाहिजेत!"

"पोंचे पडले यांत विशेष तें काय झालं! तिचं नांव काय तर मदिरा. चालतांना झोकांडा गेला तर कमरेवरची घागर निसटून ती पोंचलायचीच."

"हें पाहिलंका हें आपल्या लाडक्या विजयेचं करणं! हें घंगाळ मघांशीं रागाच्या सपाट्यांत धाडकन् दगडावर आपटलंन बुडाशीं सगळं फुटलं." मदिरा घंगाळ घेऊन येऊन मध्येंच बोलली. तेव्हां सोमदत्त म्हणाला—

"तूं घागर पोंचललीसं अन् तिनं घंगाळ फोडलं. फिटंफाट झाली. आपल्या घरीं कमी काय आहे! श्रीमंतीला ऊत आला आहे. हिकडे विजया अन् तिकडे मदिरा."

"इकले विजयान् तिकले मदिला! लाज नाहीं वाटत दोघींची बरोबरी करायला! मी केवढीन् ती केवढीशी चिमुरडी! अक्कल कुठें गेली!"

"दोघींच्या नादांत गुंग झाली."

"चोमडेपणा पुरे नाहीं का झाला अजून? सकाळच्या प्रहरीं ताजी न्याहारी पाहिजे वाटतं?"

"अलबत! शिळी काय कामाची! तुझ्यासारखी सुग्रण बायको असतां ताजी ताजी लज्जतदार खायची सोडून मी शिळी काय म्हणून खाईन! आजच्या न्याहारीला गरम मसालेदार ताजी बहार पाहिजे!"

"असं का? घ्या तर." असें म्हणून त्या दोघी त्याला रागानें दोहींकडून ओरबाडून त्याच्या अंगावरची बंडी फाडून टाकतात व "झाली ना आतां ताजी ऊन ऊन न्याहारी?" असें विचारतात. त्यावर—

"अहाहा! किती पण खुमासदार म्हणून सांगूं! फारच बहारीची! खूपच मिठास!"

"आग लागली त्या निर्लज्जपणाला!" असें म्हणून दोघी घरांत निघून गेल्यावर सोमदत्त स्वगत म्हणतो–

"सापानं आपली कात टाकून तरणं व्हावं, बकऱ्यानं आपल्या लोकरी बंडीला रजा देऊन दिगंबर व्हावं, किंवा झाडानं आपल्या सालीची संगत सोडून नव्या सालीच्या मैत्रीची वाट पहावी–तशी या देहाची स्थिति झाली आहे! इतकं जरी झालं आहे तरी माझ्या स्त्रिया ममताळू त्या ममताळूच! ग्रीष्म ऋतूंतल्या उकाड्यानं तापलेलं हें शरीर–त्यांनीं माझी बंडी फाडून थंड केलं! ह्याला अप्रेम असं कसं म्हणावं! दुसरं असं कीं जीर्ण रक्ताचं उत्तम शोधन व्हावं म्हणूनच त्यांनीं माझं हें अंग आपल्या नखांनीं ओरबाडलं! या गोष्टीबद्दल मीं त्यांना ममताळू म्हणूं नये तर काय दुष्ट म्हणावं! छेः, महत्पाप! महत्पाप! खरोखरीच मी पुण्यवान्, म्हणूनच मला अशा स्त्रिया मिळाल्या!"

---

## प्रकरण आठवें

# "मालतीला युक्तीनं तुझ्या हातांत देतों."

सायंकाळचा वेळ. या वेळीं पुष्पपूर राजधानींतला राजरस्ता अनेक तऱ्हांच्या वाहनांनीं आणि मनुष्यांनीं अगदीं फुलून गेला होता. गंध्यांच्या दुकानांत चकाट्या पिटणारे आंबटशोकी आणि बेगुमानपणानें वारयोषितांच्या माड्या चढणारे निर्लज्ज उडाणटप्पू यांचा तर काय या वेळीं दिवसच उजाडला होता. खिसेकातरू भामटे आणि डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न करणारे चर्मकार त्या रस्त्यांतील गर्दीतून संचार करीतच होते. अशा त्या फुटक्या तिन्हीसांजच्या वेळीं त्या शहरचे तिघे नागरिक

मोठ्या लगबगीनें, मोठ्या उत्साहानें, आपसांत कांहीं एका विशेष विषयावर बोलत चालले होते. ते काय बोलत चालले आहेत व ते कोण कोण आहेत, हें आतां त्यांच्या बोलण्यावरून आपल्याला ताडतां आलें तर पाहूं या !

" त्याबद्दल तुम्ही काळजी सोडा हो ! "

" बरं, उपदेशाची तऱ्हा कशी काय घातली आहे ? "

" हें पहा अपूर्वसेन, मीं हस्तलिखित प्रत वाचली आहे. तीवरून सोमदत्ताची लुच्चेगिरी आणि नास्तिकपणा हीं चांगलींच व्यक्त होतील असं मला वाटतं ! "

" वृषसेन, तसं तें वाचनीय असेल, पण रंगभूमीवर प्रेक्षणीय होईल का ? कारण, जें वाचनीय तें प्रेक्षणीय नसतं असा अनुभव आहे ! "

" माझे लेख श्राव्यापेक्षां दृश्यच जास्त असतात, असा आजपर्यंतचा तुम्हांला अनुभव नाहीं का ? "

" होय, कविराज ! तसा अनुभव आहे; इतकंच नव्हे, तर तुमचे लेख चिरकाल टिकणारे जरी नसतात, तरीं तात्पुरती महती मिळविणारे असतात हेंही प्रसिद्ध आहे. "

"अहो, कुठे कालिदासभवभूत्यादि कवि आणि कुठें मी ! त्यांचीं नाटकं म्हणजे चिरंजीव अशी सजीव सृष्टि, आणि माझीं म्हणजे क्षणैक आयुर्दायाचींच नव्हेत तर निव्वळ चिंध्याखळीचीं जिनगरी चित्रं ! कवि, चित्रकार, योद्धे, नट, मुत्सद्दी हे निसर्गतःच जन्मावे लागतात. माझं तर तसं मुळींच नाहीं. माझं म्हणजे विनोदाच्या चार ओळी इकडच्या तिकडच्या उपटाउपटी करून लिहाव्या—लोकांची थट्टा करावी--तुमच्यासारख्या थोरांना खूष करून सुप्रसन्न करून घ्यावं—क्षणैक हंशा पिकवावा--संपलं ! "

" एकंदरींत नाटकांतल्या एखाद्या क्षुल्लक पात्राप्रमाणेंच तुमची स्थिति आहे म्हणायची ! तें एकदां कां पडद्याच्या आड झालं कीं, प्रेक्षकांच्या स्मृतींच्याही आड झालंच म्हणायचं ! "

" बरं चला–आतांच्या आतां रंगाची तालीम बघून कांहीं फेरबदल करायचा असेल, तर ताबडतोब सूचना झाल्या पाहिजेत ! "

या भाषणावरून–कवि, अपूर्वसेन आणि वृषसेन याच त्या तीन व्यक्ति मोठ्या लगबगीनें आपापसांत बोलत चालल्या होत्या व त्यांचा बोलण्याचा विषय काय होता याबद्दलची आतां विशेष परिस्फुटता करून वाचकांना सांगण्याची कांहींच जरूरी राहिलेली नाहीं. ते तिघे बोलत जातांजातां ' विदग्धमंडन ' नाटकगृहाच्या दरवाजांतून आंत गेलेले याच वेळीं दोघां निराळ्याच व्यक्तींनीं बघून त्यांपैकीं एक व्यक्ति म्हणते–" ते बघितलेस का, ते तिघे विदग्धमंडन नाटकगृहांत शिरत आहेत ते ? " दुसरी व्यक्ति म्हणते-" बघितले ! त्यांनीं सोमदत्ताची निंदा करण्याकरितां ' मेघमाला ' नांवाचं प्रहसन रचलं आहे. उद्यां रात्रीं त्याचा ते प्रयोग करणार आहेत."

" अशा कुत्सितांना काय म्हणावं हेंच कळत नाहीं."

" हीं असलीं प्रहसनं म्हणजे बिनखर्चाची जगड्व्याळ जाहिरातच आहे. बरं पण, तूं हातीं घेतलेल्या कामाचं काय केलंस ?"

बरें पण, या दोन व्यक्ती कोण असाव्या बरें ? आमचे चाणाक्ष वाचक, त्यांच्या परस्परांतील पुढील संभाषणावरून त्या व्यक्ति कोण होत्या हें ताबडतोब ओळखतील यांत बिलकूल संदेह नाहीं. त्या दोघांचें भाषण नंतर पुढीलप्रमाणें चाललें होतें.

" हातीं घेतलेल्या कामासंबंधानं काय करायचं, त्याबद्दल माझं मीं काय तें केव्हांच ठरवून ठेवलं आहे, पण त्यासंबंधानं तुझा विचार काय ठरला आहे ?"

" या नाटकाचा सूत्रधार जर तूंच आहेस, तर हें आनंदपर्यवसायी करणं हेंही तुझंच काम आहे. "

" सर्वच जर तूं माझ्यावर ढकलतो आहेस तर माझा बेत एक ! अर्जुनानं श्रीकृष्णाच्या साह्यानं जी स्थिति सुभद्रेची केली तीच गोष्ट आतां

माझ्या साह्यानं तूं मालतीची कर. अर्थपतीला द्रव्यघटांवरचा नाग समजून मी मालतीला युक्तीनं तुझ्या हातांत देतों."

"ह्या कृत्यांत कांहीं घातपात जर झाला, तर माझ्या निष्कलंक कीर्तीला मात्र व्यर्थ डाग लागून प्रत्यक्ष रजनीही मला लाजवील हें मात्र लक्षांत ठेव !"

हें भाषण किरात आणि वालखिल्य यांच्यामध्यें चाललें होतें, हें आमच्या वाचकांनीं आतां ताडलेंच आहे. त्यांचें आपसांत मालती-संबंधानें वरीलप्रमाणें भाषण होतां होतां शेवटीं वालखिल्यानें—

"तुला भिण्याचं कांहींच कारण नाहीं. हा सर्व कार्यभाग—सोमदत्ताच्या दोघी स्त्रियांकडून मोठया युक्तीनं कसा उरकून घेऊन—अर्थपतीच्या सर्व अर्थासह मालती कशी अचुक तुला मिळवून देतों, तें तर पहा ! चल तर आतां—बरीच वेळ झाली !"

याप्रमाणें विचार ठरवून ते दोघे आपापल्या कार्याला लागण्याकरितां स्वतांच्या घरोघर गेले.

---

## प्रकरण नववें

# विदग्धमंडन नाटकगृह.

कालपासून आतांपर्यंत सर्व शहरभर—सोमदत्तावर रचल्या गेलेल्या 'मेघमाला' प्रहसनासंबंधानें जो एक चर्चेचा विषय झालेला होता, त्या प्रहसनाचा प्रयोग होण्याची वेळ येऊन ठेपली. नाटकगृहाच्या आसपास प्रेक्षकसमुदायाचे थवेच्या थवे हिंडूं लागले. नाटकगृहाच्या दरवाजांवर प्रेक्षकवर्गाची एकच झिम्मड उडालेली दिसूं लागली. त्यांत नाटकवाल्यांच्या गोता-

वळ्यांची अरेरावी आधीं बंद करावी किंवा द्रव्य खर्चून नाट्यप्रयोग बघण्याकरितां आलेल्या प्रेक्षकसमुदायाची नीट व्यवस्था आधीं ठेवावी या दुहेरी पेचांत—व्यवस्थापकांचें मस्तक दंग झालेलें दिसत होतें. नाटकवाल्यांचा म्हणजे—नाट्यप्रयोगांत सोंगें घेणाऱ्या नटवर्गाचाच नव्हे तर—भोंवतालच्या आनुषंगिक—न्हावी, धोबी, आचारी, पाणके, टपालवाले, माळी, स्नेही, स्नेह्यांचे स्नेही, तोंडओळखीचे वगैरे वगैरे गुणिजनांचाही नाटकगृहाच्या दरवाजावर केवढा थोरला गोतावळा, ऐनप्रसंगीं जमतो त्याचें कोठवर वर्णन करावें! आमच्या या नाट्यप्रयोगाचे व्यवस्थापक मोठे कसलेले असल्यामुळें त्यांनीं गडबड, दंगाधोपा वगैरे कांहीं एक न होऊं देतां, सर्व प्रकारच्या प्रेक्षकवर्गांची, मोठ्या कुशलतेनें, नाट्यप्रयोग बघण्यास बसण्याची व्यवस्था केली. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याच्या घटका अगदीं भरत आल्या त्या वेळीं कांहीं प्रेक्षकवर्गांत मोठा उत्साह दिसत होता व कांहींत तिरस्कार दिसत होता. उत्साही प्रेक्षकांपैकीं कांहीं प्रेक्षकांत मोठ्या आतुरतेचा भाषणचमत्कार चालला होता. तो काय होता बरें? ऐका!

"कसं काय बुवा! तुम्ही बसलां आहांत ही जागा ठीक आहे ना?"

"अगदीं ठीक आहे. आपण तिघे इथेंच बसूं! सोमदत्त वगैरे लोकांकरितां त्या समोरच्या जागा राखून ठेवल्या आहेतच."

"पण सोमदत्त येणार हें खास ना?"

"कां बरं?"

"हो, शंका घ्यायला जागा आहे खरी! कारण, माझी कोणचीच कृति त्याला पसंत पडत नाहीं. 'ज्याला प्रवेशरचना करतां येत नाहीं व अंक कोठें व कां तोडायचा, याचं उत्तर समर्पक असं देतां येत नाहीं, सबंध पुस्तकांत—वर्तमानपत्रं, कादंबऱ्या वगैरेंतले उतारे घुसडून दिलेले असतात—स्वतांचं असं कांहींच नसतं—मात्र पुस्तकावर ग्रंथकार म्हणून नांव—असले

तें खिचडीचं पुस्तक जगापुढें न मांडलेलं बरं' असं सोमदत्त माझ्याविषयीं माझ्या एका स्नेह्याजवळ नुकताच बोललेला मला समजलं आहे."

"बरं पण काय हो, नाटकांत अंक कां तोडतात?"

"या प्रश्नांत काय जीव आहे? याचं उत्तर वृषसेनसुद्धां देतील; मग मी तर देईनच देईन!"

"अपूर्वसेन, मला वाटतं–अंक तोडण्याचा प्रघात मोठ्या सयुक्तिक पायावर पडलेला आहे. अहो, प्रेक्षकवर्ग कुठें आणि कसा कंटाळेल हें नाट्यलेखकाला समजलंच पाहिजे. अमुक ठिकाणीं प्रेक्षकवर्ग कंटाळेल असं वाटलं कीं तोड अंक न् दुसरं काय?"

"म्हणजे एकंदरींत दीर्घ किंवा लघु यांपैकीं कोणचीही शंका निवारण करण्याकरितां किंवा अशाच कांहीं सोयीकरितां ज़ी विश्रांति लागते त्यांपैकींच नाटकांत अंक तोडणं ही एक सोय आहे म्हणायची?"

"यांत काय संशय!"

"वाहवा कविराज! एकंदरींत प्रेक्षकवर्ग म्हणजे बळजबरीनं वेठीला धरून आणलेलीं गाढवंच असतात असं म्हणायचं?"

"जाऊं द्या, तो वाद मग पुढें करतां येईल! खेळ सुरू व्हायची वेळ झाली. प्रेक्षकवर्ग किती जमला आहे तें बघण्याकरतां तीं पहा रंगलेलीं पात्रं पडद्याच्या आडून डोकावूं लागलीं. यावरून प्रयोगारंभाकरतां नटवर्ग रंगून सज्ज झाला आहे किंवा होत आहे, असं म्हणायला हरकत नाहीं. उठा, नाटकाचार्य उठा! जा–पात्रं रंगभूमीचे ठायीं येण्यास कितपत सज्ज झालीं आहेत तीं एकदां जाऊन पहा!"

"ठीक आहे!" असें म्हणून नाटकाचे लेखक नाट्याचार्य तेथून उठून गेल्यावर पुन्हा अपूर्वसेन आणि वृषसेन यांमध्यें पुढील भाषण होत असतां–सोमदत्त, अर्थपति, किरात, वालखिल्य वगैरे मंडळींना नाटकगृहाचे व्यवस्थापक बरोबर घेऊन येऊन त्यांच्याचसाठीं मुद्दाम राखून ठेवि-

लेल्या जागांवर त्यांना बसवून तो आपल्या कामाला गेल्यावर प्रयोगाला सुरुवात झाली.

"पण अजून सोमदत्त वगैरे मंडळी येत नाहीं हें कसं काय?"

"त्याबद्दल काळजी सोडा हो! बाण असा सोडला आहे, कीं तो सोमदत्ताला घेतल्याशिवाय परत म्हणून यायचाच नाहीं."

"हे तुमचे शब्द खरे ठरोत म्हणजे झालं?"

"ते तर व्हायचेच; पण खेळ सुरू असतां विरुद्ध बाजूला घडणारे चमत्कार बारकाईनें बघायला मात्र विसरूं नका हो!"

"छे हो! नांव सोडा! तें तर कधींच विसरणार नाहीं. पण ती पहा सोमदत्त वगैरे मंडळी आलीच. अरे वा, ती मंडळी यायला आणि हा पहा नाटकाचा पडदा वर जाऊन सूत्रधाराची नान्दी सुरू व्हायला एकच गांठ पडली. योग तर नामी आहे खरा!"

---

# संगीत मेघमाला प्रहसन.

(नान्दी)

श्लोक-(वृत्त-स्रग्धरा.)

**आकाशा सोडुनीयां अवनिवरि शशी पातला या भ्रमानें ॥**
**ग्रासाया राहु येई तव वदन, पहा अंबरीं संभ्रमानें ॥**
**ऐकोनी नाथवाणी मुखकमल करी भामिनी ऊर्ध्व प्रांतीं ॥**
**चुंबी ऐशी सखी तद्धितथगुरुगिरा देउं तुम्हांस शांती ॥ १ ॥**

(सूत्रधार पुढें येऊन)

अहाहा! केवढा हा खोटं बोलण्याचा महिमा अगाध आहे! खोटं बोलण्यापासून इच्छेला येईल तें जरी सुख प्राप्त करून घेतां येतं, तरी खोटं

बोलतांना फार दूरवर विचार करावा लागतो. कीर्ति, प्रतिष्ठा, कनककांता, सुखदुःख या सर्वांचा जन्म खोट्यापासूनच होतो. कारण, खऱ्याची उत्पत्ति खोट्यापासूनच झालेली आहे असं निसर्गाचं वाक्य आहे. ( विदूषक येतो.)

**विदूषक**—अहो तर्कालंकारन्यायभट्टाचार्य शैलूषपुत्र, एखाद्या तत्व-वेत्त्याप्रमाणें, या सभाजनांपुढें फारशी काय वटवट चालवली आहेत?

**सूत्रधार**—मित्रा, आलास, ठीक झालं! आजच्या प्रयोगाचा नायक जो सोमदत्त, त्यानं स्वर्गीचं नीतिशास्त्र या भूमंडळावर कसं आणलं तें हें तुझं ढोलकं आणि ती जादूची कांडी ह्या प्रेक्षकांना आतां उत्तम तऱ्हेनं दाखवितीलच.

**विदूषक**—यांत काय संशय! चला तुम्ही आतां इथून पडद्यांत, आणि लागा आपल्या कामाला! पण हो! जरा थांबा! प्रथम नाट्यकलेची थोरवी या सभाजनांना सांगून नंतर आपण इथून स्वस्थलीं गमन करावं अशी आमची तुम्हांला आज्ञा होते आहे, ती निमुटपणें मान्य करा!

**सूत्रधार**—ठीक आहे! सभाजनहो,

( साकी.)

**छाया सुखवी पांथिक, तैशी नाट्यकला जगताला ॥**
**दुःखि, विलासी, श्रमित जनांची प्रिय रमणी ही बाला ॥**
**चंद्रा रजनि तशी ॥ आहे सकलां ही हविशी ॥ १ ॥**

[जातो.]

**विदूषक**—( ढोलकें वाजवीत ) लगे ढोल, लगे ढोल, लगे ढोल, लगे ढोल! चल् चल् चल् चल् चल् चल् चल्! अहाहा! केवढी ही ह्या जादूच्या कांडीची बहादुरी आणि आमच्या सूत्रधार हंडीबागाची हुषारी! हा सगळा या ढोलक्याच्या आवाजाचा प्रताप आहे. खोट्या मायेचं प्रचंड स्वरूप असंच असतं. या कल्पयष्टीच्या जोरावर जादूगार लोक हवी ती गोष्ट

जरी करून दाखवितात तरी ते अखेरपर्यंत राजमान्य असे भिकारीच रहातात; कारण, जादू म्हणजे सारा लबाडीचा–खोटा बाजार. तो बाजार कसा असतो तेंच दाखवण्याकरतां मी या वेषांत या ठिकाणीं आलों आहें. आजच्या प्रहसनाचा नायक जो सोमदत्त, त्याला आम्हीं एका फाटक्या टोपलीच्या विमानांत ढगांवर बशिवलं असून, तो तिथून भूमंडळावरच्या तरुण मुलांना काय उपदेश करतो आहे तें आतां ऐका ! ( पडद्यावर जादूची कांडी फिरवून ) चल चल् चल् चल् चल् , लगे ढोल, लगे ढोल ( असें म्हणत पडद्यांत जातो व पडदा वर होऊन रस्त्यावर तरुण मुलें उभीं असून वर वर्णन केल्याप्रमाणें सोमदत्त त्यांना उपदेश करीत आहे, असा देखावा दिसतो.)

**सोमदत्त**—माझ्या प्रिय शिष्यांनो,

( बेहाग–धुमाळी. )

**वृद्ध जनांची तरुण पिढीनें कींव मानुनीयां ॥**
**स्वमतपथानें मार्ग क्रमावा नीतिशास्त्र राखाया ॥ ध्रु० ॥**
**वृद्धमार्ग जो परंपरेचा अंध त्यास गणुनीयां ॥**
**विद्वत्तेनें स्वोन्नति करुनी घ्यावी सुख भोगाया ॥**
**प्रगति जगाची होत चालली आहे म्हणुनीयां ॥**
**विचारगति ती भिन्न निपजणें साहजीक ही माया ॥**
**चाल ॥ अनुद्योगरत वृद्धवचन ऐका परी ॥**
**‘ असेल अमुचा हरी देईल तो तरी ॥’**
**अतथ्य ऐशा वचनीं विश्वासा धरी ॥**
**चाल ॥ जो तो त्याची कर्मदशा त्या नेई अवनतिठाया ॥**
**हाल तयाचे श्वानहि न शके भूवरि या मग खाया ॥ १ ॥**

**सर्व मुलें**— ( म्हातारा इतुका० )

**आपुल्या या वचनास ॥ देऊं माना आम्ही खास ॥**
**तुडवूं वृद्ध-वचास ॥ देऊं० ॥**
**हिरा बैसतो स्वर्ण-कोंदणीं ॥ तैसें तव वचनास ॥**

**ठेवुनि आम्ही हृदय-कोंदणीं ॥ दावूं त्या जगतास ॥ देऊं० ॥**

[ एक म्हातारा प्रवेश करून ]

**म्हातारा**:–महाराज, कर्जानं फार पीडलों आहे. देणेकऱ्यांच्या पेंचां-तून अचानक सुटून जाण्याची एखादी युक्ति सांगा ! सावकार सफाई मेले पाहिजेत !

**सोमदत्त**:–तुमच्या वृद्ध वयानं तुम्हांला आजपर्यंत अशा युक्त्या शिकवल्या नाहींत–त्यावरून, तुमच्या अनुभवानं तुम्हांला साफ फशिवलंच म्हणायचं ! तुम्ही आतां असं करा; इंद्रचंद्रादि तेहतीस कोटि देव अलीकडे पक्के लांचखाऊ झाले आहेत; त्यांतल्या त्यांत तर सत्यनारायणानं लांच खाण्याचा विडाच उचलला आहे. त्याला नवस करा; लांचखाऊ अधि-काऱ्यांप्रमाणें तो आतांशें–खोट्याचं खरं आणि खऱ्याचं खोटं तत्काळ बनवूं लागला आहे, हें तुम्हीं ऐकलेलंच आहे. तेव्हां आतां त्याची कास धरा म्हणजे तो तुमच्याकडून गोडगोडशा शिऱ्याच्या नैवेद्याचा लांच खाऊन, तुमच्या सावकारांना सफाई बुडवील. खरोखर, तुमच्यासारखे हटवादी थेरडे महामूर्खच खरे. कारण,

(अभंग.)

**दुष्कृत्या सुस्वरूप देण्या देवराया ॥ प्रार्थिती घ्यावया लांच कैसा ॥ १ ॥ छिनत्र प्राणी जे लांच खाती साचे ॥ ईश करी त्यांचें पारिपत्य ॥ २ ॥ नवसांच्या रूपें लांच खाय देव ॥ न्याया जगतीं ठाव नुरला मग ॥ ३ ॥**

**म्हातारा**:--मग देव नवसाला कसा पावतो ?

**सोमदत्त**:--लांच खातो म्हणून ! असल्या त्या लांचखाऊ देवांना आतां लवकरच गचांड्या मिळणार आहेत. गोड खायला फार सवकले !

**म्हातारा**:--अहो, पण देव तर कांहीं खात नाहीं म्हणतात !

**सोमदत्त**:--म्हणूनच त्याला नैवेद्य दाखवून आपल्या पोटाची खळगी भरतात.

**म्हातारा:**--हें जर खरं, तर देव लांच कसा खाईल ?

**सोमदत्त:**--माणसांच्या तोंडानं !

**म्हातारा:**--( स्वगत ) छेः ! याच्याकडून मनाजोगी युक्ति कळेल असं दिसत नाहीं. ह्याच्याच शाळेंत शिकून तयार झालेल्या आपल्या मुलाकडून एखादी खाशी युक्ति निघाली तर पहावी. [ जातो. ]

**सोमदत्त:**--नरकांतला किडा घ्या किंवा मानवी प्राणी घ्या ! परमेश्वराला दोन्ही सारखेच आवडतात; कारण, सर्वांचा उत्पादक तोच आहे. सर्व दृश्यादृश्य वस्तु त्यानंच उत्पन्न केल्या आहेत. याच न्यायानं खरं आणि खोटं हेंही त्यानंच उत्पन्न केलेलं असल्याकारणानं त्या दोहोंवरही त्याची समानच प्रीति असली पाहिजे, असा सिद्धांत ठरतो.

**एक मुलगा:**--हें जर खरं म्हणावं, तर खोट्याला दंड होऊन खऱ्याला मान मिळतो हें कसं ?

**सोमदत्त:**--गोष्ट खरी आहे. एकाच आईचे दोन मुलगे--एक चोर निघतो आणि तुरुंगांत जातो; दुसरा सालस निघून मान्यता पावतो; पण त्या दोघांवर त्यांच्या मातेचं प्रेम सारखंच असतं. देवाची तरी हीच गोष्ट.

**दुसरा मुलगा:**--आपण सध्यां जे देव मानतों, त्यांचा उत्पादक कोण आहे ?

**सोमदत्त:**--परमेश्वर !

**तिसरा मुलगा:**--त्याचं स्वरूप काय आहे ?

**सोमदत्त:**--ऐका !

( ओव्या. )

**निर्गुण ब्रह्म तो आत्मरूप ॥ वेदें वर्णिलें तयाचें स्वरूप ॥ तोचि जाणा स्वस्वरूप ॥ सकलांचा आद्य तो ॥ १ ॥ तया अगणित शिरें असुनी ॥ विलसे तो अनंत नेत्रांनीं ॥ अमित करपद तया मानीं ॥ निराकार परि तो ॥२॥ निराकार परी साक्षात्कार ॥**

**ठायीं ठायीं दिसे त्याचा फार ॥ सर्व व्यापूनि उरला तो विश्वंभर ॥ म्हणुनी अनंत तो ॥ ३ ॥**

**चवथा मुलगाः**—असा जर तो परमेश्वर आहे, तर हे इतके तेहतीस कोटि देव कुठून आले ?

**सोम०ः**—परमेश्वर हा सर्वसाक्षी--सर्वव्यापी असल्यामुळें, निरनिराळ्या भावनांनीं निरनिराळे देव अस्तिवांत आले आहेत. पण हें सगळं थोतांड आहे. मानवी प्राण्याची अत्युच्च प्रगति म्हणजेच—ब्रह्मा, विष्णु, महेश—हीं स्वरूपं होत. ब्रह्माविष्णुमहेशादिकांचा राजा जो इंद्र—त्याचं तें इंद्रपद—एक हजार यज्ञ केले असतां मनुष्याला मिळवतां येतं. यावरूनच हें देवांचं गौडबंगाल काय आहे तें पहा ! शिवाय आपलं सिंहासन कायम राखण्याकरतां--आजपर्यंत इंद्रानं काय काय लबाड्या केल्या आहेत त्यांचा पुरावा पुराणं स्पष्टच देत आहेत.

**सर्व मुलेंः**—बस्स ! आजपासून घरच्या वडील माणसांनीं स्थापन केलेल्या अनेक देवांच्या मूर्तींना न भजतां, फक्त—

( मालकंस-दादरा.)

**विकाराविना जो निराकार तो । जगा व्यापुनी शेष कीं राहतो ।**
**दिसेना कुणा हो स्वसंवेद्य तो । असा ईश आम्ही शिरीं स्थापितों ॥**

[ पडदा पडतो.]

अंकाचा पडदा पडल्यानंतर प्रेक्षक जनांपैकीं कांहीं नाटकगृहाच्या बाहेर, वहिवाटीला अनुसरून निघून गेले, व कांहीं नाटकगृहांतच आपल्या जागीं बसले असतां एक प्रेक्षक दुसऱ्याला म्हणतो—"आतां या प्रहसनांत ज्या सोमदत्ताचं सोंग आलं होतं, असा तो खरा सोमदत्त तर बुवा आपल्याला बघण्याची फारच इच्छा झाली आहे." हें भाषण सोमदत्तानें आपल्या मागें बसलेल्या प्रेक्षकांतून ऐकलें. तेव्हां तो चटकन् उभा राहून म्हणाला—"ऐका, सभ्यजन हो, ऐका ! आतांच एथें—'खरा सोम-

दत्त कोणचा आहे तो बघण्याची फारच इच्छा झाली आहे'–असे उद्‌गार मीं एका प्रेक्षकाच्या तोंडचे ऐकले. तेव्हां मलाही त्या प्रेक्षकाची फारच कींव आली. म्हणून मी त्या प्रेक्षकाला त्याचें कौतुक पुरवावें याकरतां असें सांगतों कीं, "बाबा रे, हा पहा--खरा सोमदत्त--इथे उभा आहे. या नाटकगृहांत आतांपर्यंत झालेल्या संगीत 'मेघमाला' प्रहसनाच्या पूर्वरंगावरून, तुमची खात्रीच झाली असेल कीं, याच्या उत्तररंगांत–आज तुम्हांला इथें माझ्याकडून–हास्यरसाची–मेजवानी मिळणार आहे. इच्छा असेल तर प्रेक्षकांच्या संतोषाकारितां प्रहसन संपेपर्यंत मी असाच इथे उभा राहतों; म्हणजे खरा सोमदत्त कोणचा, हा प्रश्न करण्याची जरूरच पडणार नाहीं. सर्वांना जर संतोष वाटतो तर ही थट्टा सोसणं मला अवश्य आहे; कारण, सर्वांचा संतोष तोच माझा संतोष असं मी समजतों." इतक्यांत प्रहसनाच्या दुसऱ्या अंकाच्या सुरवातीचा पडदा वर गेल्यामुळें सर्वत्र शांतता होऊन, सर्वांचे डोळे व कान रंगभूमीवरील प्रयोगाकडे लागून मनें विचारमग्न झालीं.

---

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

( **रस्ताः**–एक म्हातारा व त्याचा मुलगा विनायक असे भांडत प्रवेश करतात. )

**म्हातारा**ः–विन्या, लेका विचार बघ! त्या मूर्ति अन् ते सोन्याचांदीचे देवांचे टाक–मुकाट्यानं देव्हाऱ्यांत नेऊन ठेव. नाहीं तर टाळकं सडकीन! पक्कं लक्षांत ठेव!

**विनायक**ः–बाबा, आतां ते दिवस विसरा! हे तुमच्या जानाईन् जोखाईचे टाक आतां गाळून टाकणार! समजलं का? हा गरुड म्हणजे पांखरूं,

अन् हा मारुति म्हणजे माकड ! यांच्या मूर्तींच्या हो कसल्या पूजान् धुपार्त्या करतां ? नवसाला पावावा म्हणून बोडक्यावर शेण थापलेल्या म्हसोबांच्या ह्या जानाई अन् जोखाई बायका–सोन्यारुप्याच्या हो कशाला ? तुमचं कर्ज फेडायचं आहे ना ? देतों हें देवांचं लचांड कर्जाच्या फेडींत अन् करतों तुम्हांला मुक्त !

**म्हातारा**ः–अरे नको रे असं बोलूंस ! चांडाळा, तसं केलंस तर तुझ्या सर्वांगावर नायटेन् खरूज उठतील, त्याची तरी भीति बाळग ! अशानं तुला वाखा होईल वाखा ! समजलास का ?

**विनायक**ः–असं जर तुम्ही म्हणतां, तर नुकत्याच कांहीं वर्षांपूर्वी त्या वटोदरच्या राजानं आपल्या आईच्या मृत्यूनंतर, सोन्यारुप्याच्या मूर्ति गाळून टाकल्या, त्याला नाहीं हो कुठें अजून कांहीं झालं ?

**म्हातारा**ः–अरे गाढवा, त्याचा थोरला मुलगा नाहीं का मेला ? देतोस का नाहीं त्या मूर्ति इकडे ? (दोघांची झोंबी होऊन म्हातारा पाय मोडून पडतो व) अययययय मेलों–मेलों ! कारट्या, चांगला दिवटा निघालास ! कुळाचं नांव चांगलं राखलंस.

**विनायक**ः–मग, यापेक्षां अधिक तें काय हवं ?

**म्हातारा**ः–घरचे देव विकायला निघालास, त्यापेक्षां झाला नसतास तर बरं झालं असतं.

**विनायक**ः–हा प्रश्न लग्नाच्या वेळचा होता. भोगा आतां अदूरदर्शीपणाचं प्रायश्चित्त.

**म्हातारा**ः–खरं आहे बाबा ! धिंगामस्तींत माझा पाय दुखवलास. त्याला कळा लागल्या आहेत. हेंच त्याचं प्रायश्चित्त. बरं, असूं दे तें. पाय जरा दाबून धर पाहूं ?

**विनायक**ः–मी नेत्रवैद्य आहें, शस्त्रवैद्य नाहीं. डोळा फुटला असता तर बघितला असता. पडा आतां जरासे असेच इथें राम राम म्हणत !

[जातो, व एक अंधळा म्हातारा येतो. तो लंगड्याला अडखळून पडतो.]

**अंधळाः**—अरे चोरा! पाय घालून पाडतोस होय? घे बक्षीस! (लंगड्याला मारतो.)

**लंगडाः**—अयायायायाय्-मेलों-मेलों.

**अंधळाः**—मर असाच! मेलास तरी बेहत्तर आहे.

**लंगडाः**—अहो, पण माझ्या जिवावर इतके उदार होणारे तुम्ही आहांत तरी कोण?

**अंधळाः**—तुझा बाप आहे हें दिसत नाहीं का?

**लंगडाः**—काय, माझा बाप! अहो, मी तुमचा मुलगा नव्हे. माझा बाप कधींच मेला. तुम्ही मला कोण समजतां? माझ्या कारट्यानं मघांशीं मला भर रस्त्यांत मारून लंगडा करून इथें टाकला आहे.

**अंधळाः**—नशीब! एकंदरींत आपण समदुःखीच आहोंत म्हणायचे!

**लंगडाः**—म्हणजे? तुमच्या मुलानं तुम्हांला माझ्यासारखाच चोप दिला वाटतं!

**अंधळाः**—अहो, कारटं लागलं गायत्रीमंत्राचा अर्थ करायला. म्हणे त्यांत आहे काय? सगळी सूर्याची स्तुति. अहो, वेदांचा अर्थ करायला रावणासारख्याची दहा तोंडं पुरलीं नाहींत, तिथें या एकतोंड्याची ती काय कथा!

**लंगडाः**—हे सगळे प्रताप त्या हलकट सोमदत्ताचे आहेत. माझा कारटा देव्हाऱ्यांतले सोन्याचांदीचे देव गाळून टाकायला गेला आहे.

**अंधळाः**—अहो, माझा पोरटा तर म्हणतो कीं, वेदांमध्यें मूर्तिपूजाच नाहीं. यावरून आजपर्यंत--आमचे वाडवडील, आम्ही- मूर्तिपूजा करीत आलों ते लंबकर्णच म्हणायचे!

**लंगडाः**—ठरलंच तें आतां यावरून! वेदांची भाषा म्हणजे प्रत्यक्ष देवांची. सोमदत्त हा संस्कृतांत किती जरी हुषार असला, तरी ती भाषा

त्याच्या बापाला तरी समजणार आहे का?

अंधळाः–असल्या या नास्तिक उपदेशानं ह्या शहरचीं पोरं बिघडवून टाकणारा असा तो सोमदत्त कोण आहे? त्याला एकदां प्रत्यक्ष भेटून त्याची बत्तिशीच उतरून ठेवली पाहिजे. चला, दाखवा तो मला.

लंगडाः--तुमची ताकत धृतराष्ट्रासारखी आहे, हें मघांशींच माझ्या पाठीनं ओळखलं आहे. पण तुम्ही तर आंधळे आहांत. तुम्हांला तो दिसणार कसा? अन् तुम्ही त्याची बत्तीशी उतरणार कसे?

अंधळाः–हो, तेंही खरंच!

लंगडाः–मग, कसं काय? मी लंगडान् तुम्ही अंधळे! माझे डोळे घ्या तुम्ही न् तुमचे पाय द्या मला, म्हणजे सोमदत्त तुमच्या दृष्टीस पडेल!

अंधळाः–हो! ही युक्ति ठीक आहे. बसा न् काय तर मग आतां आमच्या मानेवर. ( अंधळ्याच्या खांद्यावर लंगडा बसतो व ते पुढील पद्य म्हणत पडद्यांत जातात.)

( विठूचा गजर० )

**अंधळाः–वाहवा रे, जोड मिळाली खाशी, या अंधळयाला ॥**
**लंगडाः–पाहूं या, जाउनि आपण आतां, त्या सोम्याला ॥**
**अंधळाः–शिकवी जो, दुष्ट कल्पना पोरां, त्या सोद्याला ॥**
**लंगडाः–उचलूनी, अपटूं दगडावरती, त्या चोराला ॥**
**अंधळाः–नेत्रांतें, फोडुनि त्याच्या, करुं या, अंधळा त्याला ॥**
**लंगडाः–लंगडा त्या, करुनी आपल्या, उगवूं सूडाला ॥१॥**

( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

( ढगावरील आपल्या टोपल्यांत सोमदत्त बसला असून--रानांत--मुलें त्याची आरती करीत उभीं आहेत. )

**मुलें:—** आरती.

जय देव जय देव गुरु सोमदत्ता ॥
अतितर उच्च असे तव करणीची सत्ता ॥ जय० ॥
वर्णावें यश तुमचें किति तरि धीमंता ॥
अंध रूढींना हरघडि बसती तव लत्ता ॥ जय० ॥
अनुशासन तुमचें अमृत जणुं गुणवंता ॥
कुटिलें मूर्ख जनाला होउनियां बत्ता ॥ जय० ॥
जगतीं दिससी स्पष्टचि केवळ नयकर्ता ॥
नमितों तुज साष्टांगें एकचि तूं त्राता ॥ जय० ॥

[सर्व मुलें नमस्कार घालून उभीं रहातात.]

**सोमदत्तः**—या जगांत परमेश्वरानं मला ज्या कार्याकरितां उत्पन्न केलं आहे तें काम मी मनोभावानं करीत आहें. तुम्हांला उपदेशामृत पाजून तुमचीं मनं सुसंस्कृत करावीं, हेंच माझं मुख्य काम आहे; आणि तें मी आनंदानं करीत आहें. त्याबद्दल तुम्हीं सर्वांनीं माझी स्तुति न करतां, परमेश्वराचीच केली पाहिजे. तुमच्या कर्तव्याचा योग्य मोबदला तोच तुम्हांला खास देईल. पण—तें तिकडें पहा ! एका दांडगट आंधळ्याच्या खांद्यावर एक लंगडा बसून ते दोघे इकडेच येताहेत. त्यांचा रोख आपल्याशीं बदमाषी करण्याचा दिसतो आहे. म्हणून त्या लंगड्याच्या डोळ्यांत धूळ फेंकून दोन अंधळे तयार करा. खेळूं द्या मग त्यांना अंधळी कोशिंबीर.

[लंगड्यासह अंधळा येतो.]

**अंधळाः**—कुठें आहे तो सोमदत्त ! दाखवा पाहूं ? दांत पाडतों त्याचे !

**लंगडाः**—अहो, तो तर ढगांवर बसला आहे !

**अंधळाः**—माझी चेष्टा करतां होय ! माणसं कधीं ढगावर बसलेलीं कुणीं पाहिल्याचं ऐकलं आहे का ? तुम्हीं माझे पाय घेऊन मला आपले डोळे दिलेत. असं असतां, अजून तो कसा मला दिसत नाहीं ?

**लंगडाः**—आत्तां इतक्यांत दिसेल. (मुलें लंगड्याच्या डोळ्यांत धूळ

टाकून पळून जातात; व सोमदत्त ही अदृश्य होतो. ) अययययय! कार-ट्यांनीं माझ्या डोळ्यांत धूळ कीं हो टाकली ! मी तुमच्याचसारखा अंधळा झालों ! आतां काय करूं ?

**अंधळा:**–( लंगड्याला जमिनीवर आदळून ) भोग आतां आपल्या खोट्या बोलण्याचीं फळं ! वाजीव आतां पांचजन्य !

**लंगडा:**–( रडत ) तो तर विष्णूपाशीं आहे हो !

**अंधळा:**–शिमग्याचा तर जवळ आहे ना ?

**लंगडा:**–( डोळे चोळीत ) जवळ कसला ! अजून चार महिने लांब आहे ? ( विनायक येऊन अंधळ्याजवळ जातो. )

**विनायक:**–अंधळेबाबा, तुम्ही असे इथे कां उभे ?

**अंधळा:**–बाबा रे, गांवांत माझं घर दाणेआळींत आहे. तिथे मला नेऊन पोंचवशील तर बघ !

**विनायक:**–तें चमत्कारिक घाणेरडं ठिकाण इथून फारच लांब आहे हो !

**लंगडा:**–अरे, हा तर माझ्या विन्याचा आवाज !

**अंधळा:**–तें कसंही असो. पण मला पोंचवशील तर फार उप-कार होतील !

**विनायक:**–मला कनी फार निकडीचं काम आहे. मी तुम्हांला रस्ता सांगतों त्याप्रमाणें नेमके गेलांत कीं अगदीं थेट दाणेआळींत उत-राल. हें पहा–असे इकडे तोंड करून उभे रहा ! समोर चालूं लागा. मग डाव्या हाताला वळून उजवीकडे फिरा ! मग पुन्हां डावी उजवी, डावी उजवी असं एकंदर बोट घालून बावीस वेळां करा, कीं नेमकी दाणेआळी आलीच समजा !

**लंगडा:**—विन्या, अरे चोरा ! ओळखला मीं तुझा आवाज ! तूंच माझ्या डोळ्यांत धूळ टाकलीस. त्या अंधळ्या म्हाताऱ्याची अशी थट्टा

करतोस काय? कुठें फेडशील हें?

**विनायक**:—अतिशय म्हातारं होऊन परावलंबी होणं आणि त्यांत-ल्या त्यांत हट्टी, हेकेखोर, अशक्त, लंगडं व अंधळं होणं ही जिवंतपणाची थट्टाच आहे. (गणू येतो व लंगड्याच्याजवळ जातो.)

**गणू**:–कां हो लंगडोबा, असे डोळे चोळीत कां इथे पडलां आहांत?

**अंधळा**:–अरे, हा तर माझ्या गण्याचा शब्द!

**लंगडा**:–बाबा रे, मला चोळखणआळींत जायचं आहे, पण माझा पाय दुखवला आहे. मला चालवत नाहीं. इतक्यांत, इथे कांहीं वात्रट पोरं जमलीं होतीं, त्यांनीं माझ्या डोळयांत धूळ टाकून मला अंधळा केला आहे.

**गणू**:–ह्यावरून एकंदरींत लहान मुलं थोरांच्या डोळयांत धूळ फेकूं लागलीं म्हणायचीं?

**लंगडा**:—म्हणायचीं कसलीं! सृष्टिच बदलली! भोळया भावाचा खून झाला. सरळपणा रसातळाला गेला. ह्यावरून आडदांडपणाचं राज्य सुरू झालं असंच समजलं पाहिजे!

**विनायक**:—मग, कसं काय अंधळेबुवा, चलायचं ना घरीं? मी पोंचवतों तुम्हांला. मग कामाला जाईन.

**अंधळा**:—शाबास! शाबास! देव तुला सुखी ठेवो!

**विनायक**:—तुमचे शब्द फुकट नाहीं जायचे! (गणूला एका बाजूस) तूं पोंचीव ह्या तुझ्या अंधळ्या बापाला आणि मी पोंचवतों माझ्या लंगड्या बापाला. (उघड) चला अंधळेबाबा! [गणूसह अंधळा जातो.]

**अंधळा**:—अरे, मला पोंचवा रे कुणी तरी!

**विनायक**:–बाबा, उघडले कां आतां पुरे डोळे?

**लंगडा**:–होय बरं बेटया! पुरते उघडले!

**विनायक**:–नाहीं, म्हटलं जराशी चुरचूर राहिली असेल.

**लंगडा**:–विन्या, अरे अजून हा तुझा विनोद पुरा नाहीं का झाला ? मी तुझा बाप ना ? माझ्या चेष्टा कराव्यास का ? काय म्हणावं तुला ! बरं, जाऊं दे ! झालं तें झालं ! पुन्हां असं करूं नकोस ! चल मला घरीं घेऊन !

**विनायकः**–काम साधण्याकरितां हताश माणसं असंच गोड बोलत असतात; पण त्यांची रागाची मुद्रा झाकत नाहीं. तुमची ती रागीट मुद्रा मला असं म्हणते आहे कीं, 'विन्या, संभाळ ! घरीं गेल्यावर तुझी शेंडी सुपारी करून, चापटपोळ्या न् मुष्टिमोदक तुझा बाप तुला देणार आहे; म्हणून त्याला तू घरीं नेऊंच नकोस.'

**लंगडा**:–वेडा आहेस तूं ! तुझ्यावरचा माझा सगळा राग गेला. शपथ, तुला मी मारणार नाहीं. आतां तर झालं ना ? चल तर आतां मला घरीं घेऊन !

**विनायक**–घरीं जायचं तर ठरलंच आहे म्हणा, पण आधीं आतां मी हुषार किती झालों आहें तें तुम्हांला दाखवूं का ?

**लंगडा**:–दाखवूं नकोस. तोंडानं सांग म्हणजे झालं !

**विनायकः**–तुमच्यासारख्या निर्बुद्ध अशा ह्या थेरड्यांना वाटेला लावीन इतका मी आतां तयार झालों आहें.

**लंगडा**:–शाबास, शाबास आहे तुझ्या गुरुची न् तुझी. सध्यां मला तर एकट्याला वाटेला लाव !

[ दोघे जातात. ]

---

## प्रवेश तिसरा.

( सोमदत्त मध्यें उभा असून दोहों बाजूंना मुलें उभीं आहेत असा देखावा दिसतो.)

**सोमदत्तः**–प्रिय शिष्यांनो, माझ्या उपदेशाप्रमाणें तुम्ही वागताहांत, आपल्या जुन्या चालींना सुधारण्याची खटपट करीत आहांत, वृद्ध पिढीची

कानउघाडणी करीत आहांत आणि ज्या योगानं आपल्या संस्थानाला आणि देशबांधवांना सुख होईल, अशा तऱ्हेची राज्यघटना बनविण्याच्या कामीं तुम्ही आपलीं मतं संस्थापित करीत आहांत, हें पाहून आणि ऐकून मला आनंद होत आहे. याचप्रमाणें तुमचे सतत दीर्घ प्रयत्न सुरू ठेवा. त्यांतच तुमचं कल्याण आहे. मी माझ्या देशाकरितां जसा माझ्या प्रकाशतुल्य स्वच्छ व न्यायी मतांप्रमाणं वागलों आहें, त्याचप्रमाणें कोणाचीही भीडमुरवत न धरतां--येतील त्या अडचणी सोसून--तुम्ही वागा. असं करण्यांत तुमच्यावर हवा तो आरोप आला तरी मुकाट्यानं सहन करा. स्वच्छ गोष्टी खऱ्या स्वरूपांत जगापुढें मांडण्याची ज्या भगवंतानं आपल्याला शक्ति दिली आहे ती काय करणार नाहीं ! आतां त्या शक्तीचे आपण आभार मानून घरीं जाऊं या !

[ प्राप्त होय जें निधान. ]

**वेद वर्णिती महिमा ज्याचा ईशा तोचि देवो ॥**
**सद्बुद्धी ताशि सतत अम्हांला न्यायपथीं ठेवो ॥ धु० ॥**
**पढतमूर्ख त्यां ज्ञान देउनी ज्ञानि करायाचो ॥**
**आज्ञा तुमची मानुनि ईशा आम्ही ती साची ॥**
**नम्र दास हे अनुसरती तव इच्छा उपकृतिची ॥**
**ऐक्यमतीं रत जनमति निपजो यशयुत ती होवो ॥ धु० ॥**

पडदा पडतो ] [ सर्व पात्रें जातात.

---

## प्रकरण दहावें

# वस्तुस्थितीचा विपर्यास.

नाटकगृहांतला प्रयोग संपला. प्रेक्षकवर्ग आपल्या घरीं जाण्याकरितां टोळ्याटोळ्यांनीं प्रयोगासंबंधानें आपापसांत विचिकित्सा करीत रस्त्यानें

चालला होता. त्या टोळ्यांपैकीं जी एक टोळी अथवा जें एक त्रिकूट परस्परांशीं बोलत चाललें होतें, त्या त्यांच्या भाषणाचा रोंख प्रकृत विषयाला बराचसा धरून होता. इतकेंच नव्हे, तर तें संभाषण या पुस्तकाच्या लेखकाला व त्याच्या वाचकांना बरेंचसें–पुढील मार्ग आक्रमण्यास–सोईस्कर आहे म्हणून तें येथें दिलें असतां, चालू विषयासंबंधांतील बराचसा स्पष्ट प्रकाश दृग्गोचर होणार आहे. तें आपसांत भाषण करीत रस्त्यानें चाललेलें त्रिकूट कोणचें होतें, त्यांतील पात्रांचीं नांवें काय होतीं, व त्यांचें भाषण कशा तऱ्हेचें चाललें होतें हें सर्व पुढील भाषणरूप गोष्टीवरून वाचकांना सहज ताडतां येण्यासारखें असल्यामुळें त्यासंबंधाच्या वर्णनानें वाचकांचा अधिक वेळ घेण्याची जरूरी नाहीं.

"केवढा हा पाषाणहृदयीपणा! वस्तुस्थितीचा विपर्यास करून दाखवणं म्हणजे, जाणून बुजून निरपराध्याचा खूनच करणं होय!"

"हें आजचं प्रहसन--म्हणजे--एका भावी हृदयद्रावक, शोकरसपरिपूरित आणि दुःखपर्यवसायी अशा नाटकाची अमंगल सूचक अशी नांदीच होतें."

"मग, आपण तर शोकपर्यवसायी नाटकें लिहिण्यांत पटाईत असे नाटकाचार्य आहांतच. रचा एखादं! भूमिका मिळालीच आहे. मग आतां उशीर कां?"

"आपण जरी आपल्याला ज्ञाते म्हणवीत असाल, तरी तो आपला ज्ञातेपणा व्यर्थ आहे. ज्याला दूरदर्शीपणाचा डाव ओळखतां येत नाहीं तो ज्ञाता कसला!"

"म्हणे वस्तुविपर्यास झाला! वस्तुविपर्यासाशिवाय--थट्टा आणि विनोद हीं होणार कशीं? मला तर ह्या प्रहसनांत चेष्टेशिवाय दुसरं कांहींच दिसलं नाहीं."

"अहो, ज्ञाते म्हणवून घेण्याची लालसा बाळगणारे अर्थपति! जरा

शुद्धीवर या आणि चेष्टा कोणीं कोणाची करायची याचा विचार करा! दिसतं तसं नसतं हें आहे का तुम्हांला ठाऊक?"

"हो हो! आहे ठाऊक. मोठा आला आहे मला शिकवायला!"

बाबांनो, तुम्ही असे आपसांत विनाकारण भांडतां कां? माझं म्हणणं आधीं ऐका!"

### ओव्या.

**कोणी कोणाचें हिताहित ॥ न करी परी एक भगवंत ॥**
**स्वेच्छामात्रे स्वेच्छित ॥ तो करी निश्चित ॥ १ ॥**
**प्राण्यांना स्फूर्ति देतो ॥ हिताहित कर्मानुबंधें करितो ॥**
**कर्ता करविता ऐसें म्हणवतो ॥ आपणातें ॥ २ ॥**

"शत्रूनं काळजाला हात घातल्यावरसुद्धां गप्प बसावं काय?"

"वालखिल्य, यांत काय संशय! शांतिरूप धैर्याचा कमरपट्टा ढिला झाल्यावर मुंगीही हत्तीला मारूं शकेल. आजच्या प्रहसनांत--नवरसांपैकीं--कवीनं--दोहोंची वाण कां ठेवली तें कळत नाहीं. प्रहसनांतला सोमदत्त--एखाद्या वेश्येशीं श्रृंगार करीत असलेला--कवीनं दाखवला असता तर, त्याच्या चातुर्याची तारीफच झाली असती! श्रृंगार आणि बीभत्स रसांची पूर्तता झाली असती! त्यामुळें माझ्या शांतीला अढळ पद मिळालं असतं.

"शाबास! सोमदत्ता, शाबास! किती तरी उदात्त कल्पना ही तुझ्या तोंडून निघाली! फारच गोड!"

"कन्याविक्रयाच्या धनापेक्षां फारच गोड खरी!"

"त्या प्रहसनांत माझ्या म्हणण्याप्रमाणें कवीनं दुरुस्ती केली तर–"

"तर, काय! हास्यरसाच्या ओढ्याला एकदम लोंढा येऊन, निंदक प्रेक्षकांचीं पोटंच फुटतील म्हणायचीं!"

"आजच्या या प्रहसनकारानं--अत्यंत थोर अशा साधूचा जो उपहास आणि जी अप्रतिष्ठा केली–त्यामुळें त्या कवीनं–आपल्या बोडक्यावर–

अत्यंत खरतर अशा पातकांच्या पर्वताचीच उभारणी केली आहे यांत संशय नाहीं. आपली बुद्धि आणि प्रतिभा यांची योजना त्यानं या प्रहसनांत दुर्जनांच्या साह्यार्थ योजून–आपल्या वाणीला, सज्जनछल करण्याचं लांछन आणलं आहे यांत तिळप्राय संदेह नाहीं."

"किराता, आपल्या समोरच जे दोघे दुष्टात्मे खेळ बघायला बसले होते, त्यांची स्थिति, प्रहसन संपेपर्यंत, मी बारकाईनं निरीक्षण करीत होतों. त्यावरून त्यांचीं अंतरंगं किती दुष्टवासनाप्रेरित होतीं, हें मीं त्यांच्या मुद्रांवर--हरघडी बदलणाऱ्या रंगांवरून, स्पष्ट ताडलं. सोमदत्ताचा सर्वस्वीं नाश करण्याकरितांच--कवि, सूत्रधार आणि नायक--अशीं त्यांनीं या गुप्त व्यूहरचनेंत सोंगं घेतलीं होतीं. ही जी गुप्त बीजपेरणी झाली आहे, हिला पुढें अत्यंत क्रूरतर अशा हालाहल विषवल्लीचा अंकुर आल्याशिवाय कधीं रहायचा नाहीं."

"मित्रांनो, माझं एक बोलणं सर्वांनीं नेहमीं लक्षांत ठेवावं अशी माझी इच्छा आहे. हें पहा, नेहमीं आपला कार्यक्रम पार पाडून जगाच्या सर्व कृतींचा अर्थ सदोदित सरळच घेत असावा! आणि आपली दृष्टि चंद्राप्रमाणें अक्षय अशी सर्वांबद्दल अनुकंपायुक्त व दयार्द्र अशी ठेवावी."

"सोमदत्ता, हें बघ माझं घर आलं! मी आतां जातों. उद्यां आपण या विषयासंबंधानं अधिक बोलूं." असें म्हणून अर्थपति, आपल्या घरांत आपली रोजच्या रात्रींची--द्रव्यसुहृदाची भेट घेण्याकरितां गेल्यावर सोमदत्तही तेथून जवळच असलेल्या आपल्या घरीं गेला. त्या वेळीं मध्यान्हरात्र उलटून गेलेली असून थंडी जरा कडाक्याचीच पडलेली होती; परंतु त्या तशाच वेळीं वालखिल्यालाही कांहीं एका मोठ्या जबाबदारीच्या कामाकरतां जावयाचें असल्यामुळें तो किरातला त्याच्या घरापर्यंत पोंचवून--आपल्या कामगिरीवर गेला. जातांना तो किरातला बोलला–

"किराता, मी कोणच्या कामाकरतां या अशा वेळीं जातों आहें,

हें तुला माहित आहेच. त्या कामांत मी फत्ते करून येईन यांत जशी माझी खात्री आहे तशीच सोमदत्ताच्या दोन्ही स्त्रियांचीही--मीं अगाऊच ठरवून ठेवल्याप्रमाणें--योग्य वेळीं मदत होणार असल्याबद्दलचा मला पूर्ण विश्वास आहे. तूं अगदीं निष्काळजी रहा. तुला सांगितलेल्या ठिकाणीं तूं मला आणखी सुमारें दोन तीन घटकांनीं भेटायला मात्र विसरूं नकोस म्हणजे झालं."

---

## प्रकरण अकरावें

# अर्थपती! कडी काढ.

स्स--हाहाहा--कोण तो थंडीचा कडाका! मध्यरात्र नुकतीच उलटून जाऊन 'मेघमाला' प्रहसनाला गेलेले लोक अपापल्या घरोघर जाऊन आंथरुणापांघरुणांचा आश्रय मोठ्या घाईनें करण्यांत गुंग झाले होते. अशा या हेमंत ऋतूंतील थंडीच्या कडाक्याच्या वेळीं उबेला तुच्छ मानणारे संसारी जन जगाकडून तुच्छता पावतात. ह्या वेळीं पृथ्वीचा अर्ध गोल गाढ अंधःकारांत अगदीं विलीन होऊन दुसरा स्वच्छ प्रकाशांत भौतिक व्यवहारांत निमग्न झालेला होता. पिशाच्चें, क्रूर श्वापदें आणि वाटमारे लोक ह्याच वेळीं अंधःकारांतून अगदीं निर्भयपणें संचार करीत होते. आपलें द्रव्य सुरक्षित आहे कीं नाहीं तें चिक्कू लोक याच वेळीं उकरून बघतात. डाकिणी, चेटक्या, जखिणी यांची श्मशानांतील पूजाअर्चा आटपून परतण्याची हीच वेळ. अशा वेळीं पुष्पपुरांतील एका घराच्या परसांत दोन पुरुष काय करीत आहेत तें पहा! त्यांनींही अंधेरांतच वेताळाप्रमाणें संचार आरंभला आहे. ते दोघे 'मित्र' ही परिभाषा कायम ठेवण्याच्या उद्यो-

मांत आहेत असें स्पष्ट दिसतें आहे. सुहृदाचें नातें किती नाजुक असतें तें त्यांच्या कृतींवरून सहज समजण्यासारखें आहे. ‘ सधन असो अगर निर्धन असो--जो कोणच्याही स्थितींत आपल्या मित्राशीं सारखाच वागतो तोच सुहृद या पदवीला पात्र होतो ’ हें कविवाक्य खरें करून दाखविण्याचीच त्या दोघांची लालसा एकसारखी दिसते आहे. ते दोघे परस्परांना जरी त्या परसांत सध्यां अंधेरामुळें दिसत नाहींत, तरी स्वतंत्रपणें काय व्यवसाय करीत आहेत तो पहा! त्या दोघांपैकीं एकजण त्याच परसांतल्या झाडावर चढून बसण्याच्या उद्योगांत असून, दुसरा हातांत खोरें-पावडें घेऊन जमीन उकरण्याच्या बेतांत आहे.

या वेळीं चहूंकडे जरी अगदीं सामसूम आहे तरी रातकिडे मात्र त्या सामसुमीच्या शांततेचा भंग करीत आहेत व तेथें काय प्रकार चालला आहे तो आकाशमंडपांतील तारागण डोकावून पहात आहे. थंडी इतकी जरी कडाक्याची होती, तरी जवळ वीस हजार मोहोरांच्या स्नेहाची ऊब असल्यामुळें त्या खड्डा खोदणाऱ्याला, लोकरीच्या कपड्यांची अगर सजीव प्राण्याच्या उबेची मुळींच जरूर नव्हती. सोन्याच्या सुकुमार देहाला आणि मधुर लावण्याला वश होऊन मित्र मानणारे प्राणी जसे शेंकडा शंभर--तसे वृषभपत्नीच्या पुरीषाला शेंकडा एकही लुब्ध होणें अशक्यच. तो पाहा त्यानें खाडा खणला. त्यांतील मोहरा हातांत घेऊन तो आपल्याशींच मोठ्या कौतुकानें काय बडबडतो आहे तें ऐका.

“ राजा, तुझी काय योग्यता सांगावी ! ”

**कटाव.**

**खड्ड्यासम तव सिंहासन तें ॥ जगांत कोठें दृष्टिस पडतें ॥**
**शेण जाहलें मुगुटाकारी ॥ धन्य तयाची कोणा न सरी ॥**
**तूंच खरा रे राजा जगतीं ॥ काय वदावी तव ती महती ॥**
**अन्न नको तें जलहि नको तें ॥ वस्त्र नको तें सौख्य नको तें ॥**

**मित्र नको मज स्त्रीहि नको मज। सूर्य नको मज चंद्र नको मज॥**
**कांहि नको मज तूंचि हवा रे। सोडिन नच तुज प्राण जाउ रे॥**
**माझ्याविण जे हस्त तुला रे। स्पर्शा इच्छिति तुटोत बा रे॥**
**मान तुझा तो राखायातें॥ चालत उलटा जाइं असा रे॥"**

हर हर! कोण हा त्या बिचाऱ्यावर प्रसंग! द्रव्याला पाठ दाखवली तर त्याचा अपमान होईल, म्हणून बिचारा उलटा चालत गेला, तों एकाएकीं ठेंचळून पडला. बरोबरच आहे. आपल्याला भूमीच्या उदरांत लपवून ठेवून आपणांपासून एक क्षणभरही त्यानें दूर होऊं नये, नाहीं तर आपण स्थलांतर करूं अशी इच्छा दर्शवणाऱ्या त्या मोहोरांनीं त्याच्यावर रागावून त्याला ठेंचाळून कां बरें पाडूं नये!

अरे, पण त्याच घराच्या रस्त्याच्या दरवाजावर "अर्थपती, कडी काढ." म्हणून ओरडून बोलणारें हें कोण इतक्यांत तिसरें त्याच वेळेला त्या घराशीं आलें असावें बरें? ओळखला--अर्थपतीनें तो आवाज ओळखला, अशी त्याची मुद्रा स्पष्टच सांगते आहे. पुन्हां आतां वरच्याप्रमाणेंच आवाज झालेला ऐकून मात्र अर्थपतीची अगदींच घाबरगुंडी उडून गेलेली दिसूं लागली. तो स्वतांशींच म्हणाला--"अरे, हा तर विजयेचा आवाज! ही हडळ अशा या वेळीं कशाला इथे आली?"

"अर्थपती! कडी काढ."

"अरे बाप रे! हा तर त्या हडळीच्या सवतीचा आवाज! बरोबर आहे! हडळी, जखिणी, समंद, मुंजे व खविस ही मंडळी भटकत असायची हीच वेळ!"

"कडी काढतोस कां फोडूं दार?"

"नाहीं--नाहीं--नको--आ--लों! आतां मात्र धडगत नाहीं! या माझ्या राजाला त्याच्या सिंहासनावर आतां झटकन् लपवून ठेवला पाहिजे."

**जा जा जा जा स्वस्थ नीज जा॥ सिंहासनिं रे घोरत पड जा॥**

**जखीण हडळी एथ पातल्या ॥ घाण हवा त्या सुटूं लागल्या ॥**

"कडी काढली नाहींस, तर आतां मात्र खचित दार फोडूं!"

**"निजला राजा जमीनींत तो ॥ आलों तुम्हां कडी काढतों ॥"**

अर्थपतीनें द्रव्य पुरून ठेवल्यावर मोठ्या लगबगीनें व भयभीत मुद्रेनें दाराजवळ जाऊन कडी काढल्यावर, विजया व मदिरा आंत येऊन त्याला म्हणाल्या—

"आमच्या दोन हजार मोहोरा आत्तांच्या आत्तां आम्हांला पाहिजेत."

"बऱ्या बोलानं आत्तांच्या आत्तां दे. नाहीं तर शेंडी उपटून घेईन."

"वा: अति उत्तम. मोहोरांबद्दल मीच ती तुम्हांला कापून देतों."

"अस्सं का? अरे हलकटा! काय रे, पण तूं इतक्या रात्रीं एकटाच परसांत काय रे करीत होतास?"

"कांहीं नाहीं. रात्रीं प्रहसन पाहून आलों. उकाडा फार होऊं लागला, म्हणून खाट टाकून उघड्यावर पडलों होतों."

"अस्सं काय? अन् हे तुझे हातपाय कशानं भरले आहेत?"

"हे-का-हे-हे-हे कनी-मी-आतां इतक्यांतच माझा जरासा डोळा लागत होता, तों तुमची हाक ऐकली न् दचकलों. कडी काढायला यायची वाट चुकून अळवाच्या खाचेंत पडलों."

"मसणांत कां पडेनास! आधीं मोहोरा काढ!"

"आतां कुठल्या देऊं? उद्यां घर गहाण ठेवून हव्या तर देईन!"

"मोहोरा फिटेपर्यंत--मालतीला ओलीस म्हणून दे आमच्या ताब्यांत."

"ती निजली आहे. दुसऱ्याची झोंपमोड केली तर पाप लागतं."

"अन् थाप मारून दुसऱ्याचा पैका गिळंकृत केला तर नाहीं का पाप लागत?"

"मेल्या, पारसनाथा! तुझा उपदेश ऐकायला नाहीं आम्ही इथें आलों?"

" चांभाराच्या देवाला खेटरांचीच पूजा पाहिजे ! मदिरे, बघतेस काय ? उडव तडाखे–म्हणजे आतां येईल लंडी गतीवर. "

त्या दोघी त्याला बेदम मारूं लागल्यामुळें तो ओरडूं लागला. त्यांमुळें मालती जागी होऊन त्या ठिकाणीं येऊन म्हणाली, " अहो काकू, माझ्या बाबांना अशा मारतां कां ? त्यांनीं तुमचा काय अपराध केला आहे ? त्यांच्या वयाकडे तरी पहा हो ! बाबा, आहे तरी काय हें ? तुम्ही असे रडतां कां ? "

" बये, काय सांगूं ? "

" काय असेल तें सगळं सांगा ! माझ्याकडून होईल तितकं मी करीन. "

" बाळे, मीं यांच्या दोन हजार मोहोरा देणं आहे. "

" हात् तिच्या ! इतकंच ना ? विजयाकाकू, मदिराकाकू, उद्यां घर गहाण टाकून दिल्या तर नाहीं कां चालणार ? "

" मालती, तूं या फंदांत पडूं नकोस. तूं मला फार आवडतेस. तूं आमच्या घरीं येतेस का ? "

" आमच्या मोहोरा आम्हांला मिळेपर्यंत तूं रहातेस कां आमच्याकडे ओलीस ?

" हो, माझ्या बाबांच्या सौख्याकरितां मी कबूल आहें. "

" चल तर आमच्याबरोबर. आमचा शरच्चंद्र तुझ्याशीं खेळेल. "

" अन् वसंत सुद्धां खेळेल. "

" तें सगळं खरं; पण मला होणाऱ्या अपत्यविरहाशीं मी कसा खेळूं ? "

" घागरभर मोहोरा देऊन हिला एखादा कोणी घेऊन गेला म्हणजे मग नाहीं का विरह व्हायचा ? "

" हिच्याजागीं मी त्या मोहोराच समजेन. पण तुम्हीं आतां इला कोरडीच घेऊन गेल्यावर मग मी कोणाकडे बघत बसूं ? "

" बाबा, उद्यांपर्यंतचीच बोली आहे ना? तोंपर्यंत तुमच्या सुखाकरतां मी यांच्या बरोबर जातें. या मला कधीं छळायच्या नाहींत, कीं माझं कांहीं कमी पडूं द्यायच्या नाहींत. आवरा तें दुःख. उद्यां मोहोरा द्या म्हणजे झालं. "

" बाळे, तुझी थोरवी किती वर्णावी? बापाकरितां आपण होऊन गहाण रहाणारं अपत्य दुर्मिळच. वहिनी, आपल्या मुलांप्रमाणें हिचं रक्षण करा बरं. "

इतकें बोलणें होऊन त्या तिघी जणी सोमदत्ताच्या घरीं निघून गेल्या खऱ्या; पण त्यांचें तें पुढच्या आंगणांत भाषण चाललें असतां मागें परसांत काय चमत्कार झाला तो कोठें आमच्या वाचकांना अद्याप समजला आहे! त्या चमत्काराची तर आतां परिस्फुटता होईलच! पण मालतीला त्या दोघी घेऊन गेल्यानंतर अर्थपतीची स्थिति कशी काय झाली, ती वाचकांनीं ताडली आहे काय? त्याच्या चिक्कू स्वभावाला वाचक ओळखीत असल्यामुळें—तो—मालती गेल्याबद्दल दुःखी होण्याच्या ऐवजीं आनंदी झाला असला पाहिजे, हें प्रत्येक वाचक सांगूं शकेल. इतकेंच नव्हे तर, ' बरं झालं मालती गेली—पीडा चुकली. कटकट संपली. मोहोरा देऊन तिला सोडवून आणीपर्यंत अन्नवस्त्राचा तरी खर्च वांचला. आपल्या मागणीइतकी रक्कम देऊन, तिच्याशीं लग्न लावणारा मिळेपर्यंत कोण आतां मालतीला परत आणतो! राहीना का तिथेंच. तशाच मागणीचा नवरा मिळाला म्हणजे त्याच्याच गळयांत आणखी या दोन हजारांची अट द्यावी अडकवून म्हणजे झालं. ' अशा तऱ्हेचे विचारही लागलेच अर्थपतीच्या मनांत आले असले पाहिजेत, असेंही आमचे वाचक स्पष्ट सांगूं शकतील.

असो. मालतीला घेऊन जाईपर्यंत पुढच्या दारीं जो वेळ मोडला त्या वेळाचा फायदा घेऊन, या प्रकरणाच्या आरंभींच सांगितलेल्या दोन व्यक्तीं-पैकीं जी एक व्यक्ति झाडावर चढून बसली होती, तिनें झाडावरून खालीं

उतरून अर्थपतीनें पुरून ठेविलेल्या मोहरा बाहेर काढल्या आणि परसाच्या भिंतीवरून त्यांना लांबविल्या. बिचाऱ्या अर्थपतीला हें काय ठाऊक! मालतीचा खर्च कांहीं कालपर्यंतचा वांचला याच विचारानंदांत तो गढून गेला होता; परंतु वास्तविक तेल व तूप जाऊन धुपाटणें हातीं यावें, अशांतलाच आपला प्रकार झाला आहे याची अर्थपतीला दादही नव्हती. घराच्या पुढच्या रस्त्यानें मालती साखसुरत गेली व परसाच्या भिंतीवरून वीस हजार मोहरा गुपचूपपणें पळाल्या. त्यांना पळून जायला सजीव असे पाय कोणाचे प्राप्त झाले होते, तें मागील संदर्भावरून वाचकांनीं ताडिलेंच असेल. याप्रमाणें वालखिल्यानें मोठ्या गुप्तपणानें त्या मोहरा पळवून त्यांना किराताचा भांडारखाना दाखविला व तो स्वतः—त्यानें किराताला अगाऊच सांगून ठेवल्याप्रमाणें—किरात ज्या ठिकाणीं रस्त्यावर उभा होता त्या ठिकाणीं जाण्यास निघाला आणि अर्थपति पुन्हां आपल्या सुवर्ण-मित्राला भेटण्याकरितां आपल्या घरच्या परसांत गेला. तों काय! मोहोरा पुरून ठेवलेली जागा उकरलेली त्याच्या दृष्टीला पडली! " हाय! घात झाला!! "

---

## प्रकरण बारावें

# " करारपत्र घेऊन येतों."

" हाय हाय! घात झाला: मेलों! ठार झालों! सर्वस्वीं बुडालों! कोणा चांडाळानें त्या माझ्या भूगत मित्राला हात लावला असेल त्याचे हातच काय—पण सर्व देह जळून खाक होवो! आतां काय करूं! तो सुवर्णमित्रही गेला अन् मालतीही गेली. काय करूं तरी काय! हें काळीज आतां खास फुटणार! हाय रे नशीबा! अं-हहहहह! "

वाचकहो, हे शब्द अर्थपतीचेच आहेत हें तुम्हीं ओळखलें ना! चला तर जरा पुढें आणि आतां काय गम्मत होते ती पहा! गेल्याच्या मागील प्रकरणीं वालखिल्यानें सांगितल्याप्रमाणें तो पहा किरात वालखिल्याचीच वाट बघत कसा अंधेरांत उभा आहे तो! तुमच्याप्रमाणेंच त्यानेंही अर्थपतीचें रडणें-बडबडणें ऐकलें आहे. पण पुढें जाण्याची त्याची एकट्याची छाती होत नाहीं. कारण, वालखिल्यानें काय काय खरा प्रकार केलेला आहे, तो त्याला तुमच्याप्रमाणें अद्यापि समजलेला नाहीं. अर्थपतीचें रडणें आणि बडबडणें एकदम ऐकून तो विस्मयचकित झाल्यामुळें भीतियुक्त अशा मनानें आपल्याशींच विचार करीत जागच्या जागीं स्तंभित झाला असतांना त्याच्या मागें वालखिल्य—आपलें काम उरकून केव्हां येऊन उभा राहिला होता हें त्याला समजलें नव्हतें. अर्थपतीच्या पहिल्या किंकाळीच्या आवाजानें किराताला भयभीत करणें आणि वालखिल्यानें त्याच्या मागेंच येऊन उभें रहाणें, या दोन्ही गोष्टी एकाच क्षणीं घडलेल्या होत्या. असो. वालखिल्यानें त्याला हलकेच खूण करून सांगितलें कीं,—

"मित्रा, घाबरूं नकोस! नाटक लिहायला सुरुवात करतांनाच त्याचा शेवट कसा व कुठें करायचा हें जसं आधींच ठरवून ठेवावं लागतं, तद्वतच, मीं—अर्थपति आणि मालती यांच्या बाबतींत अखेरीस काय करायचं तें पूर्ण विचारानं ठरवून ठेवलेलं आहे. आतां, तूं इथेंच जरासा उभा रहा! अमळशानं पुढें ये! मी पुढें होऊन अर्थपतीचा समाचार घेतों."

इतकें बोलून वालखिल्य अर्थपतीच्या जवळ जाऊन म्हणतो—

"कोण हो तुम्ही? रडत-ओरडत-असे अंधेरांतून कां चाललां आहांत? कोण अर्थपति! काय हो झालं?"

"अहो, माझं काळीज!"

"मग, त्याचं काय?"

"कुणीं ओरबडून नेलं!"

"काय म्हणतां काय? अगदीं झूट! पक्की लबाडी! धडधडीत खोटं बोलतां!"

"नाहीं हो नाहीं! अगदीं खरं बोलतों!"

"अहो, काळीज ओरबडून नेलं म्हणतां व मग तुम्ही जिवंत कसे?"

"अहो ह्या माझ्या देहांतलं नव्हे! जमीनींतलं अन् जमीनीवरचं!"

"म्हणजे काय बुवा! हा काय हा तीन काळजांचा जगद्विरहित पुरुष आहे हा!"

"अहो, मीं जमीनींत पुरून ठेवलेल्या वीस हजार मोहोरा अन् जमीनीवरची माझी मुलगी मालती हीं दोन्ही काळजं आतां इतक्यांत ...! पण जाऊं दे—चौकीवर जाऊन ताबडतोब वर्दी दिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. अहो वालखिल्य, काढा हो कांहीं तरी युक्ति! हें पहा हें माझं तिसरं—या देहांतलं काळीज आतां खास फुटण्याच्या बेतांत आलं आहे!"

"असे भ्रांतिष्टासारखे काय तुम्ही करतां हे! तुम्ही म्हणतां तरी काय? कोणाच्या न् कुठल्या वीस हजार मोहोरा?"

"अहो माझ्या! मीं माझ्या घराच्या परसांत जमिनींत पुरून ठेवल्या होत्या! त्याही गेल्या न् मालतीही गेली हो!"

"मालती कुठें गेली? कोणाचा हातबीत धरून गेली कीं काय? उपवर झालेल्या मुलींच्या बापांनीं यापासून धडाच घेतला पाहिजे म्हणायचा!"

"अहो ती मोठी आज्ञाधारक आहे! ती कोणाचा हातबीत धरून जाणारी मुलगी नाहीं. सोमदत्ताच्या दोघी स्त्रिया चार घटकांपूर्वीं माझ्या घरीं एकदम येऊन त्यांनीं तिला दोन हजार मोहोरांबद्दल ओलीस म्हणून नेली हो! आतां कर्ज कसं फिटणार अन् ती कशी सुटणार?"

"घर विका म्हणजे झालं! पण आधीं तुमच्या जवळ वीस हजार मोहोरा होत्या हें खरं कशावरून? वीस हजार मोहोरा जवळ असतांना, सोमदत्ताकडून त्याचं घर गहाण टाकवून आपलं ऋण फेडणारा असा कोणचा

ज्ञाता आहे बुवा ह्या भूमंडळावर! बरं तुमच्याजवळ वीस हजार मोहोरा होत्या आणि त्यांपैकीं तुम्ही कर्जाच्या फेडीकारितां दिल्या नाहींत हा एक चिक्कू स्वभावाचा मासला झाला; पण स्वतःच्या पोटच्या पोरीलाही गहाण ठेवण्यापर्यंत पाळी आली तरी त्या मोहरांचा उपयोग करण्याची बुद्धि तुम्हांला झाली नाहीं. तेव्हां तुमच्यासारखे ज्ञाते खरेच धन्य म्हणायचे! या तुमच्या स्वभावाला म्हणावं तरी काय?"

'अहो—चिक्कण चिक्कू म्हणावं न् दुसरं काय? ओलीस ठेवली म्हणजे आयताच अन्नवस्त्राचा खर्च वांचला!" किरात पुढें येऊन एकदम बोलला. तेव्हां अर्थपति म्हणतो—

" काय वाटेल तें म्हणा! सध्यां—मुलगीन् मोहरा दोन्ही जाऊन—"

" हातीं धुपाटणं आलं—असंच ना? "

" असंच तर काय? आतां, हे म्हणतात कीं घर विका! यांचं म्हणणं अगदीं बरोबर आहे. राहायला घरही नाहींसं झालं म्हणजे संपलंच सगळं! वाहवा रे उपदेश! सर्वस्वाचं वाटोळं करण्याचा हा तुम्हां शहाण्यांचा उपदेश ऐकून वर्तन करणारे आम्ही नंदीबैल आहोंत असं कां तुम्ही समजतां? कोतवालींत जाऊन आधीं चोरीची फिर्याद देतों. "

" हां—तेवढ्या मात्र भानगडींत पडूं नका अं! "

" कां बरं? "

" तुमची जीभ तुमच्या विरुद्ध साक्ष देईल म्हणून! "

" ती कशी काय? "

" 'मी कंगाल आहें, पैसा मिळवण्याचा मार्ग काय तो आतां मालती माझ्याजवळ आहे हाच. माझ्याजवळ कपर्दिकही नाहीं.' अशा शब्दांनीं तुमच्याच जिभेनं अम्मलदारांचे कान आजपर्यंत पुरेपूर भरवलेले आहेत आणि तशी तुमची प्रसिद्धिही आहे. तेव्हां हीच तुमची प्रसिद्धि तुमच्या चोरीच्या फिर्यादीच्या विरुद्ध साक्षीदार म्हणून उभी राहील आणि

मग तुमच्यावर खोट्या प्रतिज्ञेचा गुन्हा शाबीत होऊन, तुम्ही तुरुंगांत जाल! खोटं बोलण्याच्या गुन्ह्यासंबंधानं आपल्या संस्थानचे कायदे किती कडक आहेत ते तुम्हांला माहीत आहेतच."

"मग मी आतां करूं तरी काय? मला आतां कांहींच सुचत नाहीं. प्राण देऊं का?"

"अँः हा निव्वळ भागूबाईपणा! आत्महत्येचं महापातक सप्तजन्म भोगावं लागतं हें ठाऊक आहे ना? आतां, हवीच असेल तर या संकटांतून पार पडण्याची एक युक्ति सांगतों. आहे ऐकायची इच्छा?"

"सांगा सांगा लवकर! आटपा! माझा अगदीं जीव जायची वेळ आली आहे."

"माझी युक्ति म्हणजे प्रत्यक्ष हेमगर्भाचीच मात्रा आहे! प्रथम घर गहाण टाका; मग मालतीला सोडवा. नंतर मालतीला विकून घर सोडवा अन् शीतल छायेंत स्वस्थ रहा! कां आहे कां नाहीं युक्ति?"

"वाहवा! युक्ति पण युक्ति! फारच नामी युक्ति सांगितलीत! माझ्या मालतीची किंमत दोन तीन हजार करण्याइतका मी अजून शहाणा झालों नाहीं—समजलांत! वीस हजार पाहिजेत—वीस हजार! काय समजलांत?"

"हंः तें विसरा आतां! सध्यां तुमच्या मालतीची स्थिति फार निराळी झालेली आहे हें आलं आहे कां ध्यानांत? हीं दोन पत्रं पहा! ओळखलंत का हें मालतीचं अक्षर? हें तिचं तिच्या प्रियकराला अन् हें त्याचं तिला! समजलं का? हीं पत्रं तुम्हांला दाखवण्याकरतां मीं हरप्रयत्नानं मध्येंच पकडलीं आहेत. तेव्हां आतां—"

"अहो पण हें व्हावं कसं?"

"हें झालें आहे असं! पण यांत कांहीं विशेष नाहीं. हा सृष्टिनियमच आहे! वर्षाऋतूंत पयोधर ओथंबूं लागले तर त्यांत आश्चर्य तें कसलं?"

"पण तो माणूस कोण आहे याचा कांहीं अंदाज? गबर तरी आहे का?"

"त्याचं नांव जरी सध्यां मला तुम्हांला सांगतां येत नाहीं, तरी तो, ह्या किरातासारखा सुंदर, तरुण, विद्वान, गर्भश्रीमंत–खाऊन पिऊन सुखी असा आहे, यांत शंका नाहीं. सध्यां त्याच्या संबंधानं मी तुम्हांला इतकंच सांगू शकेन."

"मी आपण होऊन जर माझी मालती त्याला दिली तर, तो माझ्या म्हणण्याप्रमाणें रक्कम देण्याला कबूल होईल का?"

"माझी अटकळ जर चुकत नसेल तर तो तुमची सध्यांची नड तरी निदान भागवण्याइतक्या योग्यतेचा आहे, असं खात्रीनं सांगायला कांहीं हरकत नाहीं. म्हणून म्हणतों कीं, हातची पारध दवडूं नका!"

"काय म्हणतां काय तुम्ही! सगळ्याच पोरचेष्टेच्या न् वात्रटपणाच्या गोष्टी आहेत कीं काय? ती माझी मुलगी आहे! तिच्यावर माझी पूर्ण सत्ता आहे! खेंचून आणीन–खेंचून!"

"तें आतां विसरा. आतां ती वयांत आल्या कारणानं सज्ञान होऊन, स्वतंत्रतेनं वागण्याची तिला कायद्यानंच पूर्ण मुभा दिली आहे–हें आहे का लक्षांत?"

"'घर फिरलं म्हणजे घराचे वासेही फिरतात' अशी जी म्हण आहे ती खरी आहे! सध्यां माझ्या दुर्दैवानं मला कसा चहूंकडून आगदीं जखडबंद करून टाकला आहे."

"म्हणूनच म्हणतों कीं, वालखिल्याच्या युक्तिवादानं त्यांतून मुक्त व्हा म्हणजे झालं!"

"पण मला आत्तांच्या आत्तां घर गहाण न ठेवतां दोन हजार मोहोरा कोण देणार?"

"माझ्या म्हणण्याला रुकार देत असाल तर तें काम मी करवतों!"

"शिवाय–मला जन्मभर अन्नवस्त्र दिलं पाहिजे आणि मालतीचं पालन पोषण उत्तम तऱ्हेनं झालं पाहिजे, ह्या अटी कबूल असतील तर

तुमचं म्हणणं मी कबूल करतों."

"कबूल! किराता, जा आत्तांच्या आत्तां. माझ्याकरतां एवढं काम कर! दोन हजार मोहरा तुझ्या जवळच्या घेऊन, सोमदत्ताकडे नेऊन भर —जा! झालं आतां काम! पहा गेलासुद्धां किरात तुमचं काम करायला! याचं नांव मित्र! बरं—आतां तुम्ही असं करा! मोहोरा पावल्याची आणि मालती किराताला दिल्याची पावती आत्तांच्या आतां लिहून सोमदत्ताच्या घरीं घेऊन या! मीही तेथें तुम्हांला मरेपर्यंत अन्नवस्त्र पुरवण्याचं करारपत्र घेऊन येतों. जा तर मग आतां लवकर!"

आतां मुकाट्यानं चुंबित अर्थपतीला जरी घरीं जाणें भाग पडलें, तरी त्याच्या मनांत चोरीबद्दल फिर्याद देण्याचा जो विचार घोळत होता त्यापासून तो अद्यापि पराङ्मुख झालेला नव्हता. त्यांत त्याच्या मतानं कांहीं निराळाच विचार ठरवला होता. अखेरीस मालती जरी त्याच्या मताविरुद्ध किराताच्या हातीं लागली, तरी तो ऋणमुक्त होऊन त्याच्या मरेपर्यंतच्या अन्नवस्त्राचीही व्यवस्था लागली इतक्यावरच तो संतुष्ट होऊन शिवाय घर बचावलं म्हणूनही आनंद मानून फिर्याद देण्याची व्यवस्था करण्याचें त्यानें ठाम ठरविलें; कारण झालेली चोरी परत मिळाली तर ती त्याला हवीच होती.

आरंभलेलें कार्य शेवटाला लागेपर्यंत मध्यें अनेक विघ्नें यायचींच, हा एक सृष्टिनियमच होऊन बसलेला आहे. मनुष्य काय किंवा इतर प्राणी काय—आपल्या कामांत एकदां विजयी झाला म्हणजे खरोखर त्याच्या हृदयांतील चिंताग्नि विझून—रुधिराभिसरण नियमानें होऊं लागतें आणि चिंतेमुळें अपचनानें झालेली पांडुरशी अंगकांति—उज्वल—सतेज बनते! ज्याप्रमाणें शरदृतूंत झडून गेलेल्या वृक्षवेलींची पालवी वसंत ऋतूंत मोठ्या जोमानें फुटते, त्याप्रमाणेंच विजयजिगीषा अंगांत जोम घालून प्रसन्नतेच्या रंगानें मुखकमलाला आल्हाददायक अशी शोभा येते.

या वर्णनाप्रमाणेंच–किरात, मालती आणि वालखिल्य या त्रयीची स्थिति पुढें झाली हें आतां सांगणें नकोच.

---

## प्रकरण तेरावें.

# शुभ मंगल सावधान !

" शरच्चंद्रा, वसंता, तो सूर्यनारायण कसा वर येतो आहे तो तुम्हीं पाहिलात का ? "

" वसंता, आपल्याला बाबांनीं शिकवलेलं सूर्याचं स्तोत्र आपण याच वेळीं रोज म्हणतों ना रे ? "

" मालतीताई, आम्ही आतां तें म्हणतों तें ऐक अं ! "

" म्हणा—ऐकतें.

( राम स्मरावा राम० )

**तूंच जगा आधार ॥ खरोखर ॥ ध्रु० ॥**

**ब्रह्मचिंतनीं आदिशक्ति तूं ॥ चंडप्रभीं साकार ॥ दिवाकर ॥ ध्रु० ॥ कर्मसाक्षि तूं जगच्चक्षु तूं ॥ सकल पूजनागार ॥ प्रभाकर ॥ ध्रु० ॥ पंच दोष ते निरसन करण्या ॥ विनवितसों तुज फार ॥ विभाकर ॥ ध्रु० ॥**

" खरंच हीं सूर्याची स्तुति किती भक्तिभावानं रचलेली आहे ! "

" देवताच तशी असल्यावर भक्ताचा भाव वाईट कसा असेल ? "

शरच्चंद्रा, ताई आपल्या नवऱ्याकडे कशी चोरून बघते आहे ती बघीतलीस कां ? "

" ताई, चाललीस कुठें ? शरच्चंद्र बोलला तें खोटं का आहे ? लाजून-भिऊन-पळून नको कांहीं जायला ? "

" मघाशीं आई म्हणत होती कीं, आजच आपल्या घरीं ताईचं लग्न व्हायचं आहे म्हणून!"

" खरंच कां ग ताई?"

" मला कनी कांहींच ठाऊक नाहीं हो!"

काय रे वसंता, हिला जरी कांहींच ठाऊक नाहीं, तरी आईचं म्हणणं कधीं तरी खोटं होईल का?"

" बाळांनो, तें कधींच खोटं व्हायचं नाहीं."

" म्हणून म्हणतों कीं, ताई किरातकाकांच्या बरोबर लग्न लागून त्यांच्या घरीं गेल्यावर आम्हांला विसरूं नकोस हो!"

" नाहीं तर आम्ही आपले आमच्या बाबांच्यासारखे गरीब! विसर आपली आम्हांला म्हणजे झालं!"

" मी सुखांत असो नाहीं तर दुःखांत असो, तुम्हांला कधीं विसरणार नाहीं बरं. अगदीं सख्ख्या बहिणीसारखं प्रेम करीन."

" सौख्यनगाच्या शिखरावरील प्रेमवाटिकेंत या मधुर भाषणांपेक्षां अधिक सुखकारक तें काय असणार!"

" किरातकाका, आज खरंच कां हो तुमचं लग्न व्हायचं आहे आमच्या घरीं?"

" हो—असं आई म्हणत होती. मी त्या वेळीं, शुभमंगल सावधान, म्हणेन."

" बाळांनो, तुमच्याकरतां घरांत नवीन जरीच्या टोप्या अन् कुडतीं आणलीं आहेत, तीं घाला जा!"

" तीं तुम्ही आणलींत का बाबांनीं?"

" मीं."

" मग नकोत तीं आम्हांला! आमचे आपले फाटके कपडेच बरे!"

" कां रे?"

" बाबांनीं असं सांगितलं आहे कीं, उसनं ऐश्वर्य घेऊं नये. बिन-अकली भडकीच्या पोशाखापेक्षां विद्वत्तेची फाटकी गोधडीच बरी."

" अहाहा! परमेश्वरा, काय हा संतोष आणि निरपेक्षपणा या पोरवयांत! सोमदत्ता, धन्य आहेस तूं!"

" काका, आम्ही आतां जातों घरांत. ताई, चल. आपण घरांत जाऊन पृथ्वीचा नकाशा बघूं."

" मी तुला भूगोल शिकवतों."

" बाबांनीं मला खगोल शिकवला आहे तोहि मी तुला शिकवीन!"

" मी आतां तुमची शिष्यीण होतें. मला शिकवा अं!"

याप्रमाणें बोलत बोलत तीं तिघें ओटीवरून माजघरांत निघून गेल्यावर, अर्थपतीशीं सर्व तऱ्हेची बोलाचाली करून, त्याच्याकडून मोहोरा पोंचल्याचें आणि किराताला मालती दिल्याचें कबुलीपत्र घेऊन मोठ्या उल्हासानें सोमदत्त आणि अर्थपती यांसह वालखिल्य तेथें येऊन किराताला म्हणतो--

" मित्रा किराता, हें घे कबुलीपत्र! आतां तुझ्याकडून अर्थपतींना करारपत्र द्यायचं राहिलं आहे तें त्यांना देऊन टाक."

" हें मीं लिहून आणलं आहे हें ध्यावं."

अर्थपतीनें तें घेतल्यावर सोमदत्त म्हणतोः—

" मित्रा किराता, विवाहित स्त्रीशिवाय संसारांत राहूं नये, असं शास्त्र आहे. तुझी पहिली बायको निवर्तल्यापासून तूं, बरेच दिवस एकट्यानंच काढलेस! आतां परमेश्वरकृपेनं आपले मित्र अर्थपति हे आपली उपवर कन्या मालती तुला द्यायला तयार झाले आहेत, हा योग मोठा अपूर्व आला आहे."

" माझी इच्छा आज परमेश्वरानं पार पाडली, याबद्दल मी त्याचा फार फार आभारी आहें. आपणा सर्वांनीं मला पुन्हा संसारी बनवलं याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत ऋणी आहें."

"माझ्या सर्व अटी तुम्ही कबूल करून त्याप्रमाणें करारपत्रही तुम्ही मला लिहून दिलंत आणि त्याबद्दल मी आपली मुलगी तुम्हांला द्यायला तयार झालें यांत अधिक तें काय झालं?"

"पेंचांत सांपडल्यावर कोण काय नाहीं करणार?"

"वालखिल्य, आतां वर्मी घाव कां घालतां? आतां लग्नसंमारंभ सूर्य-नारायणाच्या देवळांत व्हावा अशी माझी इच्छा आहे."

"हो हो! असेल तर काय झालं! उपटसुम्या त्रिदंडी संन्याशाचंच लग्न असेल हें?" विजया एकदम येऊन बोलली व लगेच "घर सोडून देवळीं बिऱ्हाड कशाला?" असें तिच्यानंतर लगेच मदिराही बोलली .तेव्हां अर्थपति अगदीं गप्पचिप्प होऊन "आपल्याबाहेर मी वहिनी, नाहीं." असें म्हणाला.

"आई, आईग, बाहेर वाजंत्री आले आहेत, त्यांना वाजवायला सांगू का?" शरच्चंद्र मध्येंच बोलला. तेव्हां सोमदत्त त्याला म्हणाला—

"बाळ, जरा दम धर अं! अर्थपति, तुमची आणि इतर मंडळीची इच्छा पार पाडण्याकरतांच जणू काय तो बघितलात कां–जगन्मित्र सूर्य-नारायण वर येत आहे. ह्या लग्नाचा वाङ्निश्चय मागें अशाच वेळेवर सिंधु-तीरीं झालेला तुम्हांला समजेललाच आहे. तेव्हां आतां तो लग्नविधि एथेंच घ्या उरकून म्हणजे झालं. वेदोक्त मंत्रांनीं हें जोडपं पुनीत करून यांचा वेदोक्त विवाह मग उपाध्याय लावतीलच."

"अर्थपती, मग आतां उशीर कां?"

"बाळे मालती, इकडे ये अशी! तुझ्या सारख्या उपवर मुलींनीं आपा-पल्या मनांप्रमाणेंच पतींची निवड करावी हें अगदीं योग्य आहे. मागं मोदपर्वणीच्या दिवशीं तूं समुद्राच्या कांठीं–याच सूर्यनारायणाला साक्षी ठेवून स्वमतानं किरातरावांशीं गांधर्वविवाह केला आहेसच. तेव्हां आतां माझं यांत जें काय काम उरलं आहे तें इतकंच कीं, मी हा तुझा हात–

लग्नसाक्षी जो भगवान् सूर्य नारायण—त्याच्या देखत या पंचमहाभूतात्मक जगताला साक्ष ठेवून, यांच्या हातांत मोठ्या स्वसंतोषानें देतों आहें. किरात महाराज, आपल्याला मी ही माझी मुलगी मोठ्या आनंदानं देतों आहें. हिचं पाणिग्रहण माझ्यादेखत करून इचं योग्य तऱ्हेनं प्रतिपालन करा, अशी विनंती करतों."

" ह्या करकमलाला मी अत्यादरानं आपल्या हातांत धरतों."

" झालं! मित्रा किराता, मी आपल्या वचनांतून आज मुक्त झालों."

" मित्रा, अर्जुनावर श्रीकृष्णपरमात्म्यांनीं उपकार करून जसा त्याला आपला दास करून सोडला, तसेंच तूं माझ्यावर हे उपकार करून मला आजन्म आपला ऋणी करून ठेवला आहेस. हें उपकारऋण मी आतां कसं फेडूं?"

" अरे, यांत उपकार ते कसले! सुहृद हा शब्दच परस्परऋणबद्ध आहे. असो. परमेश्वरा, ही गांठ आतां कधींच तुटूं देऊं नकोस, इतकीच तुला प्रार्थना आहे."

" भगवंता, या जोडप्याला संसार साधून परमार्थाचा लाभ प्राप्त होईल असंच कर."

" आईग, आतां वाजंत्रीं वाजत देवाला जायचं ना?"

" हो बरं! चला! धरा रे दोहोंकडून दोघे मालतीताईचा हात! भावजी, व्हा पुढें! अहो अर्थपति मामंजी, आतां कां मागं मागं! चला—वरपूजेची तयारी आहेना? आतां हें जोडपं--लक्ष्मीनारायणस्वरूपी आहे असं म्हटलं पाहिजे हो."

मौज बघायला सांपडणार म्हणून हर्षोत्कर्षानें उल्हसित झालेले शरचंद्र आणि वसंत यांनीं मालतीचे दोन्ही हात दोहींकडे धरून ते पुढें व त्यांच्या मागें सोमदत्ताशिवाय इतर सर्व मंडळी, वाजंत्रीं वाजत गाजत रस्त्यानें मिरवत श्रीसूर्यनारायणाच्या दर्शनाला गेलीं. काय चमत्कार आहे पहा! कोणी

संसाराला तुच्छ मानतात तर कोणी त्याची प्रशंसा करतात. बरोबरच आहे. आत्मा जरी एकच आहे तरी तो संगतीनें वर्तनांत भिन्नत्व पावतो. संसाऱ्यांना प्रारंभीं संसार हवासा वाटतो पण अंतीं तोच, नकोसा होतो. या दोहोंचं बीज-अतिपरिचय आणि संगतीची लालसा यांतच आहे. असो. आमचे नायक सोमदत्त एकटेच मागें घरीं राहून काय करीत आहेत ते आतां पाहूं या !

वाचकहो ! तें बघितलेंत का तिकडे सोमदत्ताच्या ओसरीवर काय चाललें आहे तें ! सोमदत्ताच्या पुढें तो एक दिव्य पुरुष कोण उभा आहे तो ओळखलात का ? ओळखणार नाहीं असें कसें होईल ? तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटीं अंतरिक्षांतून एकदम येऊन ज्यानें सोमदत्ताला दाट जंगलांत प्रथमच भेट दिलेली आपण पाहिली आहे, तोच हा मनोरथ यक्ष ना ? होय –तोच ! त्याचें आणि सोमदत्ताचें काय भाषण चाललें आहे, हें तुम्हांला ऐकण्याची उत्सुकता आहे ? कीं, किरात मालतीच्या लग्नसमारंभाच्या मिरवणुकींतून मिरवत जायची हौस आहे ? बोला ! कळलें, तुमचें अंतरंग लेखकाला समजलें ! लग्नसोहोळ्यासारख्या सोहळ्यांत मिरवायची हौस फेडून घ्यायचे हवे तितके प्रसंग येतील; परंतु सध्यां अनायासें प्राप्त झालेला अद्भुत प्रसंग दृष्टीस पडायला किती तरी खडतर तपश्चर्या करावी लागेल. म्हणून तुम्हीं लग्नसोहळ्याला सोडून--सोमदत्ताला यक्षराज काय सांगताहेत तेंच ऐकायला जाण्याचें ठरविलें आहे. चला तर बाजूला उभें राहून काय चाललें आहे तें सावधान चित्तानें पहा व एकाग्र अंतःकरणानें ऐका !

“ आज मी तुला सोमदत्ता, फार दिवसांनीं भेटायला आलों, याचं कारण फार निराळं आहे. तुझ्यावर लवकरच एक मोटं संकट येणार आहे, त्याची मी तुला आगाऊ सूचना देण्याकरतां आलों आहे. असलीं संकटं हीं संसाऱ्यांना तापदायक असतात. तुझ्यासारख्या साधूला तीं कःपदार्थ होत. साधूची परीक्षा अनेक संकटांनींच होत असते. तुझा पूर्ण भरंवसा

धर्मावर आहे. सोमदत्ता, सावध ऐस ! आजपर्यंतचीं संकटं कांहींच नाहींत. आतां येणारं हेंच तुझ्या खऱ्या साधुत्वाची साक्ष पटवणारं आहे. तुझ्यावर झालेलं प्रहसन ही त्याची नान्दी आहे. 'तूं नास्तिक असून संस्थानच्या तरुण मुलांना राजद्रोही बनवतोस' असे मुख्य दोन आरोप तुझ्यावर आहेत. त्यांबद्दल न्यायमंदिरांत तुझी लवकरच चवकशी होणार आहे. त्या चौकशींत तुला ठार मारण्याची जरी शिक्षा झाली तरी सत्यापासून ढळूं नकोस. तुझ्यासारख्या साधूच्या नाटकाचा अखेरचा पडदा तुझ्या भयंकर छळणुकींत पडणार आहे. म्हणून धैर्य धर, सावध ऐस, भिऊं नकोस!"

"यक्षराज, आपली आज्ञा शिरसावंद्य आहे.

( शृंगा ताडोनी डोहीं० )

**उपकृति-तति मोठी झाली मजवरती अपुली ॥ आजी ॥**
**हृत्पुटिं ठेवी जपुनी मणिसम आज्ञा अपुली ॥ आतां ॥**
**लोकनायकां साधूसंतां योग्यचि अपुली ॥ आज्ञा ॥**
**मळविन नच ती स्वजीव-प्रेमें ॥ जाइन संसृति तरुनी ॥**
**मानुनी ॥ आज्ञा ती अपुली ॥ आतां ॥ १ ॥**

"सोमदत्ता, माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे आणि अभयवचनहि आहे. झंजावाताला न डगमगणारा असा तूं मानवी प्राण्यांतला प्रत्यक्ष मेरूच आहेस. प्रलयकालच्या द्वादश दिवाकारांनीं आपले प्रखर किरण पृथ्वी जाळून खाक करण्याकरितां जरी उत्पन्न केले तरी, जळून भस्म न होणारी प्रत्यक्ष तूं सत्यमूर्तिच आहेस. या पापी जगाला तुझ्या उदयानें अंध बनविल्यामुळेंच तुझ्या विरुद्ध खोट्या बंडाची उभारणी होऊन तुझा नाश करायला तें सज्ज झालेलं आहे. तुझ्या नाशानं जर त्यांच्या डोळ्यांत अंजन पडून सत्यासत्यत्तेचा खरेपणा जगाला शिकायला सांपडतो आहे, तर बेलाशक–जगाच्या कल्याणाकरतां आत्मयज्ञ कर. वास्तविक पाहिलं असतां अद्यापि जगाला पुष्कळच शहाणं व्हायचं आहे; पण त्या गोष्टीला दिनावधि

लागूं नये व तें कार्य लवकर व्हावं, म्हणूनच तुझ्या नाशाची तोड परमेश्वरानं काढली असावी असं दिसतं. असो. आकाशांत जसा एकच सूर्य तसाच तूं सध्यां पृथ्वीवर एकच साधु आहेस, यांत संशय नाहीं. सूर्यास्तानंतर जगाची जी दशा होते, तीच कांहीं काल तुझ्या पश्चात् होणार आहे; पण त्याला इलाज नाहीं."

वाचकहो, असे स्तिमितचित्त कां झालांत? यक्षराज एकदम अदृश्य झाले म्हणून होय? यक्षच ते. ते आपणांत अक्षय थोडेच रहायचे आहेत! त्यांनीं सांगितल्याप्रमाणें आतां न्यायासनापुढें काय काय चमत्कार घडणार आहेत ते अवलोकन करण्याला निघण्याची तयारी करा!

वाजंत्र्याच्या सनयांचे व संबळांचे आवाज तुम्ही आजपर्यंत पुष्कळदां ऐकले आहेत, त्यांतलेच हे ऐकूं येत आहेत. किरातमालतीसह वऱ्हाडीमंडळ घरीं परत येत आहे, हें यावरून तुम्हीं ताडलेंच असलें पाहिजे. या गोष्टी चालू वहिवाटीला अनुसरूनच चालल्या असल्याकारणानें त्या रोजच्याच पहाण्यांतल्या आहेत; म्हणून त्यांच्याकडे बघत बसण्याचें सोडून आतां आपण न्यायमंदिरांत जाऊं.

---

## प्रकरण चवदावें

# विष पाजून ठार मारा.

" सोमदत्त, या राज्यांतील राजनिष्ठ प्रजा या नात्यानं अपूर्वसेन आणि वृषसेन यांनीं संस्थानचे कैवारी म्हणून तुमच्यावर फिर्याद मांडून आत्तांपर्यंत साधक प्रमाणांनीं आपले मुद्दे या न्यायासनापुढें सिद्ध केलेले आहेत, त्यांवरून तुमच्यावर राजद्रोहाचा आरोप सिद्ध होतो आहे. त्यांचे ते मुद्दे

खोडून काढून स्वतःला निर्दोषी ठरवून घेण्याचा प्रयत्न करण्याची खटपट तुम्हांला कर्तव्य असेल तर तसें करायला न्यायदेवतेची मुभा आहे."

न्यायमंदिरांत या वेळीं पुष्पपूर राजधानींतलेच नव्हेत, तर आसपासचे मोठमोठे सन्माननीय गृहस्थ व इतर नागरिकही सोमदत्तावर चालू असलेला खटला मोठ्या शांतपणानें ऐकत होते. न्यायमंदिरांत बसायला किंवा उभें राहायलाही जागा नव्हती, इतकी भयंकर गर्दी तो खटला ऐकणारांची झाली होती. तरी त्या वेळीं तेथें शांतरसाचें साम्राज्यच प्रस्थापित झालेलें असून, न्यायाधीशानें वर सांगितल्याप्रमाणें भाषण केल्यावर आतां सोमदत्त प्रतिपक्षांचे मुद्दे कसे काय शिताफीनें खोडून काढतो, तें ऐकण्याकडे सर्वांचे कान मोठ्या उत्सुकतेनें लागून राहिले होते. न्यायाधीशाचें म्हणणें ऐकून घेऊन सोमदत्तानें मोठ्या शांतपणें उभें राहून आपलें भाषण मोठ्या गंभीरपणानें मुद्देसूत असें सुरू केलें.

"मी मोठासा वक्ता नसून वकीलाप्रमाणें भाषण करण्याचीही मला संवय नाहीं. माझ्या बोलण्यांत अगदीं साधे शब्द येतील; कोणाची स्तुति वगैरे कांहीं एक असूं शकणार नाहीं. ज्याला आपल्या घरीं आणि देवळांत संस्थानच्या चालीप्रमाणें देवाला बळी देतांना बहुत लोक हरहमेश पहातात, तो मी संस्थानच्या लोकांचे देव मानीत नाहीं असं म्हणण्याला आधार काय? अहो, 'मला अमुक देवता बुद्धिवाद सांगते, म्हणून हा लोकांत अफवा उठवतो' असा ज्यावर गुन्हा घातला आहे व ह्यावरून जो नवे देव स्थापन करतो असं अनुमान केलं आहे, तो मनुष्य ( मी ) देव मानतों कीं नाहीं अशी शंका तरी घेतां येते काय? जे लोक शकुनविद्येवर विश्वास ठेवून—उडणारीं पांखरं, होमाकरितां मारलेल्या पशूंचीं आंतडीं, यदृच्छेनं कोणाच्या तोंडून निघालेले शब्द, कुत्र्याचं रडणं, सन्मुख आलेली विधवा पाहून तोंड फिरवणं वगैरे गोष्टींवरून भाकितं करतात त्यापेक्षां शकुन बघण्याची मी निराळीच पद्धति पाडली आहे असं मुळींच नाहीं. मी उपदेव

मानतों, हें म्हणणं जर खरं आहे, तर याच बोलण्यावरून मी जुने देव मानतों, असं सिद्ध होतं. जो उपदेव म्हणजे देवांचीं अपत्यं मानतो, तो मूळ देव मानीत नाहीं हें म्हणणं खरं कसं मानावं? सृष्टींतल्या ज्या गोष्टींचा विचार केला असतां पाप लागतं, त्या गोष्टींचा मी विचार करतों, असा एक आरोप माझ्यावर घातला आहे. त्याबद्दल माझं उत्तर असं आहे कीं, ज्यांत सृष्ट वस्तूंचा सविस्तर विचार केलेला आहे असं जें सिद्धपदार्थविज्ञान शास्त्र- त्याचा अभ्यास जे सर्वकाळ करतात त्यांची मी निंदा करीत नाहीं किंवा त्यांचं तें करणं वाईट आहे असंही मी म्हणत नाहीं, हें खरं; पण मी स्वतः इतर सर्व विचार सोडून सदाचरण कोणचं अम्मलदारांनीं अम्मल कसा करावा, दुराचरण कोणचं, राजकर्त्यांनीं प्रजेचं मन शांत कसं राखावं इत्यादि गोष्टींचा विचार करीत असतों. हें माझं करणं वाईट आणि बोलणं खोटं असेल तर वाटेल त्यानं माझा खोटेपणा काढावा! राज्य करण्याच्या चालू नियमांविषयीं अनर्थकारक आणि राजद्रोही असं वाङ्मय प्रसिद्ध करून तशा तऱ्हेचे सिद्धांत मनांत भरवून देऊन तरुणपिढीला मी बिघडवतों, असा तिसरा आरोप माझ्यावर आहे. याचं उत्तर–गरीब असो अगर श्रीमंत असो--सदाचरणी होण्याच्या इच्छेनं जो माझ्याकडे आला त्याला सुज्ञ करण्याविषयीं मीं उत्साह ठेवला. त्यांतला जर कोणी दुराचरणी अथवा आततायी निघाला, तर त्याचा दोष माझ्यावर कां म्हणून यावा? मीं आजपर्यंत कोणापासून द्रव्य घेऊन कोणालाहि शिक्षण दिलेलं नाहीं. कोणचीही गोष्ट करण्याबद्दल कोणावर जबरदस्ती–जुलूम–केलेला नाहीं. संपत्तीनं चांगुलपणा न येतां, चांगुलपणानं संपत्ति प्राप्त होते; सर्व सुखाचं मूळ सदाचरणच आहे; आत्मा शाश्वत आहे, म्हणून दिसणाऱ्या अशाश्वत वस्तूंचा लोभ धरूं नका; अशा गोष्टींचं शिक्षण देणं आणि वाङ्मय प्रसिद्ध करणं हा जर गुन्हा होत असेल, तर मी खरोखरच शिक्षेला पात्र आहें. मात्र, या शिक्षणानं मी कोणाचीं मुलं बिघडवलीं असतील

त्यांनीं पुढें यावं. या बाबतींत देवानं मला मनुष्यजन्माला घालून जी कामगिरी करायला सांगितली ती मीं माझ्या जन्माचा उद्देश ओळखून केली असल्यामुळें देवाज्ञेचा भंग झाला नाहीं. आणि मी देवाज्ञेचा याप्रमाणें भंग केलेला नसल्यामुळेंच नास्तिक न ठरतां आस्तिकच शेवटीं ठरतों. त्याचप्रमाणें मीं आजपर्यंत राजाज्ञेचाही कधीं भंग केल्याचं मला आठवत नाहीं. राजाज्ञेप्रमाणें मीं अनेक असंगीं रणकंदनांत अनेकदां सैन्याच्या गोटाचं---ठाण्याचं---रक्षण जातीनं केलेलं आहे. ह्यामुळें मला कोणच्याही तऱ्हेच्या खेदाला जागा राहिलेली नाहीं. आणि म्हणूनच माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मी तरुणपिढीला उपदेश करून माझं कर्तव्यकर्म करायला कधींही माघार घेणार नाहीं. मरणाच्या भयानं मी कधींही कर्मपराङ्मुख होणार नाहीं. इतउत्तर मीं कांहीं एक न करतां मुकाट्यानं बसावं अशा अटीवर या खटल्यांतून मला मुक्त करण्याचा जर न्यायाधीशांचा विचार असेल, तर मी आतांच सांगतों कीं, या गोशृंगाच्या प्रजाजनांवर माझी फार ममता आहे. मी त्यांना फार थोर मानतों. पण देवाज्ञेपुढें तें सर्व तुच्छ आहे. माझ्या हितवादाचा सांप्रदाय बाजूला ठेवून उपदेश करायला मी कधींही माघार घेणार नाहीं. द्रव्य आणि पदव्या यांच्याकरतां एकसारखं झुंजत बसण्यापेक्षां—विवेक, विद्या आणि ज्ञान—यांच्या प्राप्तींतच मोठा फायदा आहे. जोंपर्यंत आपल्या आत्म्याला चांगलं वळण लावायला लोक झटणार नाहींत तोंपर्यंत त्यांना खरी देशसेवा काय आहे तिचा गंधही न कळतां—त्यांच्या तुच्छ अशा वदनांवर लज्जेच्या साम्राज्याची कृष्णध्वजाच फडकत राहील. मी बाहेर बुद्धिवाद करण्याविषयीं इतका झटत असतां, दरबारांत येऊन स्वदेशकल्याणाच्या विचारांत बुद्धिवाद सांगायला नेहमीं अळंटळं करतों—ह्यावरून मी फार भित्रा आहे, असा चवथा आरोप माझ्यावर आहे. पण मी अनेक वेळां स्वदेशाच्या बाजूनं सैनापत्य स्वीकारून रणांगणांत शत्रूची रग जिरवल्याचं

संस्थानाला माहीत आहेच. ही गोष्ट तें कसं विसरेल! दुसरं असं कीं, मागें मी जेव्हां याच न्यायमंदिरांत मुख्य न्यायाधीश होतों, त्या वेळीं—प्रजेवर होणाऱ्या राजकीय जुलमांच्या विरुद्ध—मीं निर्भयपणानं, कित्येक प्रसंगीं खडखडीत अभिप्राय दिलेले आहेत. तेव्हां मी भित्रा ठरणं शक्यच नाहीं. माझा मनोरथ मला नेहमीं साह्य करतो हें सर्वांना माहीत आहेच. तोच मला राजमंडळांत बसायला संमति देत नाहीं. सरकारी नोकरींत माझा किंवा माझ्या देशाचा यत्किंचितही फायदा नाहीं, असं तोच मला सांगतो. त्याचा उपदेश बाजूला सारून, मीं सरकारी नोकरी पतकरली असती, तर आज सत्तर वर्षें मी या जगांत जगलोंच नसतों, अशी माझी खात्री आहे. आमच्यांत किंवा दुसऱ्या कोठेंही जो मनुष्य स्वदेशकल्याणा-करितां, आपल्या निर्भीड स्वभावामुळें राजमंडळाशीं काय किंवा इतरांशीं काय--वाकडा होईल, सरकारी अम्मलदारांच्या अम्मलबजावणींत होत अस-लेलीं अन्यायाचीं कृत्यं उघडकीला आणील--अथवा, स्वदेशसेवेचा व हिता-चा नैसर्गिक कायदा कधीं मोडूं द्यायचा नाहीं अशा निग्रहानं आपलं काम रात्रंदिवस चालवील त्याला ह्या राज्यांत चालू असलेल्या अम्मलबजावणींत मोठा अपाय होईल. म्हणून, यत्किंचित जगण्याची जर इच्छा असली तर, न्याय-पक्षरत अशा माणसानं सरकारी नोकरी कधींच करूं नये; कारण, त्यांत स्वदे-शसेवा न होतां, निव्वळ अधिकाऱ्यांच्या दास्यांतच मूठमाती मिळते. न्याया-धीशमहाराज, माझ्या मनांतल्या ह्या वास्तविक गोष्टी कांहींएक पडदा न ठेवतां, मी आपल्यापुढें निर्भीडपणानं बोललों याबद्दल कृपा करून आपल्या मनांत वाकडं येऊं देऊं नका! या जगांत, अप्रामाणिकपणा आणि अपकीर्ति हेंच खरं मरण आहे. नैसर्गिक मरण ही कांहीं अनिष्ट गोष्ट नाहीं. जो जन्माला आला तो कधीं तरी मरणारच. मृत्यु हा काय तुच्छ पदार्थ आहे. ज्ञातें--त्याला कधींच भीत नाहींत. मी आपल्या जन्मभूमीशीं कधींच अप्रामाणिक होणार नाहीं. न्यायाधीश जे न्यायासनावर बसतात, ते कायदा मोडून,

कृपेचा प्रसाद वाटण्याकरितां कधींच बसत नाहींत. कायद्याला धाब्यावर बसवून, स्वैर मतानं त्यांना वागतां यायचं नाहीं. ही गोष्ट जरी खरी आहे, तरी बहुतेक सर्व न्यायाधीश--तारण आणि मारण आपल्याच हातीं आहे असं समजतात. त्यांच्यासमोर जे वादी-प्रतिवादी येतात, त्यांनीं आपलं नाक मुठींत धरूनच त्यांच्यापुढें गेलं पाहिजे अशी त्यांची इच्छा असते. असो.

याप्रमाणें जे उपाय मला बेकायदा आणि गैरशिस्त वाटतात—ते मरण टाळण्याकरतां सुद्धां या न्यायासनापुढें मी कधीं करणार नाहीं. न्यायाधीशांची गोड शब्दांनीं प्रार्थना करून मन वळवणं, म्हणजे त्यांच्याकडून शपथभंग करवणं आहे. असलं पाप मी कधीं करणार नाहीं. माझं मन शुद्ध आहे. माझ्यावर देवानं सोंपविलेली कामगिरी मीं केली आहे, करतों आहें व मरेपर्यंत ती करीनही. माझी कामगिरी देवाज्ञेची असल्यामुळें मी पूर्ण निर्दोषी आहें. आतां, ज्यांत तुमचं आणि माझं कल्याण आहे असं तुम्हांला वाटेल तसा तुम्ही—या खटल्याचा खुशाल निवाडा करा.''

वारा अगदीं शांत होऊन झाडांचीं पानें सुद्धां ज्याप्रमाणें शांतरसाचा भंग करण्याचें धारीष्ट अंगीं धारित नाहींत, त्याप्रमाणेंच श्रोतृसमाजांत, सोमदत्ताचें भाषण संपेपर्यंत गंभीरता दिसत होती. त्यानें आपलें भाषण संपवून आपलें स्थान पुनरालंकृत करण्यास जाण्यास फारच थोडा जरी अवधि लागला, तरी त्या तितक्याच अवकाशांत, सोमदत्ताच्या बाजूचे व त्याच्यावर दांतओंठ खाणारे--यांच्या मनाची फारच चलबिचल झालेली दिसत होती. आतां न्यायाधीश काय बोलणार तें ऐकण्यास दोन्ही पक्ष--अत्यंतातुरतेनें आपसांतील पुटपुटणें बाजूला ठेवून, सज्ज झाले होते. पुन्हां शांतरसाची छाया उत्पन्न झाली. न्यायाधीश बोलूं लागले, हाच काय तो त्या शांतरसाचा भंग.

“ एकंदर खटल्याचे दोन्ही आंगचे पुरावे लक्षांत घेतां, सोमदत्त राजद्रोही गुन्हेगार ठरून शिक्षेस पात्र ठरतो आहे. त्यानं आजपर्यंत केलेल्या

गुन्ह्यांबद्दल--ह्या संस्थानाच्या कायद्याप्रमाणें--त्याची पूर्वीची देशसेवा लक्षांत आणून--त्याला ठार मारण्याच्या ऐवजीं--त्यानं कायद्याप्रमाणें -हद्दपार होणं, दंड देणं किंवा अक्षय कैदेंत रहाणं--ह्यांपैकीं एखादी शिक्षा द्यावी असं ठरतं. तरी, संस्थानच्या नियमाप्रमाणं--ह्यांतली कोणची तरी एक शिक्षा भोगण्याबद्दल आरोपीनं अर्ज दिल्यास त्याच्या इच्छेप्रमाणें करण्यांत येईल."

झाली--पुन्हां श्रोतृसमूहांत गिलगिल सुरू झाली. यावर सोमदत्त काय बोलतो तें ऐकण्याकरतां दोन्ही बाजूंचे लोक आतुर झालेले दिसूं लागले. इतक्यांत सोमदत्त मोठ्या धीमेपणानें स्वस्थानावरून उठून उभा राहिला. सर्वत्र शांतता झाली. त्याचें म्हणणें सर्वांनीं मोठ्या शांतपणानें ऐकलें.

"ह्यांपैकीं एकही शिक्षा मला मान्य नाहीं. कारण मी पुरा निर्दोषी आहें. मीं आपल्या तोंडानं शिक्षेची निवड करून पसंती देणं—म्हणजे, आपणच आपल्याला गुन्हेगार ठरवणं आहे. ज्या अर्थीं आपण माझ्या अपराधानुरूप आपण माझ्याकडूनच मला शिक्षा ठरवीत आहांत, त्या अर्थीं आतां मी आपल्याला फार वेळ ताटकळत ठेवीत नाहीं. सावध चित्तानें ऐका. मीं माझ्या गृहकृत्यांकडे सर्वस्वीं दुर्लक्ष्य करून, आज पन्नास वर्षे माझ्या देशबांधवांना सत्याचा उपदेश केला आणि अलीकडे नृपदास्यापासून दूर राहिलों. मान व पदव्या तुच्छ मानून देशहिताकरतांच फक्त आजपर्यंत झटलों. स्वदेशाचं स्वातंत्र्य कायम राखण्याकरतां, निधड्या छातीनं शत्रूशीं बेहद्द लढलों. या सर्व गोष्टी, मीं देशमातेसंबंधाच्या निर्मळ अशा प्रेमानं केल्या. आणि त्यांबद्दल आज न्यायदेवता मला दोषी ठरवते आहे. म्हणून या अशा सर्व अपराधांबद्दल मी आपल्याला अशी शिक्षा ठरवतों कीं, मीं जी ही अशी जन्म-भूमातेची चतुरंग सेवा आजपर्यंत केली आहे, तीबद्दल इतउत्तर--माझ्या प्रभूंनीं माझा सर्व तऱ्हेचा खर्च सोसून, मला या न्यायमंदिरांतला मुख्य न्यायाधीश करून ठेवावं."

"ठीक आहे! तुमचं बोलणं वाजवी आहे. तुमच्या हातून आजपर्यंत

बरीच देशसेवा घडली आहे हें खरें आहे. त्या दगदगीनं तुम्हांला बरेंच श्रम झाले असून सध्यां तुमचा मेंदू बराच क्षीण झाला आहे हेंही खरेंच मानलें पाहिजे. वयोमान आणि देशसेवेची दगदग यांमुळें जीर्ण झालेल्या मेंदूच्या साह्यानं तुमची जीभ—तुम्हांला वाटत नसलेलीं—भ्रामक विधानं करते आहे हेंही खरंच आहे. तेव्हां आतां इतउत्तर, तुमच्या त्या—दगदगीनं कष्टी झालेल्या मेंदूला कायमचीच विश्रांति द्यावी अशी न्यायदेवतेची इच्छा झाली आहे. म्हणून—आजपर्यंतच्या तुमच्या एकंदर सर्व तऱ्हेच्या कर्तबगारीला योग्य असं न्यायाचं बक्षीस देण्याचं ठरवलं आहे. तुम्हांला हालाहल विष पाजून ठार मारावं हें तें योग्य बक्षीस आहे, असं फरमावण्यांत येत आहे."

"न्यायाधीश महाराज, आपल्या आज्ञेनं, मी मरणाची शिक्षा भोगायला नव्हे, तर मृत्यूची परीक्षा घेऊन त्याचं प्रत्यक्ष स्वरूप बघायला तुरुंगांत जातोंच; पण ही शिक्षा मी जन्माला आलों त्याच वेळीं ब्रह्मदेवानं माझ्या मस्तकावर लिहून ठेवली होती, तेव्हां आतां आपल्या आज्ञेची ती अपूर्वता कोणती समजायची! अहो, तुम्हांला असं वाटत होतं काय कीं, मी तुमच्या हातून मोकळा होण्याकरतां इतर सामान्य जनांप्रमाणें तुमचीं आर्जवं करीन, करुणा येण्याजोगीं दीन भाषणं करीन, अथवा शरणागतासारखा फार भिऊन हलकेपणानं तुमच्यापुढें वागेन! छेः खोटी गोष्ट! तुम्हांला कसं वाटत असेल तें वाटो; पण मला तर असं वाटतं कीं, या न्यायमंदिरांत—आत्मरक्षणाकरतां—मरणाच्या भीतीनं—जे अपराधी नसतांही क्षमा मागून आपला जीव बचावतात, ते या भूमातेचे कुपुत्रच होत. ते जिवंत असले तरी पंडित त्यांना मृतवतच मानतात. धन-दौलत, आरोग्य आणि जीवन—ही जी—या माझ्या क्षणभंगुर देहाची संपत्ति—हिचं कोणीही जरी हरण केलं तरी त्यांत माझा कांहींच तोटा नाहीं. कारण शरीराप्रमाणें आत्मा क्षणभंगुर नाहीं. तो अजरामर आहे. औदार्य, सदाचरण, निर्लोभत्व

आणि जन्मभूमातेची खरी सेवा–हीच त्याची खरी संपत्ति आहे. ती त्याच्या संनिध अक्षय राहील. आतां शेवटीं सांगायचं म्हणून इतकंच कीं, या जगावर अम्मल चालविणारी अत्युच्च आणि श्रेष्ठ अशी जी एक अतर्क्य शक्ति आहे तिची इच्छा–माझ्या नाशानं–मी करीत असलेल्या स्वदेशसेवेनं अधिक जोराची उसळी मारावी, अशी आहेशी दिसते. तेव्हां इतउत्तर जगांत मी जिवंत रहाण्यापेक्षां माझ्या मृत्यूनंच माझें अंगीकृत कार्य जास्त फोफावणार आहे, असं ईश्वरी सूत्र स्पष्ट दिसत आहे, आणि म्हणूनच त्याच्या इच्छेला मला अवश्यमेव लीन झालंच पाहिजे."

न्यायाधीश उठून गेले. सोमदत्ताला शिपायांनीं तुरुंगांत नेण्याकरितां गाडींत नेऊन बसविलें व खटला बघण्याला जमलेला श्रोतृवर्ग आपल्या घरोघर जाण्याकरितां न्यायमंदिराच्या बाहेर पडून रस्त्यानें आपापल्या परी आपसांत विचार करित चालत होता. कोणी शोक करीत तर कोणी करुणा भाकीत, कोणी न्यायाधीशासंबंधानं मनःपूत विधानें करीत तर कोणी आनंदातिशयानें उन्मत्त होऊन विजयप्राप्तीच्या गर्वानें फुगलेलीं भाषणें करीत चाललेले लोक पाहून, परस्परविरोधी अशी ही स्थिति बघणाराला कांहीं काळ चमत्कार वाटल्याशिवाय रहायचा नाहीं; परंतु विचाराअंतीं, दोन पक्षांतील जयापजयाच्या वर्गीकरणानें नैसर्गिक अशी न्यायान्यायता जागृत झाली म्हणजे हें असेंच रहाटगाडगें चालायचें, असेंच कोणीही विचार मनुष्य कबूल करील. एका पक्षाला सोमदत्ताच्या शिक्षेनें दुःख झालें व दुसऱ्या पक्षाला आनंद झाला ही गोष्ट खरी; पण सोमदत्तासारखा कर्ता पुरुष आपल्या हातांनीं आपण गमावला ही गोष्ट राष्ट्रावर पुढें जेव्हां आपत्ति आली आणि तींतून निसटण्याचा मार्ग कोणासच सांपडेना तेव्हां राज्याधिकाऱ्यांच्या पूर्ण प्रत्ययाला येऊन सर्वांना मोठा खेद झाला.

# प्रकरण पंधरावें

## जनांतःकरणतरंग.

न्यायमंदिरांत खटला बघण्याकरितां अतर्क्य अशी गर्दी जमली होती. अर्थात् त्या गर्दीत नेहमींच्या वहिवाटीलाच अनुसरून वादी-प्रतिवादी पक्षांची मंडळी होती. त्या मंडळींचीं मतं परस्परविरोधी हीं असायचींच. अशा तऱ्हेचे ते जनान्तःकरणतरंग कशा धर्तीचे परस्परविद्वेषक होते ते बघायचे असतील तर चला—राजधानीच्या एका रस्त्यांतून चालत जात असलेल्या एका टोळींत प्रथम मिसळा, म्हणजे ते त्यांचे विचार तुम्हांला स्पष्ट ऐकूं येतील. ते पहा ते त्या रस्त्यानें दोघे गृहस्थ आपसांत बोलत चालले आहेत त्यांच्या मागोमाग चला म्हणजे झालें.

" शिव शिव! मित्रा वालखिल्या, रत्नाला गारगोटीनं जिंकावं, सूर्याला अक्षयीचं खग्रास ग्रहण लागून काजव्यांची निर्जीव उष्णता घ्यायला जगाची इच्छा व्हावी किंवा कमअस्सल असे राजद्रोही—मातृद्रोही—धर्मद्रोही पुरुष अयोग्यकाळीं भूमातेचं उदर फाडून बाहेर यावे—तशांतलीच ही गोष्ट नाहीं का झाली? खरोखर, सत्याचा खून करून निष्ठुरता आज शांत झाली. ह्या भूमीनं पिशुनपुत्रांना जन्म देऊन न्यायदेवतेचा गळा दाबला. ही भूमाता दुर्दैवानं सत्पुत्रांवर कोपली म्हणूनच अशी ही कुदशा प्राप्त झाली यांत शंकाच नाहीं.

" अरे किराता, इतकंच नव्हे तर निष्कपट प्रेमानं कावळे आणि कोकिळा यांना समभावानंच आश्रय देणारा आम्रवृक्ष जसा मुद्दाम उपटून टाकावा, तशीच ही कसाबाची कृति झाली आहे."

" न्यायाच्या मुसक्या बांधून अन्यायानं सिंहासनाधीश व्हावं किंवा दुष्टांनीं

सद्दीच्या जोरावर अल्पकाळ सुष्टांना जिंकून त्यांचा छल करावा हें सुचिन्ह नव्हे. सोमदत्तासारख्या–सदाचरणी, शांत, निर्लोभी आणि स्वदेशभक्त अशा साधूच्या या अघोर खुनानं–अखेरीस या सबंद राष्ट्राला रक्तबंबाळ व्हावं लागणार आहे.

"मित्रा, आतां विचार करण्यांत वेळ घालवणं बरं नाहीं. होऊं नये तें झालं. आतां पुढच्या विचाराला लागलं पाहिजे."

"अजूनहि सोमदत्ताचे प्राण वांचत असतील, तर तूं मला दिलेली अर्थपतीची दौलत--माझ्या दौलतीसह मी खर्च करायला तयार आहें. इतकंच नव्हे, तर त्या कार्याकरितां मी आपणांला विकून घेऊन, प्राणसुद्धां हवे तर खर्ची घालायला तुझ्या ताब्यांत देतों."

"'आपल्याला अर्थपतीची दौलत काय करायची आहे?' असं तूं मागं एकदां म्हटलं होतंस. त्या वेळीं पुढें तिचा उपयोग होणार आहे असं मीं तुला म्हटलं होतं, तीच ही वेळ. सोमदत्तावर रचलेलं नाटक जेव्हां बघितलं त्याच वेळीं हें मीं ठरवून ठेवलं होतं. तें द्रव्य आतां तुरुंगावरचे अधिकारी फितवण्यांत खर्च कर. आणि मी सोमदत्ताला सुरक्षितपणें कसा पळवावा याची व्यवस्था करतों."

"द्रव्याला कोण भुलणार नाहीं ? एक सोमदत्तच ! तूं सांगितल्याप्रमाणें आतां फितुरी करून आपला उद्देश सोमदत्ताला कळवतों; पण तो जर आपल्या म्हणण्याप्रमाणें कबूल झाला नाहीं तर ?"

"तर काय--नशीब ! बहुतकरून तुझी ही शंका खरीच ठरणार आहे; कारण, न बघितलेली वस्तु बघण्याची लालसा ही प्रत्येकाला असतेच. त्यांतून सोमदत्तासारख्या ज्ञात्याचं तर काय ? मरण्याचं प्रत्यक्ष स्वरूप बघण्याची त्याची नेहमींची खटपट. आपल्या ठरलेल्या बेताप्रमाणें जर घडून आलं नाहीं, तर तुला सांगून ठेवतों, ह्या सर्व कृत्याचं शोकरसपूर्ण नाटक जगाला दाखवून शत्रूंना त्यांच्या कुलांसह दुःखार्णवांत गटंगळ्याच खायला

लावीन. सोमदत्तरूप सत्यमूर्तीचा खून झालेला पाहून, प्रेक्षकवर्गाच्या नेत्रां-तून वहाणाऱ्या उष्ण अश्रुपातानं--ही भूबाला भाजून करपली म्हणजे माझा कार्यभाग झाला असंच मी समजेन.''

वाचकहो, या जोडीनें ठरविलेलें काम तिला करायला जायला सोडून आपण आतां त्या पलीकडच्या रस्त्यानें--एक जोडी ती पहा मोठ्या गर्वो-द्धतेच्या गप्पा जोराजोरानें मारीत चालली आहे, तिच्या पाठोपाठ जाऊं. परान्नपुष्ट कपोताप्रमाणें ते आपसांत काय बढाया मारताहेत त्या आतां ऐका!

"राजपक्षाची किंमत जास्त कीं प्रजापक्षाची जास्त, हें तर आज स्पष्ट-पणें निदर्शनाला आलं!"

"अहो राजपक्षापुढें प्रजापक्ष करणार काय! न्यायदरबारांत सोमदत्ताचा खटला चालला असतांना आंतबाहेर लोकांची केवढी गर्दी! पण करणार काय? बंड करणार होय? सैनिकांचे भाले चमकल्याबरोबर सगळं शांत!''

"आपण राजमंडळाला आधींच तशी सूचना करून ठेवली होती, म्हणून बरं झालं, नाहीं तर एकच धुमाकूळ माजला असता!''

"अशा तऱ्हेनं प्रजापक्षाचा म्होरक्या—कैवारी आपण, सरकाराकडून, आज जरी या जगांतून अजिबात उडवला आहे, तरी अजून आपल्या रस्त्यांत त्याचे बरेच दोस्त-भगत--चेले आडवे येणारे आहेत. त्यांनाही असेच हलके हलके उडवले पाहिजेत. त्याशिवाय आपला मार्ग बिनधोक होणं शक्य नाहीं.''

"फक्त तीनच मतांचा फरक पडला, हें आमचं नशीब. हीं मतं सोमद-त्ताच्या बाजूला पडतीं तर तो साफ दोषमुक्त झाला असता."

"आणि आम्हांला खालीं माना घालाव्या लागल्या असत्या.''

"ह्याचंच नांव सद्दी. ह्याच सद्दीच्या जोरावर एकदां--किरात, वाल-खिल्य वगैरेंना उडवले, कीं झालं आपलं काम.''

"लेकाचा म्हणतो कीं, सध्यांची राज्यपद्धति अरेरावीची आणि अधिकारमदाच्या जोराची आहे. आहे खरी; पण ती सुधारण्याचे आमचे जे उपाय चालले आहेत ते ह्याला कां पसंत पडूं नयेत?"

"ज्या राजमंडळाच्या हातीं सध्यां सत्ता आहे त्याच्याशीं विरोध करायचा तो आपल्या वाचेंत, लेखांत किंवा कृतींत आमच्यासारखा पोटांत घुसून काम करून घेण्याचा पाहिजे."

"सर्व सत्ताधिकाऱ्यांशीं, ज्यांच्याजवळ सैन्याचंच काय, पण प्रत्येक गोष्टीचं पूर्ण पाठबळ आहे त्यांच्याशीं--अशा तऱ्हेचं उच्छृंखलपणाचं वर्तन काय उपयोगाचं! क्षणांत चिरडावं लागतं!"

"अखेर सोमदत्त चिरडलाच कीं नाहीं?"

"तो चिरडायला आपण दोघे कारणीभूत झालों, असा आतां सर्वत्र गवगवा होणार आहे."

"उं: त्यांत काय आहे! जोंपर्यंत आपल्याला राजमंडळाचं पाठबळ आहे, तोंपर्यंत सोमदत्ताच्या पक्षपात्यांची पर्वा करण्याचं आपणांला बिलकुल कारण नाहीं!"

"सोमदाच्या पक्षाचं किंवा आमच्या पक्षाचं अंतिम साध्य जरी एकच असलं, तरी आमचा पक्ष श्रीमान आहे; सोमदत्ताचा दरिद्री आहे. आमच्या पक्षांत सर्व सुशिक्षित आहेत. त्याच्यांत सर्वच बहुतेक अशिक्षित."

"आपल्याला जो मोठा फायदा आहे, तो हाच. आमचे पक्षपाती सर्वच ज्ञानी असल्यामुळें एकाची जागा दुसऱ्याला पटकन् भरून काढतां यइल; सण सोमदत्तासारखीं त्याच्या पक्षांतलीं हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकीं अल्पसंख्याक माणसं--एकदां कां एकामागून एक उडवलीं, कीं तो पक्ष थंडावलाच म्हणून समजा."

"अगदीं खरं. सोमदत्त म्हणजे विद्वत्तेंत, बुद्धींत, ज्ञातेपणांत—आमच्यापेक्षां एक कडी वरच आहे खरा. खरी असो अगर खोटी असो—कोणचीही

गोष्ट आपल्या म्हणण्याप्रमाणेंच भासवण्याची त्याची हातोटी आम्हांला कधींच साधणार नाहीं. पण उपयोग काय ? त्याचा नाश व्हायला मुख्य कारण त्याचा हट्टवादीपणाच त्याला बाधला ना ? आमच्या पक्षाशीं तो जर समेटानं राहिला असता तर आज त्याला या जगांतून नाहींसं होण्याचा कधीं तरी प्रसंग आला असता काय ?"

"असो. अपूर्वसेन, चला आतां त्याच्या हट्टवादीपणाचं त्याला योग्य प्रायश्चित्त मिळालं. अशिक्षित वर्गांत त्यानं आपल्या वाक्चातुर्यानं उडवलेली खळबळ आतां पार रसातळाला गेलीच म्हणून समजा !"

"वृषसेन, तुमचं हें म्हणणं अगदीं खरं आहे. सोमदत्तानं उठवलेल्या प्रचंड वादळानं आमचं राजकारणाचं तारूं जें भोंवऱ्यांत सांपडलं होतं तें—आतां दर्या शांत झाल्यामुळें बिनधोक परतीराला लागणार आहे."

याप्रमाणें परस्परविरोधी असा दोन्ही पक्षांच्या अध्वर्यूंचा भाषणचमत्कार आपण ऐकला. आतां सोमदत्ताची तुरुंगांत काय स्थिति आहे ती जाऊन पाहूं या.

---

## प्रकरण सोळावें

# 'आनंदलोकाला जाईन.'

"सोमदत्ता, ज्ञात्यानं पापावांचून इतर कशालाही भिऊं नये, याचं कारण काय त्याचं प्रत्यक्ष स्वरूप आज तूं दाखवलंस ! तुझ्या पवित्र आचरणानं—निर्मळ धारिष्टाची पताक फडकावली. अनेक वर्षं मिळवलेल्या प्रतिष्ठेची एका क्षणांत राखरांगोळी होते, ती न होऊं देण्याचा सरळ रस्ता आज तूं निर्भीडपणें जगाला दाखवलास. जीं कांहीं वर्षं आपण पुढें जगूं

असं आपल्याला वाटतं—ती आशा सोडून, खऱ्या पंडिताप्रमाणें, तूं मरायला तयार झालास हेंच ठीक झालं. खरं पाह्यलं असतां, द्वेष आणि मत्सर या दोन रोगांनीं, सध्यां लोकांचे डोळे विकृत झाले आहेत. त्यामुळेंच त्यांना तुझी परीक्षा होत नाहीं. तुझी पारख त्यांना तुझा मृत्युच करून देणार आहे. म्हणून, सूर्याप्रमाणें खुशाल अस्ताला जाऊन आपले कीर्तिरूप किरण मागें ठेव."

"मनोरथ महाराज, आपले शब्द या हृदयाला अमृताप्रमाणें मधुर लागले. आपल्या ह्या आजच्या दर्शनानं मला प्रत्यक्ष गंगास्नान झाल्यासारखं वाटलं. आपल्यापुढें नमन करायला मनांत प्रेम दाटलं आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें मी हालाहल विष प्राशन करून शांतपणानं आनंदलोकाला जाईन."

शिव शिव! कोण हा घोर प्रसंग! खरें बघितलें असतां सोमदत्ताचे प्राण या वेळीं वांचणें त्याच्याच हातीं होतें; परंतु वरील त्याचा जो यक्षाशीं संवाद झालेला आपण ऐकला, त्यावरून विषप्राशन करून आनंदलोकाला जाण्याचाच त्याचा दृढनिश्चय झालेला दिसतो. कसें म्हणावें तर पहा! तुरुंगावरचे सगळे अधिकारी किरातानें फितुर करून तो तेथें स्वतः याच संधीस--म्हणजे--यक्ष अंतर्धान पावण्याच्या वेळीं आला होता. त्यानें त्याला मिथिला नगरीला अगदीं गुप्तपणें नेण्याची चोख व्यवस्था करून ठेविली होती. इतकेंच नव्हे तर सोमदत्ताच्या निर्दोषित्वाबद्दल खूष होऊन तुरुंगाचे दरवाजेसुद्धां आपले मिटलेले जबडे सताड उघडून त्याला सोडून द्यायला या वेळीं अगदीं तयार होऊन बसले होते. परंतु किराताच्या म्हणण्याप्रमाणें न वागतां यक्षाज्ञाच खरी करण्याचा त्यानें संकल्प केला असल्यामुळें-किरात, वालखिल्य वगैरे सर्वांची कशी निराशा झाली, हें पुढील संभाषणावरून समजेल.

"किराता, जिवंत रहाण्याच्या आशेनं, इथून बिगरपरवाना पळून

जावं म्हणतोस? ठीक आहे! पण मला आधीं असं सांग कीं, जिथें लोक मरत नाहींत अशी या पृथ्वीवर आपल्या देशाच्या बाहेर एखादी जागा तुला ठाऊक आहे काय?"

"ह्या वेळीं माझी गोष्ट ऐकलीच पाहिजे. ही सोन्यासारखी संधि दवडतां उपयोगी नाहीं. माझ्यापाशीं मुबलक पैका असतांना, मी जर माझ्या मित्राचा जीव वांचविण्याची खटपट केली नाहीं, तर भर-रस्त्यांत माझी छीः थूः होईल! तुम्ही जर जिवंत नसाल, तर–घर, स्वातंत्र्य, प्राण--यांचा आम्हांला काय उपयोग! तुमचा जीव वांचवण्याचं यश आम्ही परदेशच्या लोकांना काय म्हणून घेऊं देऊं?"

"किराता, या माझ्यावरच्या तुझ्या इतक्या ममतेबद्दल तूं स्तुतीला पात्र आहेस. माझे जीव वांचवण्याबद्दल तूं जी कळकळ दाखवतो आहेस, तीबद्दल तुझे माझ्यावर उपकार आहेत. इतकं जरी आहे तरी, इथून पळून जाणं माझ्या प्रामाणिकपणाला उचित नाहीं."

"अन्यायाची शिक्षा भोगून न्यायाला ठार बुडवावा हें तरी योग्य आहे का? अनपराध्याचा खून दृष्टीसमोर होत असतां, तो न होऊं देणं आपल्या हातीं असून तिकडे दुर्लक्ष करणं, हा सदाचरणी माणसाचा धर्म आहे का?"

"या प्रश्नाचा उलगडा तुरुंगांतून पळून जाण्यानं व्हायचा नाहीं."

"मग इथें अनपराधीपणांत मरण्यानं होईल का?"

"तर मग अपराधी होऊन मरणं चांगलं असं का तुझं म्हणणं आहे?"

"काय वाटेल तें म्हणा! आपल्या बायकापोरांच्या हिताकडे पहा. पंडितपणाचा लौकिक मिळविण्याकरितां तुम्हांला बापाचा धर्म मुळींच सोडतां येत नाहीं."

"मी तुरुंग सोडावा असं जर तूं सिद्ध करून दाखवलंस तर मला फार आनंद होईल. किराता,—

ओव्या.

**अन्यायाचें कर्म । करावें हा मानवी धर्म । सदाचरणाचें हें वर्म । जाण बाप्पा ॥ १ ॥ अन्यायीं नच कल्याण । त्यांत दुष्कीर्ति जाण । आपुला नियम सदाचरण । जाण बाप्पा ॥ २ ॥ एक मत नसे अर्भका । होय नाहीं तें वदे फुका । आपणां हें योग्य हो का । सांग बाप्पा ॥ ३ ॥**

दुसरं असं–आपल्याला जे उपद्रव देतात त्यांना आपण छळणं हें अगदीं अयोग्य आहे. स्वहितासाठीं वचनभंग करणं यासारखं दुसरं दुष्कर्म नाहीं. मी जर बिगरपरवाना तुरुंग सोडायला तयार झालों, तर संस्थानचे सगळे कायदे एकत्र होऊन माझ्यापुढें दत्त म्हणून उभे राहतील. ते मला म्हणतील कीं, "सोमदत्ता, तूं हा काय अन्याय करतो आहेस? न्यायाला भिऊन तुरुंगांतून पळून जातोस? तुझं पलायन आम्हांला सर्वस्वीं ठार बुडवणारं आहे हें पक्कं लक्षांत ठेव. अशा तऱ्हेनं न्यायाच्या प्राबल्याचा खून झाला तर संस्थानाला थारा रहाणार नाहीं."–या राज्याचं सरकार न्यायाचा खून करणारं आहे, म्हणून मी हें सोडतों,–असं मी त्या कायद्यांना उत्तर देईन; पण ते त्यावर म्हणतील कीं, "न्यायमंदिरांत होणारा इन्साफ आज जरी तुझ्या मताविरुद्ध असला, तरी–सरकारच्या न्यायाप्रमाणं मी वागेन–अशी जी तुझी सरकारापाशीं शपथ आहे ती तूं मोडणार काय? तुझ्यावर झालेल्या खटल्याला भिऊन तूं आपली राजनिष्ठा रसातळाला नेणार काय? ह्या संस्थानांत तूं सत्तर वर्षं राहिलास, यावरून इथले कायदे तुला पसंत आहेत असं सिद्ध होतं. स्वतःच्या फायद्याकरतां तूं आपल्या आईबापांशीं त्यांच्या मताविरुद्ध वागशील काय? तुझ्या मताप्रमाणें–तुझ्या देशानं जरी तुला पीडा दिली–तो तुझ्याशीं अन्यायानं वागला–त्यानं तुला ठार मारला--तरी तें सर्व तुझ्या चांगल्याकरतांच होत आहे असं समज. कारण, तो तुझा राजा आहे, ती तुझी जन्मभूमि आहे. फार झालं तर तूं त्याची फार

विनयानं कानउघाडणी कर. शहाणपणाच्या चार गोष्टी शिकवून त्याला शुद्धीवर आण. शुद्धीवर न येईल तर निमुटपणें अज्ञा मान. जन्मभूमीची योग्यता फार मोठी आहे. तिची योग्यता--आईबाप, गणगोत, मित्र--यां-नाहि नाहीं. म्हणून तिची वाटेल ती आज्ञा मानली पाहिजे. बायकांमुलां-बद्दल जर काळजी असेल, तर तुझे मित्र आहेत. ते त्यांचं रक्षण करतील, त्यांच्या हिताला झटतील. हें जरी घडलं नाहीं, तरी त्यांचं रक्षण देव करील; कारण तो विश्वंभर आहे. त्यांची तू काळजी करूं नकोस.''--अशा तऱ्हेनं न्यायावर भार ठेवून राहिलं म्हणजे मरणानंतर, यमदरबारांत होणाऱ्या चवकशींत कृतकर्मांचीं उत्तरं द्यायला अडचण पडत नाहीं. यमदरबाराचे कायदे इथल्या कायद्यांचे नातेवाईकच आहेत. इथल्या कायद्यांचा जर उप-मर्द झाला तर, परलोकचे कायदे क्रुद्ध होऊन, अति प्रखर शासन करतात; अनुग्रह कधींच करीत नाहींत. म्हणून इथले कायदे पाळलेच पाहिजेत. दुसरं अस पहा कीं, जे हात मागें अनेकदां या भूमातेचं स्वातंत्र्य रक्षण करण्याकरितां शत्रूच्या रक्ताचे सडे घालायला पुढें सरसावले आणि जे त्या स्वदेशसेवेचीं बक्षिसें घेण्याकरितां कधींच मागें हटले नाहींत--त्याच हातांत तीच भूमाता जर आज विषाचा पेला देते आहे, तर त्यांनीं माघार काय म्हणून घ्यावी? किराता, माझं म्हणणं तुझ्या मनाला चांगलंच ठसलं असं दिसतं.''

"सोमदत्त, तुम्हीं तर मला अगदींच निरुत्तर केलंत. तुमचं बोलणं वास्तविक आहे अशी माझी खात्री झाली. हा पहा आपला मित्र वाल-खिल्यच तुम्हांला भेटायला आला.''

"कां, कसं काय? मित्रा सोमदत्ता, चलायचं ना?''

"होय, निघण्याच्याच तयारींत आहें.''

"सर्व व्यवस्था अगदीं चोख केली आहे. कैंसालाही धक्का लागा-यचा नाहीं.''

"केस जर बरोबर यायचेच नाहींत, तर त्यांना धक्का कसा लागणार?"

"म्हणजे काय?"

"परलोकच्या प्रवासांत, या मृत्युलोकचं कांहींच बरोबर घ्यावं लागत नाहीं."

"वालखिल्य, माझी शंका खरी ठरली. सोमदत्तांनीं मला निरुत्तर केलं. मरणाला भिऊन पळून जाणं अयोग्य ठरलं."

"सोमदत्त, खऱ्या पंडितानं मरण्याची इच्छा करणं आणि तें प्राप्त करून घेण्याकरतां श्रम करणं योग्य आहे काय?"

"अगदींच अयोग्य! कारण, ईश्वरच प्रत्यक्ष मूर्तिकार होऊन मनुष्याची मूर्ति तयार करतो. म्हणून तो त्याला ज्या अवस्थेंत ठेवील त्या अवस्थेंत त्याला रहाणं प्राप्त आहे. त्याची ती आज्ञा मोडतां उपयोगीं नाहीं. त्याच्या आज्ञेवांचून कोणालाही हा लोक सोडतां येणार नाहीं, हें मी तुम्हांसारख्यांना सांगावं असं नाहीं."

"ही गोष्ट सर्व मनुष्यप्राण्यांविषयींची असतांना एकट्या पंडितालाच मरण्याची आवड असायचं कारण काय?"

याचं कारण एकच आहे. आत्मा नित्य आहे अशी त्याची ठाम समजूत झालेली असते. म्हणूनच त्याला परलोकगमनामध्यें अतुल अशी सुखाशा असते. आत्मा नित्य आहे याविषयीं मी ज्या प्रमाणांचा उपन्यास आज इतकीं वर्षें जगांत केला—तीं जरी खोटीं ठरलीं तरी हें मत अंगिकारल्यापासून मला इहलोकीं मोठा लाभ होईल."

"आत्मा अनित्य आहे असं कां म्हणतां येणार नाहीं?"

"तो जर अनित्य असता तर दुष्ट मोठे दैववान झाले असते. सदाचरण आणि दुराचरण हा भेदच मग राहिला नसता. कां तर मनुष्य मेला म्हणजे त्याबरोबर तो आपलं शरीर, आत्मा आणि पातकं—ह्या सर्वांपासून मुक्त होणार! पण ज्या अर्थी आत्मा नित्य आहे त्या अर्थी सदाचरण केल्या-

वांचून स्वकृत पापांपासून मुक्त होण्याला दुसरा उपायच नाहीं."

"मग, देह ही काय चीज आहे?"

"तो एक तुरुंग आहे. त्यांत पूर्वजन्मीं केलेल्या पापपुण्याचे भोग भोगावे लागतात."

"तुमच्यासारख्या पंडितांपुढें वाद करायला आम्ही कितीसे टिकणार! आम्ही अगदीं निरुत्तर झालों!"

"सुज्ञ पुरुष शुद्धाचरणानं अशा तऱ्हेनं या देहरूप कारागृहांतून सुटून गेल्यावर देवलोकीं जातात. देव त्यांचा तेथें सत्कार करतो. ते विद्येनं पवित्र झालेले असतात, म्हणून त्या लोकीं ते निःशरीर असे वास्तव्य करतात, आणि ज्या आनंदाचं वर्णन करणं शक्य नाहीं अशा आनंदांत निमग्न होतात आतां या वेळीं त्याचं विशेष विवरण करायला अवकाश नाहीं, त्याला इलाज नाहीं."

"झालं इतकं विवरण पुरे झालं. आत्मा नित्य आहे अशी आमची खात्री झाली. तुम्हांला इथून पळवून नेण्याचा युक्तिवाद साफ चुकीचा ठरला. तुम्हांला देवलोकीं आनंद होवो."

या वेळीं सोमदत्ताची एकदम समाधि लागल्यासारखें दिसूं लागलें. किरात व वालखिल्य तेथून उठून पुढील कांहीं गोष्टीसंबंधानें बंदोबस्त करण्याकरितां बाहेर निघून गेले.

# प्रकरण सतरावें

## हालाहलप्राशन!

"मी—मी म्हणजे कोण? हा देह नव्हे. मी जो कोणी आहें तो जसा या देहरूप कारागृहांत आपखुषीनं बंदीवास घेऊन राहिलों आहें, तद्वतच, हा देह ह्या संस्थानच्या ह्या कारागृहांत अंमलदारांच्या हुकुमानं कोंडला गेला आहे. खरं पाहिलं असतां, मनुष्यप्राण्यानं, क्षणमात्रही हयगय न करितां, जन्मभर सद्गुण आणि सद्विद्या हीं प्राप्त होण्याविषयीं आणि आमरण देशसेवा करण्याविषयीं झटलं पाहिजे. ह्याच गोष्टी मीं आजपर्यंत अविश्रांत श्रमानं केल्या असल्यामुळें मला किती तरी समाधान वाटत आहे! स्वदेश आणि स्वबांधव, स्वधर्म आणि पावित्र्य, स्वदेशसेवा आणि स्वधर्मनिष्ठा, या गोष्टींबद्दल मला अभिमान वाटतो. सद्यःकालीं, माझ्या चरित्राचंच जर माझ्या देशबांधवांनीं पूर्ण निरीक्षण करून त्यावरून कांहीं बोध घेतला, तर खचित मी आपल्याला मोठा भाग्यवान् समजेन. केव्हांहि मी असं स्पष्ट सांगूं शकेन कीं, आत्मा नित्य मानून, सदाचरणानं स्वदेशसेवा करण्याचं धाडस करण्यांतच जी प्रतिष्ठा आहे ती दुसरी कशांतही नाहीं. जगन्नायकाच्या आज्ञेनंच मीं आजपर्यंत आपलं आयुष्य पवित्राचरणांत खर्च केलं; आणि आतां तरी मी हालाहल विषाचा प्याला त्याच्याच आज्ञेनं पिणार आहें. अशा या येन्ही गोष्टी त्यानंच मला करायला सांगितल्या आहेत. हे पहा—हे माझे मुलगे शरच्चंद्र आणि वसंत इकडेच मला भेटायला येत आहेत. त्यांच्या आणि माझ्या आत्म्यांचा एकच भाव आहे, पण देह मात्र भिन्न आहेत."

याप्रमाणें सोमदत्त तुरुंगांत आत्मगत विचार करीत बसला असतां,

तेथें त्याला भेटण्याकरितां, शरचंद्र आणि वसंत हे दोघे आले. तेव्हां त्या तिघांत पुढीलप्रमाणें मोठें मनोरंजक भाषण झालें.

" बाबा, आम्ही तुमच्या पायां पडतों. तुम्ही आम्हांला सोडून कोठें चाललांत तें सांगा! दुःखानं आमचीं मनं अगदीं करपून गेलीं आहेत. सांगा तुम्ही कोठें जाणार तें?"

" शरचंद्रा, वसंता, मी आतां परलोकच्या प्रवासाला निघणार आहें. हें पहा—परलोकीं जाणं म्हणजे कीं नाहीं, या कमळावरचा भुंगा याला सोडून दुसऱ्यावर जाऊन बसतो कनी—त्यांतलाच प्रकार! तुम्ही, हे तुमचे अंगरखे फाटले म्हणजे हे टाकून देऊन नवे घालाल ना? तसंच जीवाचं आहे. ही आपली कुडी आपल्या जीवाला नकोशी झाली म्हणजे तो नवी धारण करतो. आतां माझा जीव तरी तसंच करणार आहे."

" बाबा, तें तसं कुठें होणार आहे?"

" आकाशांत."

" अबब! किती तरी लांब तुम्ही जाणार!"

" वसंता, त्याची नको तुला काळजी? ह्या राज्यांतले-न्यायाधीश मोठे दयाळू आहेत. त्यांनीं जेव्हां आपल्या बाबांना परलोकीं धाडायचं ठरवलं, तेव्हांच—हालाहल नांवाचं एक पक्वान्न, सरकारी खर्चानं—फराळाच्या पदार्थांच्या ऐवजीं—त्यांच्या बरोबर देण्याचं ठरवलं आहे."

" अहाहा! ही असली थोरबुद्धि आणि पोरवयांतलं समाधान! आनंद! फारच आनंद! आज माझा आत्मा तृप्त झाला."

" बाबा, मला न्याल का बरोबर?"

" वसंता, आपण बाबांच्यासारखी सदाचरणानं देशसेवा केली—म्हणजे या राज्यांतले दयाळू न्यायाधीश आपसुखाच आपल्याला तिथें नेऊन पोंचवतील. मग नाहीं का तिथें आपली न् बाबांची भेट होणार?"

" तोंपर्यंत आपण इथें एकटे रे कसे राहूं?"

" अरे, तुमचा धाकटा भाऊ हेमचंद्र आहे ना तुमच्या दोघींच्या सोब-तीला? व तुमचं रक्षण करायला किरातकाका आहेतच."

" वसंता, बाबांनीं सांगितलेलं अगदीं खरं आहे! बाबांच्यासारखं सदा-चरणानं वागून आपण भगवंताला शरण गेलं म्हणजे तोच आपली सोबत करून आपलं रक्षण करील!"

" बाळांनो, तुमच्यासारखीं संतोषी, समजुतदार आणि वडिलांचं ऐकून विचारानं वागणारीं मुलं—कुलदीपकच होत. तुमचं वय लहान, पण बुद्धि थोर आहे. सद्गुण आणि सद्विद्या मिळवायला अंतःकरणपूर्वक झटा; लबाडी लपांडी, हांजीहांजी आणि नास्तिकपणा यांपासून अलिप्त रहा. नैसर्गिक न्यायानं देवाला भिऊन वागा आणि त्याप्रमाणें दुसऱ्यांना वागण्याचा उप-देश करा. सरकारी अंमलदारांच्या—उद्दाम, अहंपणाच्या, आपमतलबी व अदूरदर्शी वागणुकीची पुराव्यासह सत्यासत्यता, जगाच्या निदर्शनाला आ-णायला कचरूं नका. तसं करण्यानं माझ्यासारखी तुमची स्थिति झाली तरी बेहेत्तर आहे. तुम्हीं आपल्या बापाचं नांव त्यांतच राखलं असं होणार आहे. त्या पहा तुमच्या आया! हेमचंद्रासह इकडेच धाय मोकलीत येत आहेत. त्यांचं समाधान तुम्हीच करा."

" हाय रे दैवा!" विजया रडत रडत येत असतां म्हणाली.

" काय हा प्रसंग आणलास? आजपर्यंत खऱ्या पातिव्रत्यानं आम्ही वागलों त्याचं हेंच कां बक्षीस? अशा तऱ्हेनं आमच्या पतीला मारून तूं अन्याय कां करतोस?"

" आमचं दैव अशा तऱ्हेनं जरी फिरलं, तरी आमच्या पातिव्रत्याकडे बघून देवानं आमचं साह्य कां करूं नये?" इतकें बोलून मदिरेनें आपला मुलगा हेमचंद्र याकडे पाहिलें व ती म्हणाली " देवा, या हेमचंद्र अर्भ-काची दया येऊन तरी धाव आतां!"

" अग मदिरे, तो देव इतका निष्ठुर झाला आहे कीं, आपल्या ह्या

डोळ्यांतले दुःखाश्रु त्याच्या पदकमलांना चटके देत असतांही तो न्याय करायला जागा होत नाहीं! हें आपलं दुर्दैवच न् दुसरं काय?"

एणेंप्रमाणें–मंदिरा व विजया यांनीं बराचसा शोक केल्यावर त्यांच्या-जवळ जाऊन शरच्चंद्र त्यांना उद्देशून म्हणतो:—

"आई, जरा शांत व्हा. शुद्धाचरणानं वागण्याची जशी मर्यादा आहे, तद्वतच ह्या जगांत जगण्याचीही आहे. आजपर्यंत बाबा सदाचरणानं वागले, व फलाची इच्छा न धरतां त्यांनीं स्वकर्तव्य केलं. या कारागृहरूप गलिच्छ शरीरांतून सुटून त्यांना जें आतां देवलोकीं जायला सांपडतं आहे तें त्यांच्या पवित्र आचरणाचंच फल आहे. तेव्हां अशा त्या त्यांच्या बक्षी-साच्या आड यायला आपला काय बरं हक्क आहे?"

वसंत म्हणतो "दुसरं असं कीं, सदाचरणी आत्मा देवलोकाला जातो, आणि पापभ्रष्ट नरकांत पडतो–असंच बाबांनीं आम्हांला शिकवलं आहे. आमचे बाबा सदाचरणानं पवित्र झालेले आहेत. आतां ते आनंदलोकाला जायला निघाले आहेत. त्यांच्याचसारखं वागून आपण देवलोकाला जाऊं. तिथें आपल्याला आमचे बाबा भेटतील."

"बाळांनो, तुमचीं वयं लहान असून, तुम्ही मोठया पंडितासारखा आम्हांला उपदेश करतां हें पाहून मोठं समाधान होतं. त्यांना तुमच्या म्हणण्याप्रमाणं आनंदानं खुशाल देवलोकीं जाऊं द्या. आतां आमचं बाकी असलेलं आयुष्य–तुमचंच वचनामृत पिऊन–आम्हीं घालवूं!"

याप्रमाणें विजया बोलते आहे तोंच एक शिपाई तेथें आला. व "महाराज, वेळ झाली! बायांनो, मुलांनो, तुम्ही आतां आटपा–इथून बाहेर चला! सरकारी हुकमानं ठरलेली वेळ संपली. चला आतां इथून!" असें म्हणाला. तेव्हां तेथील मंडळींत व त्या शिपायांत पुढीलप्रमाणें संभाषण झालें.

"शिपाईबाबा, एक वेळ आतां शेवटची ही मूर्ति पोटभर पाहूं द्या हो!

पुन्हां आतां नाहीं दृष्टीस पडणार!"

"साधूचं अखेरचंच हें दर्शन!"

"साधू हें नांव आज आतां या मृत्युलोकांतून पार चाललं! साधूच्या संसाराचा आज मोक्ष झाला!"

"सूर्याला राहूनं अखेरचं ग्रासलं!"

"जा—आतां तुम्ही सर्वजण इथून जा! मी तुम्हां सर्वांना अखेरचा निरोप देतों. सदाचरण, न्याय, प्रामाणिकपणा, जन्मभूमिवात्सल्य आणि देशसेवा करण्यांत यत्किंचितही हयगय करूं नका! माझा तुम्हांला पूर्ण आशीर्वाद आहे. कुळाचं नांव योग्य तऱ्हेनं राखा!"

शरचंद्र, वसंत, विजया आणि मदिरा—हेमचंद्रासह—याप्रमाणें सोमदत्ताचा निरोप घेऊन तेथून मोठया जड अंतःकरणानें आपल्या घराकडे निघून गेल्यावर, सोमदत्ताचें अखेरचें दर्शन घेऊन त्याची शेवटची इच्छा ऐकण्याकरितां, त्याचे मित्र--किरात आणि वालखिल्य--हे तेथें आले व ते दोघे आणि सोमदत्त यांमध्यें जें भाषण झालें तें येणेंप्रमाणें:---

"आतां, पुढची व्यवस्था काय? आपण तर असे अन्यायानं मृत्युमुखीं पडणार!"

"किराता, हें गोश्रृंगाचं सरकार, माझ्यावर हा मोठासा जुलूम करतें आहे असं नाहीं. हें सरकार—मला आनंद लोकाला जायला हा मृत्युरूप मार्ग खुला करून देत आहे, असंच मला वाटतं. आपण एकदां हा लोक सोडला म्हणजे आपल्या आत्म्याला दोन मार्ग लागतात. एक मार्ग असा कीं, ज्या मार्गानें जे जीव कुत्सित अशा विषयादि सुखांत लोलुप होऊन, इहलोकीं मोठमोठीं पापकर्मं करतात आणि आपणांस भ्रष्ट करून घेतात, ते नरकांत पडतात. आतां, दुसरा जो मार्ग आहे त्यानं, जे जीव-एथें पृथ्वीवर सदाचरण करतात आणि आपला पवित्रपणा रक्षण करतात, ते सुखमय अशा देवलोकाला जातात."

" सोमदत्त, आपल्याला आपल्या मुलांबाळांविषयीं, दुसऱ्या मित्रां-करितां आणि कांहीं घरगुती कामासाठीं कांहीं सांगायचं आहे काय? सांगा-यचं असेल तर सांगा, म्हणजे हीच तुमची शेवटची आज्ञा तुमच्या मना-प्रमाणें बजावून, तुमच्या मर्जीप्रमाणें वागल्यानं तुम्हांला संतुष्ट केल्यासारखं होईल. व आमच्या चित्ताचं त्यायोगें समाधान होऊन आम्ही शांत होऊं!"

" बाबांनो, आजपर्यंत जें मी तुम्हांला सांगत आलों, त्यापेक्षां अधिक असं कांहींच सांगायचं राहिलं नाहीं. आपणांला चांगलं जपा म्हणजे झालं. असं करण्यापेक्षां मला संतोष वगैरे द्यायला दुसरा कोणचाच मार्ग नाहीं.

वालखिल्य म्हणतो—" बरं आतां आपणांला मूठमाती कशी काय द्यावी?"

" वालखिल्य, तुमच्या मर्जीस येईल तशी द्या! पण हातांतून निसटून जाऊं न देतां तुम्हांला जर मला पकडतां आलं तर!" हंसत हंसत सोमदत्त पुन्हां पुढें म्हणतो " काय करावं! तुमच्याजवळ जो कोणी बोलतो आहे तो व जो आपल्या भाषणाच्या निरनिराळ्या रचना करतो आहे तो सोम-दत्त आहे—हें हाडामांसाचं शरीर सोमदत्त नव्हे—ही कल्पना मला अजून तुम्हां दोघांच्या मनांत भरवून देतां येऊं नये, त्याला इलाज नाहीं. तुम्हांला सर्वदां असं वाटतं कां—कीं, अंमळशानं जमीनीवर मरून पडणारा जो हा देह तोच सोमदत्त! वेड्यांनो, मला हाडामांसाचा गोळा समजून कशी काय मूठमाती द्यावी म्हणून काय रे विचारतां?"

हें बोलणें चाललें असतां तेथें एक शिपायी स्फुंदत स्फुंदत आणि हातांत विष भरलेला पेला घेऊन आला व म्हणाला " महाराज, विषप्राशनाची वेळ झाली. आपल्यासारख्या महात्म्याला विषाचा पेला आणून देण्याचं माझ्या नशीबीं यावं, यावरून मी मोठा पातकीच आहें यांत संशय नाहीं. क्षमा असावी. राजाज्ञा बजावलीच पाहिजे."

" खरंच शिपाया, तूं फारच सुजन आहेस. किरात, वालखिल्य, हा शिपाई—मी कैदी झाल्यापासून—मला भेटायला आणि माझ्याशीं बोलायला

वारंवार येतो. ह्याच्या बरोबरीच्या सर्व कामगारांत हा फारच योग्य आहे. बिचारा माझ्यासाठीं मनापासून रडतो आहे. अशा चाकराची ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ज्यांना ह्या शिपायासारखीं कामं असतील त्यांनीं सामान्य कैद्यांशीं आणि प्रसंगवशात् थोर माणसं त्यांच्या ताब्यांत आलीं असतां, विशेषेंकरून त्यांच्याशीं आपण कसं वागावं हें या शिपायाच्या वागणुकीवरून शिकण्यासारखं आहे. असो. अरे दुःखी शिपाया, हें प्याल्यानंतर मीं काय केलं पाहिजे ?"

"कांहीं नाहीं. हें प्याल्यानंतर इकडे तिकडे हिंडावं. पायांत पेटके येऊं लागले म्हणजे अंथरूणावर पडावं, म्हणजे झालं."

"बरं, यांतलं थोडं चित्राहुति म्हणून द्यायला कांहीं हरकत आहे का ?"

"हें आपल्याला घेण्यापुरतंच असल्यामुळें, चित्राहुति द्यायला परवानगी नाहीं महाराज !"

"बरं, नाहीं तर नाहीं. निदान आपला धर्म आहे त्याप्रमाणें देवाची प्रार्थना तरी करायला कांहीं हरकत नाहीं ना ?"

"मुळींच नाहीं."

"ठीक आहे. तर परमेश्वरा, केवढी ही तूं माझी योग्यता वाढवलीस ! जें हालाहल विष प्रत्यक्ष महादेवाशिवाय कोणाला मिळालं नाहीं; इतकंच नव्हे तर, ज्यानं फक्त शंकराचा गळाच आपल्या सांनिध्यानं विभूषित किंवा पवित्र केला तें आज माझं सर्व शरीर पुनीत करणार आहे हें पाहून भगवंता ! तुझ्या अतर्क्य लीलेसंबंधानं मोठं कौतुक वाटतं ! बा हालाहला, मला आनंद लोकीं नेऊन पोंचवणारं तूं प्रत्यक्ष विमानच आज माझ्यापुढें अवतरलं आहेस यांत तिळमात्र संदेह नाहीं. माझं स्वर्गीचं संधान तूंच आहेस ! चला, आटपा ! विषराज, करा आतां हें शरीर पुनीत !" विष प्यायल्यानंतर पुन्हां म्हणतो. "अहाहा ! शंकराच्या गळ्याचा दाह जसा रामनामानं शांत झाला तद्वत माझ्या सर्व देहाचा होवो ! श्रीराम ! श्रीराम !

श्रीराम !" असें बोलून तो राजाज्ञेप्रमाणें इकडे तिकडे बोलत बोलत असा हिंडूं लागला. तेव्हां किरात म्हणतो–

"परमेश्वरा, आमच्यांतला हा विद्वच्छिरोमणि प्रतिसूर्य अशा तऱ्हेनं अस्ताला जावा अशीच तुझी इच्छा होती काय ? ह्या अपर सूर्याचा अस्त आणि लाळघोट्या–थुंकीझेल्यांचा कुतऱ्यांचा मुताच्या छत्रीसारखा उदय, अशीच तूं काळाची स्थिति ठरवून ठेवली होतीस काय ? हाय हाय ! नशीब ! नशीब आमचं !"

सिंहगर्जनेला भिऊन शेंपूट पाडून पळणाऱ्या पळकुट्या कुतऱ्यांचाच भुंकार आतां आमच्या कानीं पडणार ना ? आकाशांत दिनमणि चमकत असतां आपला प्रकाश पाडण्याची काजव्यांची छाती होती काय ? पण आतां काय ! जिकडे तिकडे त्यांचंच साम्राज्य होणार ! दिनमणि–लोक-बंधु–अस्ताला चालला ! आमचा पाठीराखा परलोकयात्रेला निघाला !"

"किरात, वालखिल्य, मित्रांनो ! तुम्हीं हें काय मांडलं आहे ? आवरा तें आपलं रडणं ! पुसा ते तुमचे अश्रु ! हें तुमचं वर्तन पाहून मला मोठा अचंबा वाटतो ! अरे, तुमचं धैर्य गेलं तरी कुठें ? बायकांना मनोनिग्रह नसतो म्हणून त्या असल्या प्रसंगीं गोंधळ करतात. तो होऊं नये म्हणून मीं मघाशींच त्यांना मुलांसह घरीं लावून दिल्या. तुम्ही तर पुरुषांसारखे पुरुष ! आणि हें काय हें आरंभलं आहेत ? मीं पुष्कळांच्या तोंडून ऐकलं आहे कीं, मनुष्यमात्रानं देवाचे उपकार मानून त्याची स्तुति करीत मोठ्या स्वस्थांतःकरणानं प्राण सोडावे–म्हणजे फारच त्वरित अशा आनंदलोकाची प्राप्ति होते. म्हणून आतां तुमच्यापाशीं माझं एवढंच मागणं आहे कीं, तुम्ही उगे रहा ! आपला धीटपणा अमळ अधिक प्रकट करा ! म्हणजेच मी स्वस्थ होईन. हालाहलानं आपला बराच अंमल केला आहे. आतां पायांतही बरेंच पेटके यायला लागले आहेत; तेव्हां न्यायाज्ञेप्रमाणें आतां मी अंथरुणावर रामनाम घेत स्वस्थ पडतों. सरकारी हुकूम म्हणजे प्रत्यक्ष देवा-

चाच! कारण, 'ना विष्णुः पृथिवीपतिः!'"

असें बोलत बोलत–सोमदत्त आपल्या अंथरुणावर जाऊन स्वस्थ उताणा पडला! विषानं आपला अंमल त्याच्या देहावर बऱ्याच वेगानें चालविला असल्या कारणानें तो देवाचें नांव घेत असतां त्याच्या देहाची चलनवलन-शक्ति नाहींशी होऊन, त्याचे नेत्रतारक थिजलेल्या मेणासारखे निस्तेज झाले. हें बघतांच किरात व वालखिल्य यांनीं त्याच्या आत्म्याला जबर अशी आपल्या अलौकिक दुःखाश्रुमौक्तिकांची अपार खंडणी देऊन स्वर्ग आणि पृथ्वी यांमधलें अंतराल दुःखी श्वासोश्वासांनीं कोंदून टाकलें. हां हां म्हणतां ही बातमी सर्व शहरभर पसरून, सर्व पक्षांचे नागरिक आपापल्या समजुतींची शांति करण्याकरितां–सोमदत्ताच्या प्रेतदर्शनार्थ तुरुंगाच्या बाहेरच्या आवारांत फारच झपाट्यानें जमा झाले. सरकाराकडून तो मृतदेह त्याच्या नातलगांच्या ताब्यांत देण्यांत आल्यावर फारच मोठ्या समारंभानें स्मशानयात्रेचा विधि–धार्मिक पद्धतीला योग्य असा पार पाडण्यांत आला!

झालें! याप्रमाणें ग्रीश्रृंग देशांतील एका थोर विभूतीच्या निधनानें–सत्यमूर्तीच्या नाशानें–बंडाळी करणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांचें पूर्ण समाधान झालें असें क्षणैक वाटलें खरें; परंतु त्या देशांतील संस्थानांत आपापसांत ज्या-वेळीं–सोमदत्ताच्या निधनानंतर फारच अल्पावकाशांत–ज्या वेळीं अनुल्लंघनीय अशी यादवी माजली, त्या वेळीं सोमदत्ताच्या मंत्रोपदेशाची व बुद्धिवादाची वाण त्याच्या पक्षपातीयांना तर भासली; परंतु ज्यांनीं हेवा, मत्सर दीर्घद्वेष, अहंमन्यता, वृथा गर्व वगैरेना बळीं पडून, सोमदत्तारखी राष्ट्र-संरक्षक सत्यमूर्ति व्यर्थ भंगून टाकून राष्ट्रविघात केला, याबद्दल त्यांना न भरून देणारी अशी स्पष्ट न्यूनता भासली व त्यामुळें सर्वत्र हाहाक्कार झाला. सोमदत्त आपल्या परलोकगमनानंतर एक अद्वितीय अशी भूतकालीन राष्ट्रविभूति ठरून सर्वत्र त्याचे पुतळे उभारण्यांत आले व त्या पुतळ्यांच्या पूजा सुरू झाल्या! त्याच्या किरात वगैरे शिष्यांनीं त्याचे तात्त्विक विचार

सर्वत्र व्याख्यानांच्या रूपानें प्रगट करून—पुन्हां आपसांतील यादवी नष्ट करण्याचा प्रयत्न केला व तो सफलही झाला.

आमच्या सोमदत्त नायकाच्या हातून या जगांत अलौकिक अशा अनेक गोष्टी घडल्या आहेत कीं, त्यांच्या संग्रहांचीं असलीं अनेक पुस्तकें जरी तयार झालीं तरी तीं थोडींच होणार आहेत. सोमदत्तासारखा ज्ञाता व पूर्ण दूरदृष्टि पुरुष आजपर्यंत निर्माण झाला नाहीं, याबद्दल तो सर्व देश अद्याप हळहळतो आहे! सोमदत्ताचा छात्रवर्ग फार मोठा होता. तो सर्व गोष्टी आपल्या छात्रवर्गाला मोठ्या कौशल्यानें तत्वज्ञानाचें रूप देऊन शिकवीत असे. त्यानें राजकारणही तात्विक पायावर मोठ्या मुद्देसूदपणानें आपल्या ज्या कांहीं शिष्यांना पढविलें होतें त्यांनींच अखेर त्या शिक्षणाच्या जोरावर आपसांतील दुही मोडून गोशृंगाचें एकछत्री राज्य बनविलें व आपल्या गुरूंच्या नांवाबरोबर आपलीही अजरामर दिगंत कीर्ति सर्व जनहृदयांवर इतिहासरूपानें खोदून ठेविली, हें काय सामान्य काम झालें? लोहपरिसघर्षणाचा योग अलौकिक मानला जातो, परंतु अदृश्य हवेच्या साह्यानें हवेवरच उठणारे विचारतरंग--अदृश्य अशा बुद्धिमत्तेला आपलीशी करून घेऊन तिच्या करवीं मनुष्यप्राण्याला कारणीभूत करून—महान महान् अशीं अनुल्लंघनीय आणि अद्वितीय कार्यें घडवून आणतात, हें सामर्थ्य अलौकिक नाहीं असें कोण म्हणेल!

---